# स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील

# प्रादेशिकता...



विदर्भ

मराठवाडा

खानदेश

कोकण

पश्चिम महाराष्ट्र

डॉ. भास्कर शेळके

# स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील

# प्रादेशिकता

डॉ. भास्कर शेळके

शब्दश्री प्रकाशन, जुन्नर

**Swatantryottar Marathi Kadambaritil Pradeshikta**

स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील प्रादेशिकता

डॉ. भास्कर शेळके

© अविनाश भास्कर शेळके ९७६६९२१३२०

प्रकाशक : सौ तारादेवी भास्कर शेळके

१२१, श्रीदुर्गा, बारव, ता. जुन्नर,

जि.पुणे, ४१० ५०२

मुखपृष्ठ:विनोद पारे, पुणे

प्रकाशन क्रमांक: १

द्वितीय आवृत्ती: १७ ऑगस्ट, २०१६

अक्षरजुळणी : सौ. ज्योती विलास शिंदे

मुद्रक : श्रीराज प्रिंटर्स

शनिवार पेठ, पुणे - ३०.

मूल्य : ७०/-

**ISBN No. : 978-81-924997-3-4**

# अर्पणपत्रिका

सौ. विमल बाळासाहेब चौधरी

सौ. तारा किसन गुंजाळ

सौ. शोभा सुरेश मुसमाडे

ह्या तीन भगिनींना आदरपूर्वक

## मनोगत.....

'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील प्रादेशिकता' हा संशोधनपर ग्रंथ आज पूर्णत्वास येत आहे. ह्या संशोधनपर ग्रंथातून स्वातंत्र्योत्तर प्रादेशिक कादंबरीचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये अधोरेखित झाली आहेत. शिवाय महाराष्ट्राचे जे भौगोलिक दृष्टिकोनातून चार भाग पडतात, त्या चारही भागातील कादंबऱ्यांचे वेगळेपण शोधण्याचा प्रयत्न ह्या ग्रंथात केला आहे.

विदर्भ, मराठवाडा, प. महाराष्ट्र आणि कोकण ह्या चारही विभागांचे प्रादेशिक-ग्रामीण जीवन भिन्न स्वरूपाचे आहे. हे भिन्न स्वरूप त्या त्या प्रदेशाच्या भौगोलिक वैशिष्ट्यांमुळेच निर्माण झाले आहे. तेथील निसर्ग, समाज, संस्कृती, शेती भिन्न भिन्न झाली आहे. ह्या भिन्नतेचे दर्शन त्या त्या प्रदेशातील ग्रामीण प्रादेशिक कादंबऱ्यांतून अधोरेखित होते. ह्या ग्रंथामुळे प्रादेशिकतेचा आणि ग्रामीण सहित्य विश्वाचा अभ्यास करताना निश्चितच उपयोग होईल, असा माझा मानस आहे.

माझी विचारसरणी फुले-शाहू-आंबेडकरांना अनुसरणारी आणि प्रादेशिक ग्रामीण दलित साहित्याला पोषक असल्याकारणाने माझ्या असंख्य हितचिंतक मित्रांना वाटत होते की, मी 'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील प्रादेशिकता' ह्या विषयावर संशोधनपर लेखन करावे, त्यातूनच मला बळ प्राप्त झाले आणि माझा हा लेखन प्रपंच पूर्णत्वास आला.

माझ्या लेखन संशोधनास सतत प्रोत्साहन देणारे मा. अध्यक्ष ॲड. संजय काळे, ह्यांचे सर्व विश्वस्त मंडळ ह्यांची प्रेरणा आहेच, त्यांच्या ऋणात राहणे मी पसंत करतो. संशोधन लेखनासाठी संशोधन साहित्य उपलब्ध करून देणारे महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. थोरात व त्यांचे सर्व सहकारी ह्यांचेही मी आभार मानतो. संशोधन लेखनाचे कार्य लवकरात-लवकर पूर्णत्वास यावे म्हणून प्रेमळपणे तगादा लावणारा माझा विद्यार्थी मित्र प्रा. डॉ. शशिकांत साळवे ह्याचे ही सहकार्य आहेच.

प्रस्तुत संशोधनाविषयास विद्यापीठ अनुदान आयोगाकडून लघु शोधप्रबंधलेखनासाठी अनुदान प्राप्त झाले होते, त्याबद्दल त्यांचेही आभार मानणे माझे

इतिकर्तव्यच आहे.

माझे कुटुंबीय आई-वडील (दुर्गाबाई, त्रिंबकराव) भाऊ-भावजयी प्रा. सयराम आणि मीना, पत्नी सौ. तारादेवी आणि चि. डॉ. अविनाश, चि. डॉ. तृप्ती, चि.सुनित ह्यांनी माझ्या लेखन प्रपंचास हातभार लावला. त्यांचे प्रेमळ सहकार्य विसरता येत नाही. विनोद पारे ह्यांनी सुबक मुखपृष्ठ तयार केले आहे तर सौ.ज्योती शिंदे ह्यांनी टंकलेखनाचे कार्य केले आणि श्री राज प्रिंटर्स पुणे ह्यांनी मुद्रणाचे कार्य केले. ह्या शिवाय अनेक ज्ञात-अज्ञातांनी माझ्या संशोधनलेखन विचारास पाठिंबा दिला आहे, ह्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. ह्या ग्रंथाचे वाचक, रसिक, संशोधक, अभ्यासक स्वागतच करतील, अशी मनोकामना व्यक्त करतो. धन्यवाद!!!

डॉ. भास्करराव शेळके,
प्राचार्य, श्री. शिव छत्रपती
महाविद्यालय, जुन्नर पुणे

## प्रादेशिकता : स्वरूप आणि वैशिष्ट्ये ........

महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक दृष्ट्या प्रमुख चार विभाग पडतात. १) विदर्भ, २) मराठवाडा, ३) पश्चिम महाराष्ट्र ४) कोकण ह्या चारही विभागांचे प्रादेशिक आणि ग्रामीण जीवन भिन्न भिन्न स्वरूपाचे आहे. तेथील समाज, संस्कृती, निसर्ग आणि शेती भिन्न स्वरूपाची आहे. ह्या विभन्नतेमुळेच त्या त्या प्रदेशाची भिन्न वैशिष्ट्ये निर्माण झालेली आहेत. स्वातंत्र्यपूर्व प्रादेशिक ग्रामीण जीवन आणि स्वातंत्र्योत्तर प्रादेशिक ग्रामीण जीवन ह्यात खूप मोठा फरक जाणवतो. काळाच्या ओघात स्वातंत्र्योत्तर ग्रामीण परिसर आणि ग्रामीण जीवन बदललेले दिसते. शहराप्रमाणे ग्रामीण परिसरातही अनेकविध सुधारणा झालेल्या दिसतात. प्रादेशिकतेनुसार त्याभागची भूवैशिष्ट्ये, निसर्ग आणि समाजजीवन तपासता येते.

कोणत्याही संकल्पनेचा अभ्यास करण्यापूर्वी प्रथमत: साहित्य निर्माण व्हावे लागते आणि त्यानंतर त्या संकल्पनेचा अभ्यास केला जातो. सुरुवातीला प्रादेशिक साहित्य निर्माण झाले आणि नंतर प्रादेशिक हा शब्द लेखक समीक्षकांच्या लेखनात येऊ लागला. सर्वात अगोदर वि.स. सुखटणकरांनी प्रादेशिक हा शब्दप्रयोग वापरला आणि त्यानंतर प्रादेशिकतेचे स्वरूप निश्चित करण्याचा प्रयत्न झाला. मराठीतल्या मान्यवर समीक्षक लेखकांनी प्रादेशिकतेचे स्वरूप कथन केले आहे.

प्रादेशिकतेच्या संदर्भात बापट-गोडबोले लिहितात, "ज्या भूभागाची निवड कथानकाच्या पार्श्वभूमीसाठी करावयाची त्या भू भागाच्या नैसर्गिक सृष्टीचे यथावत चित्रण करीत असतानाच तेथील समाजजीवनाचे चालीरीतींचे, संस्कृतीचे व प्रसंगी तेथील विशिष्ट बोलीभाषेचे प्रतिबिंब कादंबरीत उमटल्यानेच ती कादंबरी प्रादेशिक कादंबरी ह्या नावाला सार्थ ठरते." बापट गोडबोले ह्यांनी भूभाग निसर्ग समाजजीवन, चालीरीती, संस्कृती आणि बोलीभाषा ह्या घटकांना प्रादेशिकतेचा विचार करताना विशेष महत्त्व दिले आहे. तर प्रादेशिकतेचे स्वरूप स्पष्ट करताना ल. ग. जोग म्हणतात, "हे प्रदेश सुधारलेल्या जीवनापासून अलग असतात. ते मागासलेले असतात. शहरे पुढारतात. खेडी मागासतात. केव्हा केव्हा खेडीच कायापालट करतात. गतिमान जिवंत

समाजात नेहमी बदल होत असतात. त्या त्या समाजात वेळोवेळी मागासलेले समाज बदलत जातात. लेखकालाही नावीन्याची हौस असल्यामुळे लेखकही नवीन जीवन रेखाटतो. दुर्लक्षित बंधनाच्या पलीकडच्या जानपद जीवनाचे जीवन चित्रण लेखकाच्या कलाकृतीत येते. तर प्रादेशिकतेच्या संदर्भात डॉ. अ. रा. तोरो ह्यांनी आपल्या अप्रकाशित प्रबंधात प्रादेशिकतेचे स्वरूप निश्चत करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रादेशिकतेचा नवा प्रवाह डॉ. तोरो ह्यांनी साधार स्पष्ट केला आहे.

भूप्रदेश, बोलीभाषा, प्रदेशाचे कलात्मक चित्रण, वास्तववादी अनुभूती, सामान्य माणसाला अग्रस्थान, त्यांच्या अवगुण व अज्ञानाचे चित्रण, अंधश्रद्धा, रीतीरिवाज, निसर्ग, वातावरण आणि भूमी हे प्रादेशिक साहित्याचे अंगभूत घटक डॉ. तोरो ह्यांनी सांगितले आहेत आणि प्रादेशिक वाङ्मयाच्या निर्मितीमागील प्रेरणा सांगितल्या आहेत. तसेच प्रादेशिकतेचे तत्त्व, स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. प्रादेशिक वाङ्मयाच्या प्रेरणा स्पष्ट केल्यानंतर डॉ. तोरो ह्यांनी प्रदेश म्हणजे काय? हे स्पष्ट केले आहे. प्रदेश म्हणजे भूभाग एका भूभागाचे जीवन म्हणजे प्रादेशिकता आणि हे जीवन ज्यात चित्रित केले आहे ते प्रादेशिक साहित्य, व्यवहारातील प्रदेश हा भौगोलिक आणि राजनैतिक क्षेत्रांनी व्यापलेला घटक आहे. तर साहित्यातील प्रदेश हा प्रामुख्याने सामाजिक आणि सांस्कृतिक धाग्यांनी विणलेला एक घटक आहे. प्रादेशिक साहित्यातील प्रदेश हा यंत्रयुगापासून दूर परंपरेपासून तुटलेला असतो. प्रादेशिक साहित्यासंबंधी असे म्हणता येईल की, प्रादेशिक कलाकृती एका विशिष्ट प्रादेशिक जीवनातून साकार होते. त्या प्रदेशातील जीवनाचा वैशिष्ट्यपूर्ण स्वाद त्या साहित्याला असतो. त्या प्रदेशातील लोकांचे आचारविचार, त्यांच्या भावभावना, त्यांच्या श्रद्धा-समजुती, त्यांचे सण-उत्सव, त्यांचे रागद्वेष ह्या सर्वांचे मिळून एक अपूर्व रसायन तयार होते. त्या प्रदेशातील लोकांची मनोरचना घडविलेली असते. त्यांचा एक वैशिष्ट्यपूर्ण जातिस्वभाव बनतो. ह्या स्वभावांचे जिवंत चित्र प्रादेशिक कलाकृती उभी करते. डॉ. तोरो ह्यांनी प्रादेशिक साहित्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "भौगोलिकदृष्ट्या अस्तित्वात असलेला एक वैशिष्ट्यपूर्ण भूप्रदेश तेथील मानवसमूह त्यांची वैशिष्ट्यपूर्ण बोली, संस्कृती, निसर्ग, समुचित व संघटित असे भावमय चित्रण जे ललित साहित्यात

करते ते प्रादेशिक होय." तर डॉ. आनंद यादव

ह्यांनी प्रादेशिकतेच्या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले आहे की, "प्रादेशिकता हे वाङ्मयीन मूल्य नव्हे तर ती एक प्रवृत्ती आहे. वाङ्मयीन अपरिहार्यतेतून प्रादेशिक साहित्याची निर्मिती झालेली आहे. प्रदेश म्हणजे विशिष्ट भू-भागावरील विशिष्ट निसर्ग असलेला व मानवी जनजीवनावर प्रभाव गाजविणारा प्रभावी घटक होय." प्रादेशिकता हे साहित्याला प्राप्त झालेले एक वैशिष्ट्ये आहे. नैसर्गिक व सांस्कृतिक वातावरणाला महत्त्व देणारी ती एक प्रवृत्ती आहे. औद्योगिक जीवनापासून दूर असलेल्या भागाचा समावेश प्रादेशिकतेत होतो. विशिष्ट प्रदेशातील ज्वलंत समस्या, त्यांच्यातील अंतर्विरोध तेथे होणारे आर्थिक, सामाजिक व राजकीय बदल जुळणारे बिघडणारे मनुष्या-मनुष्यातील संबंध, नीतिमूल्ये ह्याबरोबरच तेथील भौगोलिक व नैसर्गिक स्थिती तिचा जनमनावरील होणारा परिणाम व तेथील मागासलेपण, अर्धमागासलेपण ह्यातूनही प्रादेशिकता आविष्कृत होत असते. एखाद्या साहित्यप्रकाराच्या लेखनासाठी पार्श्वभूमी म्हणून एखाद्या प्रदेशाची निवड करून त्या प्रदेशातील नैसर्गिक सृष्टीचे यथाावत चित्रण करीत असतानाच तेथील समाजजीवन, चालीरीती, परंपरा-श्रद्धा इ.चे तसेच तेथील बोलीभाषेचे प्रतिबिंब साहित्यात उमटल्याने प्रादेशिकतेचे तत्त्व निर्माण होत असते. प्रादेशिकतेत विशिष्ट प्रदेशाच्या सांस्कृतिक, पारंपरिक व भाषिक वैशिष्ट्यांचा आढळ होतो.

डॉ. मदन कुलकर्णी ह्यांनी प्रादेशिकतेची तत्त्वे सांगितलेली आहेत. १) भौगोलिकता, २) मागासलेपण आणि समस्या, ३) निसर्ग, ४) लोकसंस्कृती, ५) सामूहिकता, ६) भाषा प्रादेशिकता ही वास्तवतेचे प्रगटीकरण आणि नावीन्य ह्या दोन कारणांनी वाङ्मयात आली असे सांगून डॉ. मदन कुलकर्णी जाती-जमातीवरील कादंबऱ्यांचाही प्रादेशिक कादंबरीत समावेश करतात. परंतु, नागर जीवन किंवा त्या निमित्ताने वाढणारी झोपडपट्टी ह्यांवरील कादंबऱ्यांचा समावेश प्रादेशिक कादंबरी प्रकारात करण्यास ते विरोध करतात. ह्या उलट प्रादेशिक जीवन शतकानुशतके चालत आलेले सांस्कृतिक जीवन असते ते नैसर्गिक व स्वाभाविक असते. प्रगत जीवनाचा त्या जीवनावर प्रभाव जेव्हा होतो, तेव्हा तर प्रदेश संस्कृतीचे प्राचीनत्व अधिकच उजळून

निघते. प्रगतीतही आपले स्वरूप जपण्याचा प्रयत्न ग्रामीण जीवन करीत असते, त्यात भूत-प्रेत, ईर्षा-प्रतिहिंसा, न्याय-अन्याय-पाप, दु:ख व वेदना इ. गोष्टी असतात. पण त्याबरोबर त्यात गोडवाही असतो. सणवार, उत्सव करण्याच्या विशिष्ट पद्धती असतात. त्यावेळी लोकगीते गायली जातात. लोकसंगीताच्या तालावर नृत्य केली जातात. ह्या सर्वांचे चित्रण प्रादेशिक कथा-कादंबऱ्यातून येते. जे नागर जीवनाच्या तुलनेत एकदम वेगळे असते. म्हणूनच शहरी नागर पार्श्वभूमीचा प्रादेशिकतेत समावेश करणारी ही गोष्ट चुकीची ठरते, असे स्पष्टीकरण डॉ. मदन कुलकर्णी ह्यांनी केले आहे. तसेच प्रादेशिकतेची संज्ञा त्यांनी पुढीलप्रमाणे मांडली आहे. प्रदेश म्हणजे विशिष्ट भूभाग. प्रदेशास नैसर्गिक वैशिष्ट्ये असतात. नद्या, पर्वत, वातावरण, भू-पृष्ठ, खनिज पदार्थ, अरण्य, अन्नधान्य, ह्यामुळे ही वैशिष्ट्ये प्राप्त होऊ शकतात. आर्थिक, सांस्कृतिक, प्राकृतिक अशा काही वैशिष्ट्यांनुसार प्रदेश विभागला जाऊ शकतो. संयोगी व पूरक अभिरुचीतूनही प्रदेशाला पाहता येते. एखाद्या देशातील प्रांत भाग प्रदेश म्हणून संबोधला जाऊ शकतो, हे प्रदेश विशिष्ट दृष्टीने पूर्णपणे स्वतंत्र असे घटक मानता येतात. पुष्कळदा असे प्रदेश उपेक्षित राहिलेले असतात. ह्या प्रदेशांचे नावीन्यपूर्ण सौंदर्य तेथील लोकसंस्कृती, भाषा, प्रश्न इत्यादी गोष्टींचे दर्शन जेव्हा साहित्यिक घडवू लागतात, तेव्हा त्या साहित्याला प्रादेशिक हे विशेषण लावले जात असे, प्रादेशिक साहित्य चित्रण लेखकाच्या कलात्मक प्रवृत्तीचा आविष्कारच मानावा लागतो. सारांश, जानपद ग्रामीण आणि इतर संज्ञांचा समावेश प्रादेशिक मध्येच करावा असे डॉ. मदन कुलकर्णी म्हणतात, कारण सर्व संज्ञांचा कल हा प्रादेशिकतेकडेच असतो.

प्रादेशिकता केवळ एखादा विशिष्ट असा भौगोलिक पट्टा नव्हे. प्रादेशिकता म्हणजे केवळ निसर्ग नव्हे तर प्रादेशिकता म्हणजे त्या प्रदेशातला माणूस, त्या माणसाची संस्कृती, त्याचे उपजीविकेचे साधन, त्या माणसाची भाषा आणि या साऱ्यांना कवेत घेणारा निसर्ग ह्या साऱ्यांच्या परिपाकातून साहित्यातही प्रादेशिकता निर्माण होत असते. त्यातून एक सामाजिक मन तयार होत असते. सामाजिक रीतीरिवाज, सणसोहळे, अन्नपदार्थ, प्रावर्ण, मानसिकता तयार होत असते. त्यातून सांस्कृतिक आणि सामाजिक, वातावरण, तयार होत असते व हे वातावरण

प्रादेशिकतेला आकार देते. थोडक्यात, प्रादेशिकता म्हणजेच निसर्ग आणि परिस्थितीतून साकार झालेली सामाजिकता होय. त्या विशिष्ट प्रदेशातील माणसाने प्राप्त परिस्थितीला शरण जाऊन स्वत:च्या सोयीसाठी आणि सुखासाठी जे जीवनव्यवहार व जीवनमूल्ये स्वीकारली असतील, त्या साऱ्यांचे कलात्मक पातळीवर युनिक दर्शन म्हणजे प्रादेशिकता होय. ज्या प्रदेशाच्या मातीत वाढलेल्या लोकसमूहाचे स्पंदन, त्यांचे निसर्गाशी असलेले संवाद-विसंवाद अन् त्यातून त्याला लागणारे वेगळेपण ह्यातच प्रादेशिकतेचे रहस्य सामावलेले आहे. प्रादेशिकतेमध्ये सामूहिकता, प्रातिनिधिकता व सांस्कृतिक जीवन ह्यालाही महत्त्वाचे स्थान असते. ह्या तीन बाबींशिवाय साहित्यातील प्रादेशिकता पूर्ण स्वरूपात अवतीर्ण होत नाही. प्रादेशिकतेविषयीचे प्रा. स. शि. भावे ह्यांच्या मताचा हवाला देऊन डॉ. द. ता. भोसले ह्यांनी सविस्तर विवेचन करताना म्हटले आहे, प्रादेशिकतेच्या निकषांमध्ये सामाजिकतेला महत्त्वाचे स्थान आहे आणि ही सामाजिकता निसर्ग, समाज आणि व्यक्ती ह्यांच्या परस्पर देवाणघेवाणीतून साकार होते व ती पात्रांद्वारे साहित्यात जिवंत बनते.

डॉ. रवींद्र ठाकूर ह्यांनीही प्रादेशिक साहित्यकृतीविषयी काही विचार मांडलेले आहेत. जसे १) प्रादेशिकता म्हणजे विशिष्ट भौगोलिक परिसीमांनी नियत झालेल्या ग्रामीण परिसरांची अनेकांगांनी युक्त अशी अनन्यसाधारण विशेषता होय. ही विशेषता तेथील लोकजीवन काही तत्त्वांच्या रूपाने अस्तित्वात असते. अशा प्रदेशाचे जीवन जेव्हा एखाद्या साहित्यकृतीत साक्षात होत असेल तेव्हा त्या साहित्यकृतीस प्रादेशिक साहित्यकृती म्हणता येईल. २) एखाद्या विशिष्ट भूप्रदेशाच्या व्यक्तिमत्त्वाला प्राधान्य देऊन जेव्हा एखादी साहित्यकृती निर्मिली जाते तेव्हा त्या साहित्यकृतीला आपण प्रादेशिक साहित्यकृती म्हणतो. ३) जेव्हा एखाद्या साहित्यकृतीतून एखादा विस्तीर्ण भूप्रदेश तेथील निसर्ग, समाजजीवन आदी सर्व वैशिष्ट्यांसह साक्षात होत असेल तेव्हाच त्या कलाकृतीस प्रादेशिक साहित्यकृती म्हणता येईल. डॉ. ठाकूर ह्यांच्या वरील तीन व्याख्यांतून असे दिसते की, प्रादेशिक साहित्यकृतीतून विस्तीर्ण भूप्रदेश, निसर्ग, समाजजीवन, लोकजीवन ह्यांच्या चित्रणाची ते अपेक्षा करतात. संस्कृती, समूह मनाचा आविष्कार आणि निसर्ग ह्यांशिवाय प्रादेशिकता अपूर्ण राहते. सामूहिकता,

प्रातिनिधिकता आणि सांस्कृतिक जीवन ह्यांना प्रादेशिकतेत महत्त्वाचे स्थान आहे. प्रादेशिक बोलीभाषा, निसर्ग, व्यक्ती व समाज ह्यांच्या परिमलातून प्रादेशिकता आकार घेते. थोडक़्यात विशिष्ट प्रदेशातील निसर्गचित्रण म्हणजे प्रादेशिकता नव्हे तर इतरही घटकांचा अंतर्भाव प्रादेशिकतेत होतो, त्या घटकांचा आपण विचार करू.

सर्वच अभ्यासकांनी काही प्रमुख घटकांचे स्पष्टीकरण केले आहे. १) भू-प्रदेशाच्या निसर्गाचे सृष्टीचे चित्रण, २) समूह मनाचा गजर, ३) सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, वातावरण, ४) समग्र व परंपरायुक्त जनजीवन, ५) लोकसंस्कृतीच्या अधिक जवळ आणि प्रातिनिधिक पात्रांना स्थान, ६) विशिष्ट बोलीभाषा ७) अनुभवाचा अस्सलपणा, कसदारपणा, ८) उपजीविकेचे साधन व शेती, ९) समान मानसिकता, १०) दैनंदिन व्यवहार, ११) भौगोलिक एकता, १२) आधुनिक पात्रयोजना, १३) संवाद योजना, १४) भौगोलिक पार्श्वभूमीवरील कथानक, १५) रीतीरिवाज, १६) सुख-दु:ख, १७) जीवनप्रणाली, १८) सजीव वातवरण व प्रदेशाचे स्थानिक रंग, १९) धार्मिक नैतिक आचार विचार श्रद्धा, विश्वास, आस्था, शिष्टाचार, मनोरंजनाची साधने, व्यसन, कला, वेशभूषा, जातिधर्म, विनिमय, आहार, जादुटोणा, चेटूक, उत्सव, रागद्वेष इ. २०) शैली-शिल्प-लोकगीत, कथा, नृत्य, लोकाचार, लोकरंगमंच, इ. २१) समस्या आणि जीवननाट्य, २२) सामाजिकता, २३) अनुवंशिकता, २४) समरसता, २५) समूह केंद्रितता इ. ह्या सर्वच घटकांचा प्रादेशिकतेत समावेश होतो. व वरील विवेचनावरून प्रादेशिकतेची स्वरूप लक्षात येतात. 'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील प्रादेशिकता' ह्या संशोधन ग्रंथात महाराष्ट्राच्या भौगोलिक दृष्ट्या प्रमुख चार भागात निर्माण झालेल्या प्रादेशिक ग्रामीण कादंबरीचे लेखकाने आशयासह स्वरूप आणि वैशिष्ट्य स्पष्ट केलेली आहेत. त्याचा प्रत्यय सर्वच रसिक वाचकांना या ग्रंथाचा अभ्यास करताना निश्चितच येईल. त्याबद्दल संदेह नाही. धन्यवाद!!!

डॉ. शशिकांत साळवे,
बी.डी. काळे महाविद्यालय घोडेगाव (पुणे)

# १. प्रादेशिकतेचे स्वरूप

१ मे १९६० रोजी विदर्भ-मराठवाडा आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. तद्अनुषंगाने महाराष्ट्राचे भौगोलिकदृष्ट्या चार प्रमुख स्वाभाविक विभाग पडतात.

१) विदर्भ, २) मराठवाडा,३) प. महाराष्ट्र, ४) कोकण ह्या चारही विभागाचे प्राकृतिकदृष्ट्या प्रादेशिक ग्रामीण जीवन भिन्न स्वरूपाचे आहे. प्रामुख्याने हे जीवन कृषिप्रधान आहे. प्रदेशाचे विशिष्ट व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यपूर्ण आहे. ह्या ठिकाणांचे निसर्ग, समाज, संस्कृती, शेती ग्रामीण प्रादेशिक कादंबऱ्यांतून दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळातील जीवनापेक्षा स्वातंत्र्योत्तर जीवनशैलीत खूप फरक पडलेला दिसतो. पारंपरिक गावगाड्याचा ऱ्हास झालेला दिसतो. नवीन सुधारणा झाल्या. त्यातून काही जटिल प्रश्न निर्माण झाले. प्रादेशिक साहित्यातून ऱ्हासमान पर्यावरणासंबंधीचा प्रश्न चित्रित झालेला आहे. नष्ट होऊ घातलेल्या पर्यावरणाची कल्पना त्यातून येते. हरितक्रांतीच्या हेतूने किंवा नव्या मानवी जैविक गरजांच्या परिपूर्तीसाठी जाणीवपूर्वक प्राणिजात व पादपजात (स्वाभाविक जीवन) आणि भूरूपे ह्यांचा ऱ्हास होत आहे. एक जुने पर्यावरण सर्वांगासह नाहीसे होत चालले आहे. ह्या प्रादेशिक भू-वैशिष्ट्याबरोबरच प्रामुख्याने प्रादेशिक समाज वास्तवाचा शोध घेणे हा हेतू येथे आहे. जसे १९९१ साली प्रकाशित झालेल्या विश्वास पाटलांच्या 'झाडाझडती' कादंबरीतून धरणात बुडणाऱ्या एका भू-प्रदेशाची विस्तृत व गुंतागुंतीची कहाणी आहे. जांभळी बुद्रूक गाव आणि त्याचा परिसर प्राकृतिक मूल्यांसह नष्ट होत आहे. तर सुरेश शिंदे ह्यांच्या 'सर्ज्या' (१९९४)मधून प्राणिपुजेचा ऱ्हास झाला आहे. प. महाराष्ट्रातील नेहमीच्या दुष्काळामुळे उखडलेपण निर्माण झाले. जानपद जीवनाचा ऱ्हास त्यातून स्पष्ट दिसतो. त्या

पार्श्वभूमीवर स्वातंत्र्योत्तर मराठी प्रादेशिक कादंबरीच्या आधारे महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक अंगाचा विचार करावा ह्या उद्देशाने मी विचार करू लागलो. त्यासाठी प्रथम मला प्रदेश म्हणजे काय? प्रादेशिकता म्हणजे काय? आणि प्रादेशिक कादंबरी म्हणजे काय? ह्याचा विचार करणे क्रमप्राप्त वाटू लागले. त्या आधारे संयुक्त महाराष्ट्रातील जीवन संघर्षाची काही वैशिष्ट्ये आहेत का हे पाहता येईल.

**प्रदेश :**

प्रदेश म्हणजे प्रांत, जनपद किंवा क्षेत्र होय किंवा प्रदेश म्हणजे देशाचा एक भाग किंवा प्रांत होय. खेडं आणि शहर दोन्हीही त्या अर्थाने प्रदेशच भू-भागच आहेत. परंतु येथे सुधारलेल्या जीवनापासून दूर मागासलेल्या भागास प्रदेश म्हणतात. प्रदेश म्हणजे स्वयंपूर्ण जग, निसर्गाच्या कुशीत ह्या जीवनाचा जन्म होतो. म्हणजेच विशिष्ट भू-भागावरील विशिष्ट निसर्ग असलेला व मानवी जनजीवनावर प्रभाव गाजविणारा प्रभावी घटक म्हणजे प्रदेश होय. हा प्रदेश लेखकाच्या संवेदनशीलतेवर परिणाम करतो. थोडक्यात शहरी संस्कृतीपासून, औद्योगिकीकरणापासून दूर असलेल्या प्रांताला, भागाला प्रदेश म्हणता येईल. पेठ, कसबा किंवा शहराच्या जवळ वाढणाऱ्या झोपडपट्टीला प्रदेश म्हणता येणार नाही. कारण तेथे विशिष्ट निसर्गाची पार्श्वभूमी लाभलेली नसते. लोकसंस्कृतीही एक नसते. त्यामुळे झोपडपट्टी जीवन चित्रण करणाऱ्या कादंबरीचा समावेश प्रादेशिक कादंबरीत करता येत नाही.

**प्रादेशिकता :**

प्रादेशिक हे विशेषण नाही, प्रदेश मूलभूत घटक किंवा नायक असतो. प्रादेशिकतेत विविध घटकांचा समावेश होतो. प्रादेशिकतेचे पुढील तीन प्रमुख घटक आहेत.

अ) भू-वैशिष्ट्ये ब) निसर्ग क) समाज जीवन

ह्याप्रमाणेच समाज जीवनाचे विविध उपघटकही आहेत ते पुढीलप्रमाणे:

१) राजकीय जीवन २)सांस्कृतिक

३)आर्थिक जीवन ४) शैक्षणिक जीवन

५) घटना, प्रसंगी व्यक्ती आणि कुटुंब विशेष

६) भाषा विशेष, सामूहिकता, प्रातिनिधिकता, आणि सांस्कृतिक जीवन ह्यांना प्रादेशिकतेत महत्त्वाचे स्थान आहे. प्रादेशिक बोलीभाषा, निसर्ग, व्यक्ती आणि समाज ह्यांच्या परिपाकातून प्रादेशिकता आकार घेते. थोडक्यात विशिष्ट प्रदेशातील निसर्ग चित्रण म्हणजे प्रादेशिकता नव्हे तर इतरही घटकांचा प्रादेशिकतेत अंतर्भाव होतो ते घटक पुढीलप्रमाणे :

१) भू-प्रदेश निसर्गाचे, सृष्टीचे चित्रण, २) समूह मनाचा गजर ३) सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक वातावरण, ४) समग्र व परंपरायुक्त जनजीवन, ५) लोकसंस्कृतीच्या अधिकजवळ आणि प्रातिनिधिक पात्रांना स्थान, ६) विशिष्ट बोलीभाषा, ७) उपजीविकेचे साधन, ८) समान मानसिकता हे सर्वच घटक एकाच वेळी प्रादेशिक कादंबरीत येतीलच असे नाही. आशयाच्या अपरिहार्यतेतून त्यांचा नकळत वापर होत असतो. प्रादेशिक कादंबरी म्हणजे केवळ प्रदेशचित्रण नव्हे तर वर उल्लेख केलेल्या घटकांचे रसायन होय.

**प्रादेशिक कादंबरी :**

प्रादेशिक कादंबरीत विशिष्ट स्वरूपाच्या प्रदेशाला अधिक महत्त्व असते. प्रादेशिक कादंबरीत प्रदेश पात्र म्हणून वावरतो. त्यामधील जीवन प्रातिनिधिक स्वरूपाचे असते. प्रदेशातील परिस्थिती त्यातून साकार झालेल्या मनाचा आविष्कार ती करीत असते. समाज जीवनाचे नियम किंवा अप्रत्यक्ष नियंत्रण प्रदेश करतो. उदा. मधुकर वाकोडे ह्यांच्या 'झेलझपाट' कादंबरीमध्ये मेळघाट ह्या विदर्भातील कोरकूंच्या जीवनावर प्रदेशाचे नियंत्रण दिसते. त्याप्रमाणे सरकारी धोरणांचा विपरीत परिणामही स्पष्ट दिसतो. शेती, शिकार, लाकूड, मोह फु लांची विक्री करून उदर निर्वाह करणाऱ्या कोरकूंची टायगर प्रोजेक्टने जीवनशैलीच नष्ट झाली. प्रदेश पार्श्वभूमी म्हणून येत नाही तर तो तेथील घटना, अनुभव, पात्र, संस्कृती ह्यांच्याशी एकरूप होऊन अवतरतो. एकात्म आणि कला प्रदर्शन येथे अभिप्रेत आहे. म्हणजेच समूहमनाचा आविष्कार किंवा सामूहिक स्वरूपाच्या गजराची येथे अपेक्षा असते. प्रदेशाचे मिळून लोकजीवन साकार

होते. लोक जीवनाचा आविष्कार होतो. लोकजीवन प्रदेशाचा रंग घेऊन्न येते. लोकजीवन प्रदेशाने बंदिस्त केलेले असते. प्रदेशाचे चैतन्य आणि समाज जीवनातील चैतन्य आणि सौंदर्य एकरूप होऊन्न अवतरते. निसर्ग चित्रणाच्या अधिष्ठानावर सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपाचे दर्शन अभिप्रेत असते. सशक्त स्वरूपाचा प्रदेश, माणूस, संस्कृती, भाषा, निसर्ग रीतीरिवाज ह्यांच्या परिपाकातून एकात्म स्वरूपाचे प्रादेशिक साहित्य जन्मते.

मराठी कादंबरीच्या विकासाबरोबर प्रादेशिकतेविषयीच्या विचारातही बदल झाला. मराठी कादंबरीतील प्रादेशिकतेस बाळसे आले. प्रादेशिकता केवळ कादंबरीचा साज किंवा विशेषण नव्हे तर अविभाज्य अंग म्हणून मराठी कादंबरीत अपरिहार्यपणे आशयानुरूप येऊ लागली. त्यानंतर वि. स. सुखटणकरांनी प्रादेशिक हा शब्द रूढ केला. प्रथम साहित्य आणि नंतर संकल्पना रूढ झाली. बापट-गोडगोले, ल. ग. लोग. डॉ. अ. रा. तोरो, डॉ. द. भि. कुलकर्णी. डॉ. आनंद यादव, स. शि. भावे, म. सु. पाटील, डॉ. मदन कुलकर्णी, डॉ. नागनाथ कोतापल्ले, डॉ. द. ता. भोसले, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. रवींद्र शोभणे, पंडित शेटे, शरद घाटे, फ. मुं. शिंदे, गो. म. कुलकर्णी, म. पां. कुलकर्णी, पुरुषोत्तम कालभूत ह्यांनी मराठी प्रादेशिककादंबरीसंबंधी विचार मांडले आहेत. प्रादेशिक कांदबरीचे विविध घटक त्यांनी सांगितले, त्यांच्यात मतभिन्नता ही आहे. इंग्रजीत रिजनल किंवा हिंदीतील आंचलिक कादंबरी संबंधीच्या अभ्यासकांच्या विचारातही भिन्नता आहे. प्रदेश म्हणजे काय? प्रादेशिकता म्हणजे काय? प्रादेशिक कादंबरी म्हणजे काय? प्रादेशिकतेचे कृत्रिम आणि अस्सल असे दोन प्रकार करता येतील का? प्रादेशिक कादंबरीचे मुख्य घटक कोणते? प्रादेशिक कादंबरीच्या प्रेरणा कोणत्या? प्रादेशिक हे विशेषण की अंगभूत घटक आहे? नागर पार्श्वभूमीवरील किंवा नागर प्रदेशातील कादंबरीचा समावेश प्रादेशिक कादंबरीत करणे उचित होईल काय? प्रादेशिक कादंबरीत निसर्ग, भू-प्रदेश आणि बोलीभाषेला महत्त्व दिले जाते? जाती-जमातीचे जीवन चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा समावेश प्रादेशिक कादंबरीत करणे शक्य आहे

का? प्रादेशिक कादंबरीत प्रातिनिधिकतेला व्यक्तीपेक्षा समाजजीवन चित्रणाला आणि लोकसंस्कृतीला महत्त्व का देते? ह्यासारख्या प्रश्नांबाबत अभ्यासकांमध्ये मतभेद असलेले दिसतात, काही घटकांबद्दल एकमतही दिसते. विशिष्ट असा भू-प्रदेशातील प्रांतातील जीवनाचे समग्र चित्रणाची अपेक्षा प्रादेशिक कादंबरी करते, प्रादेशिकतेत विविध घटकांचा अंतर्भाव होतो. शहरी पार्श्वभूमीवरील कादंबरीला प्रादेशिक कादंबरी म्हणणे योग्य होत नाही किंवा पार्श्वभूमी म्हणून येणाऱ्या निसर्गप्रदेशाचे चित्रण करणाऱ्या कादंबरीसही प्रादेशिक कादंबरी म्हणता येणार नाही. उलट विशिष्ट यंत्रयुगापासून दूर असलेल्या जीवन चित्रणाला किंवा जाती जमातीच्या चित्रणाला प्रादेशिक कांदबरीत समाविष्ट करता येईल.

प्रादेशिक कादंबरी प्रातिनिधिकतेला, समूह मनाच्या गजराला, अपरिहार्य निसर्गाला, लोकभाषेला, सामान्य माणसाच्या भावभावनांच्या चित्रणाला आणि ग्रामीण लोकजीवनाच्या पार्श्वभूमीला विशेष महत्त्व देते. लोकसंस्कृतीच्या चित्रणाशिवाय प्रादेशिक कादंबरी अपूर्ण राहू शकते. प्रदेश किंवा निसर्ग उपरा न ठरता अंगभूत घटक, पात्र म्हणून येतो. ह्या साहित्याच्या प्रेरणाही वर्तमान वास्तववादी आहे. विश्वव्यापी रोमॅंटिक चळवळीची अभिव्यक्ती आणि सामान्य माणसाला अग्रस्थान ह्या प्रकारच्या कादंबरीची प्रेरणा आहे.

प्रादेशिक कादंबरीची उपरोक्त विवेचनाच्या आधारे पुढीलप्रमाणे व्याख्या करता येईल, उद्योग प्रधान संस्कृतीपासून दूर असलेली विशिष्ट भू-प्रदेशातील निसर्ग, परंपरा, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक समस्यांचे आणि लोकसंस्कृतीचे बोलीभाषेतील वास्तव, अस्सल कलात्मक चित्रणास प्रादेशिक कादंबरी म्हणता येईल. स्वातंत्र्योत्तर प्रादेशिक कादंबरी ही तत्पूर्वीच्या 'आडगावचे चौधरी' (बी. रघुनाथ), 'भावीण' (बा. भ. बोरकर), 'बळी' (विभावरी शिरूरकर), 'बनगरवाडी' (व्यंकटेश मांडगूळकर), 'हद्दपार' (श्री. ना. पेंडसे), 'सराई' (र. बा. दिघे), 'गावगुंड' (ग. ल. ठोकळ), 'पवनाकाठचा धोंडी' , 'पडघवली' (गो. नी. दांडेकर) व अन्य

कादंबऱ्यांच्या पार्श्वभूमीवर ठळक अशा जवळजवळ दिडशे ग्रामीण-प्रादेशिक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या सर्व कादंबऱ्यांचा विस्ताराने विचार करणे केवळ अशक्य आहे. त्यातील वळणावरच्या निवडक कादंबऱ्यांनी जी नवी दिशा मराठी कादंबरीला बहाल केली. त्यांच्या आधारे प्रदेश वैशिष्ट्यांची मांडणी करता येईल. तसेच प्रदेशाचा लोकमानसावरील प्रभावही स्पष्ट करता येईल. साधारणत: लेखक ज्या प्रदेशात जन्मतो, वाढतो, घडतो त्यांच्यावर त्या प्रदेशाचे संस्कार झालेले असतात, त्यांचा परिणाम त्याच्या निर्मितीवरही दिसतो.

***

## २ पश्चिम महाराष्ट्र

'फकिरा', ' माझगाव', 'बारी', 'देव चालले', 'माकडीची माळ', 'वारणेचा वाघ', 'टारफुला', 'गोतावळा', 'कुणाच्या खांद्यावर', 'इजाळ', 'चौंडक', 'कागद' आणि 'सावली पाचर' इत्यादी कादंबऱ्यातून चित्रित झालेला प्रदेश हा देश किंवा घाटावराचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. कोल्हापूर, सातारा, सांगली, नाशिक, नगर, सोलापूर इत्यादी जिल्ह्यांचा समावेश होतो. हा माणूस भाविक तसाच रांगडा, कष्टाळू, शूर, लढवय्या आणि मुजोर आहे. तो पंढरीच्या विठ्ठलाचा भक्त आहे. तसाच खंडोबा, जोतिबा, यल्लमा, आंबाबाई, भैरोबाचाही भक्त आहे. नेहमीच्या दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे देशावरील माणूस उपजीविकेसाठी मुंबईसारख्या महानगरात जातो किंवा साखर कारखान्यांवर ऊस तोडणीसाठी नगरी माणूस स्थलांतर करतो. तसेच देशावरचा शेतकरी शेतावर घर करून राहतो. ह्याचे कारण तो अल्पभूधारक-भूमिहीन शेतमजूर आहे. त्यामुळे शेतीतून अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी त्याला शेतावर रहावे लागते. ह्या प्रदेशातील घरांची रचना कमी पावसामुळे साधारणपणे पत्रे-सिमेंट किंवा उसाच्या पाचटाने शाकारलेली छपरे किंवा विटामातीची धाब्याची अशी दिसतात. येथे आदिवासी समाज नसला तरी कोल्हापूरच्या बाजूला आदिवासी आहेत. देवदासी ही सामाजिक संस्था येथे असलेली दिसते. येथील लोक शूर, पराक्रमी असल्याने आणि प्रतिकूल निसर्गामुळे त्यांचे सैन्यात भरती होण्याचे प्रमाण अन्य प्रदेशाच्या तुलनेत सर्वाधिक आहे. देशावरचा दलित महार हा बलुतेदार असतो, परंतु मांग हा सनदशीर शिपाई असतो. देशावराचा माणूस झटपट परिवर्तनाला सामोरे जातो. इंग्रजांच्या राजवटीत देशावरच्या दलितांनी झटपट ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याचे दिसते किंवा

यंत्रयुगामुळे येथे शेतमजुरीचा प्रश्न निर्माण झाला. ह्या प्रदेशाची स्वतंत्र बोली आहे. ती कोल्हापुरी, सातारी, पुणेरी आणि नगरी ह्या उपप्रकारांनी दृष्टीस सापडते. भजनाच्या वेळी देशावर टाळ, मृदुंग वाजविले जातात, असे दिसते. मुंबई-पुण्याच्या प्रभावामुळे आणि कर्मवीर भाऊराव पाटलांच्या कार्यामुळे शिक्षण आणि जागृतीस येथे अगोदर सुरुवात झाली. त्याचा परिणाम म्हणून आधुनिकीकरणाचे विचार येथे लवकर आले. १९६० नंतरची ही कादंबरी स्वप्नरंजनातून बाहेर पडली आणि अधिक वास्तववादी बनली. मोडकळीस आलेला गावगाडा, कुळ कायदा, उपेक्षितांचे जीवन चित्रण, भ्रष्टाचार ह्यासारखे नवे जीवन अधिक यथार्थपणे निवेदन संवादासह बोलीभाषेत आलेले दिसते.

**अण्णाभाऊ साठे :**

वारणेच्या खोऱ्यातील मानव समूहाचे जीवनदर्शन स्वातंत्र्योत्तर काळामध्ये कादंबरीतून समाजवास्तवाचे दर्शन घडू लागले. उपेक्षितांच्या जीवनचित्रणाच्या प्रेरणेतून अण्णाभाऊ साठे ह्यांनीही लेखन केले. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांनी स्वत:चे असे खास स्थानही निर्माण केले. ग्रामीण माणसाच्या जीवनातील संघर्ष अण्णाभाऊंच्या लेखनाचा विषय झाला. ग्रामजीवनातील नाट्य त्यांनी टिपले. दुर्लक्षित, अव्हेरलेले जीवन आणि माणसे साहित्य विषय झाले. विभावरी शिरूरकर ह्यांची 'बळी' किंवा मांडगुळकरांच्या 'बनगरवाडी'तील जीवनदर्शनाप्रमाणे अण्णाभाऊ साठे ह्यांनी हातावर पोट भरणाऱ्या श्रमजीवी वर्गाचे जीवनदर्शन घडविले. एका विशिष्ट खालच्या स्तरात जन्माला आल्यामुळे त्यांना उपेक्षितांच्या जीवनातील अनुभव अधिक उत्कटतेने घेता आले. ह्या लोक जीवनाशी समरस झाल्यामुळे त्यांना ते अनुभव घेणे शक्य झाले.

अण्णाभाऊ साठे ह्यांनी विविध विषयावरील ३२ कादंबऱ्या लिहिल्या असून ह्यातील काही कादंबऱ्यांतून ग्रामजीवनातील संघर्ष चित्रित केला आहे. अण्णाभाऊंनी ज्या कादंबऱ्या लिहिल्या त्यात दलित जीवनाचा वेध घेण्याची दृष्टी कमी आहे, असे भालचंद्र फडके म्हणतात, ते सार्थ वाटते. कारण अण्णाभाऊ दलित समाजातील असूनही ते स्वत:ला ग्रामीण लेखक म्हणतात. थोडक्यात विविध विषयांवर त्यांनी

लेखन केलेले असले तरी स्वत:ला ग्रामीण साहित्यिक म्हणतात. तेव्हा वारणेच्या खोऱ्यातील दलित, मागासवर्गीय आणि शेतकऱ्यांचे जीवनदर्शन घडविणारा कादंबरीकार म्हणूनच त्यांच्या कादंबरीचा परामर्श घेणे योग्य वाटते.

'फकिरा' कादंबरीचा विषय जोगीण विषयीच्या लोकसमजातून घडला आहे. वाटेगाव आणि शिगावच्या लोकांतील संघर्षाची ही कथा आहे. वाटेगावचे शंकरराव पाटील राणू मांगाजवळ गावामध्ये जोगणीची जत्रा भरत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करतात. त्यामुळे राणोजी शिगावच्या जोगणी पळवितो. शिगावच्या लोकांकडून त्यावेळी अन्यायाने तो मारला जातो. गावामध्ये जोगणीची जत्रा सुरू होते. शिगावचे लोक जोगणी पळविण्यासाठी धडपडतात. परंतु राणोजीचा मुलगा 'फकिरा' जत्रेचे वेळी जोगणीचे रक्षण करतो. इंग्रज राजवटीत संघर्ष पुकारतो परंतु पाठबळाअभावी इंग्रजांना शरण जातो. फकिराच्या पराक्रमाची ही कथा आहे.

महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनातील अत्यंत खालच्या स्तराचे वास्तवदर्शन फकिरातून घडते. एवढेच नव्हे तर संस्कृती विनाशाचे दु:खही व्यक्त होते. सनदशीर शिपाई असणारी मांग जमात वहिमी ठरविली जाते. हजेरी किंवा हद्दपारी त्यांच्यावर लादली जाते. डॉ. वसंतराव डोळस म्हणतात, "अण्णाभाऊंच्या कादंबरीलेखनामागे जगलेल्या जीवनाचे चित्रण करणे ही भूमिका दिसते. कारण हे जीवन जगले अनुभवले तेच फकिरातून चित्रित झाले आहे. नाट्यात्मकतेच्या सोसामुळे घटनाप्रसंग भडक आणि अतिशयोक्त झाले असून व्यक्ती चित्रण मात्र स्वाभाविक जिवंत झाले आहे." व्यक्तीच्या कृती-उक्तीतून प्रदेश जिवंत होतो. राणू मांग हा साहसी, पराक्रमी, गावावर उत्कट प्रेम असलेला, श्रद्धाळू, सनदशीर शिपाई आहे. गावात जोगणींची जत्रा भरावी म्हणून तो बलिदान करतो. शंकरराव पाटील श्रद्धाळू, न्यायप्रिय, सद्वर्तनी, प्रेमळ, जातिभेद न मानणारे आहे. राणूच्या बलिदानामुळे गावात जत्रा भरू लागल्यामुळे दानशूरपणे त्याच्या कुटुंबीयांना मदत करतात. पारंपरिक गावगाड्याचे दुसरे चाक विष्णुपंत कुलकर्णी हे जातिभेद न पाळणारे न्यायप्रिय आहेत. राणूच्या पराक्रमाचे,

बलिदानाचे स्मरण करून त्याच्या बायकामुलांनी दर्शन घ्यावे म्हणून ते जोगणी थांबवितात. रावसाहेब पाटील हा जुलमी, अन्याय, अत्याचार करणारा स्वार्थी आहे. फकिरा हा कादंबरीचा नायक गावावर प्रेम करणारा, इमानी अन्यायाची चीड असणारा, आज्ञाधारक, मांगांना जगविण्याची धडपड करणारा, इंग्रज सरकारला विरोध करणारा, आप्तेष्टांवरील प्रेमाखातर आणि पाठबळाअभावी इंग्रजांना शरण जातो. दौलत, राधा, राहीबाई, सावळा ही मांग जमातीतील प्रातिनिधिक पात्र आहेत.

'फकिरा' कादंबरी वाटेगावकरांच्या समूहजीवनाची आणि समूहमनाची कथा आहे. ह्या सामाजिकतेतून प्रादेशिकता सजीव आणि परिणामकारक झाली आहे. राणोजी मांगासाठी शिर द्यायला गावकरी तयार होतात किंवा फकिराने रावसाहेब पाटलाच्या तोंडात मारताच गावकरी संघटित होतात. डॉ. नागनाथ कोतापल्ले ह्यांनी फकिरामध्ये संपूर्ण एक गावच्या गाव उभे राहते असे म्हटले आहे, ते ह्या सामूहिकतेमुळेच. जोगणी प्रकरण केवळ वाटेगाव, शिगावातच घडू शकते. महाराष्ट्राच्या अन्य प्रदेशात जोणगीवरून संघर्ष होऊशकत नाही, हा संघर्ष जोगणी विषयीच्या स्थानिक-प्रादेशिक लोक समजातून झाला आहे.

सांगली जिल्ह्यातील वारणानदी काठच्या वाटेगाव-शिगाव ह्या प्रदेशाची भौगोलिक पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. फकिराची कथा म्हणजे अन्यायाविरुद्ध दिलेल्या टकरीची कथा आहे. 'फकिरा हे उत्कट जीवन दर्शन आहे, असे ल. रा. नसिराबादकर म्हणतात. त्यांचा हा अभिप्राय योग्य वाटतो. कारण इथे इंग्रज सत्तेविरुद्ध आणि त्यांच्या नव्या कायद्यामुळे होणाऱ्या अन्यायाविरुद्ध, अत्याचाराविरुद्धचा संघर्ष चित्रित झाला आहे. राम भट म्हणतात की, '...हिरवट रांगडेपणामुळे ती कादंबरी मराठी सहित्यात एकदम उठून दिसली त्यात अस्सल रांगडा ग्रामीण मातीचे चित्रण होते. त्यामुळे प्रामुख्याने मध्यमवर्गीय लेखकांनी निर्माण केलेल्या मराठी साहित्यात एकदम नवीन प्रवाह आल्यासारखे झाले.' राम भटांना विषयातील नावीन्य महत्त्वाचे वाटते. कारण ह्यापूर्वी उपेक्षितांचे जीवन चित्रण इतक्या जिव्हाळ्याने अपवादानेच होत होते.

ग्रामीण मातीची भू-प्रदेश निसर्गाची पार्श्वभूमी त्या जीवनदर्शनाला लाभली आहे.

वारणेपासून कृष्णेपर्यंतचा प्रदेश, वाटेगावजवळचा माळ आणि पश्चिमेला सह्याद्रीचा प्रचंड डोंगर, तांबखडी, सातदरे, वेडीवाकडी वळणे घेणारी गाडीवाट ह्यातून सह्याद्रीच्या कड्यालगतचा प्रदेश जिवंत केला आहे. वाटेगावच्या काळ्या, कसदार जमिनीचा (पृ.२०) उल्लेख भू-वैशिष्ट्ये सूचकच आहे. वाटेगावच्या पश्चिमेला सह्याद्री पर्वत तर पूर्वेला देश आहे. उंच डोंगर, घनदाट जंगल आणि कुरण हे खास प्रदेश वैशिष्ट्ये आहे. सह्याद्रीचे कडे, दऱ्या ह्या प्रदेशात असल्यामुळे फरार झालेल्या, इंग्रजाविरुद्ध लढणाऱ्या फकिराला त्याच्या आश्रयाने लपता येते. स्वसंरक्षण करणे शक्य होते. म्हणून फकिरा तेथे वाढतो. तळ ठोकून राहू शकतो. थोडक्यात सुपीक, सखल मैदानी प्रदेश आणि सह्याद्रीच्या डोंगर दऱ्यांची पार्श्वभूमी अण्णाभाऊंनी फकिरात चित्रित केली आहे. विशिष्ट डोंगराळ प्रदेशामुळेच येथे फकिरा अनेक दिवस इंग्रज सत्तेच्या हातावर तुरी देऊ शकला. फकिरामध्ये लेखक-कादंबरीच्या कथानकातून व्यक्त होणारा काळ, व्यक्तींची मानसिकता व समाज मनातील भाव ह्यांच्यासाठी निसर्गाचा कौशल्याने वापर करत असलेला दिसतो. उदा. हळुहळू पावसाळी वारं उठलं आणि भन्नाट सुटलं. आकाशात काळ्या ढगांनी गर्दी केली. पाण्यात मासा पोहावा तशी ढगात वीज सळसळू लागली. विजेच्या प्रखर प्रकाशात कोसळणाऱ्या बेतात आल्यासारखं दिसू लागलं. अक्राळविक्राळ आकृत्याकरून ढग गिरक्या घेऊ लागले. वारा त्या ढगांना चेंडूप्रमाणे हेलपू लागला. (पृ.१०)

अशाप्रकारे प. महाराष्ट्रातील पावसाळ्याचे वर्णन लेखक सहज करून जातो. अतिवेगाने वाहणारे वारे, विजांचा कडकडाट, अंधार, काळे ढग, त्यांच्या अक्राळविक्राळ आकृत्या फक्त प. महाराष्ट्रातच दिसू शकतात. राणोजीच्या मानसिकतेनुरूप निसर्ग चित्र लेखकाने रेखाटले आहे. लोकजीवनावर परिणाम करणारे निसर्गवर्णन लेखकाने केले आहे. वाटेगावमध्ये जोगणीची जत्रा भरणार म्हणून आनंदलेल्या लोकांच्या भावानुरूप

निसर्गवर्णन पहा.

"पावसानं आखडलेले पाय पसरले. आकाशातून मुसळधार पाऊस वर्षाव करू लागला. विजेचा लखलखाट नि मेघांच्या गडगडाटाने सृष्टी हादरली. बियांचे कण मातीत रुजले आणि लहान अंकूर वर आले. हळुहळू काळी वावरं हिरव्या शालीत झाकूल गेली... आकाश निरभ्र झाले... निळ्या आसमंतात चपळ पाखर भिटणीस लागली. शिवारात सुगीची हातगायी सुरू झाली." (पृ. ३५) ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणाऱ्या निसर्गाचे चित्रण (पृ. ४४) लेखकाने केले आहे. सृष्टीतील बदल टिपण्याचे लेखकाचे सामर्थ्यही येथे दिसते. नवी पालवी आलेली झाडी, निवडुंगाची लाल बोंड ह्यातून वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश चित्रित होतो. फकिरा कादंबरीत चित्रित झालेले विश्व स्वातंत्र्यपूर्व काळातील आहे. लोक समाजावर आधारित असा कादंबरीचा विषय आहे. त्यातून समाज वास्तवाचे प्रभावी चित्रण लेखकाने केले आहे. स्वत: लेखकाने कादंबरीच्या कैफियतीमध्ये म्हटले आहे की, "हा फकिराही माझा होता. जे साकार नाही त्याला आकार देण्याचे सामर्थ्य माझ्या ठायी नाही. जे पाहिले, अनुभवले, एकले तेच मी लिहिले आहे." (प्रस्तावना पृ. १) स्वानुभवलेले महार, मांग जातीचे जीवनदर्शन घडविणे हा ह्या कादंबरीचा विषय आहे.

गावगाड्यात पाटील कुलकर्णी ह्यांना विशेष महत्त्व होते. त्यांच्या शब्दांना मान दिला जात होता. म्हणून शंकरराव पाटलांच्या शब्दाखातर राणोजी शिगावच्या जोगणी पळवितो. बलिदान करतो. तेव्हा मांग जमात गावात जागल्याचे काम करीत होती. सनदशीर शिपाई असल्यामुळे मांगाची तलवार पुजली जात होती. गावपंचायतीच्या शब्दाबाहेर समाज जात नव्हता. एकदिलाने गाव नांदत होते. वरिष्ठ जातीतील लोकांशी मागासवर्गीय विशिष्ट अंतर ठेवून वागत होते. गावासाठी झटणाऱ्यांचे कौतुक केले जात होते. तसेच धनिक लोक इमानी मागासवर्गीयांना हाताशी धरून आपला फायदा करून घेत. गावातील पाटील आणि कुलकर्णी त्यांना मान देत. पंच निस्वार्थी, निर्भीड होते. असेच स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजजीवन दर्शन फकिरातून लेखकाने घडविले आहे.

गावातून जोगणी फिरल्यानंतर संकट येत नाही. दु:ख, दारिद्र्य टळते, अशी

लोकांची समजूत असल्यामुळे वारणेच्या खोऱ्यात जोगणीच्या जत्रेला विशेष महत्त्व दिले जाते. ह्या लोकसमजातून शिगावच्या जोगणी राणू मांग पळवितो आणि दोन गावांमध्ये संघर्ष होतो. जोगणी खास प्रादेशिक आहेत. इतरत्र जोगणी पळविण्याचे प्रकार आढळत नाहीत. दौलती मांग जोगणीविषयी माहिती देताना म्हणतो,

"दोन बैती नवरानवरी व्हायची नि त्येंची वरात काढायची. नवरीपाशी खोबऱ्याची वाटी असती ती पिवळ्या फडक्यात असती जर ती वाटी कुणी पळवली तर गावची जत्रा बंद व्हायची, आणि ज्या गावात ती वाटी जाईल त्या गावात जोगणीची जत्रा भरायची असा रिवाज हाय. पर वाटी पळवणारा आपल्या हद्दीत घावला तर त्याच डोस्क मारायचा बी रिवाज हाय...ती नुसती वाटी न्हवं. ती त्या गावची अब्रू असती." (पृ.१७) जोगणी आषाढी अमावस्येला निघतात. जोगणी हा बलुतेदारांचा खेळ आहे. न्हावी झडपीण होऊन सूप फिरवितो. चांभार लाकडी घोड्याला बोराटीची काटेमधून लोकांना दूर करतो. बोराटीचा काटा लागला तर अशुभ समजले जाते, म्हणून कुणीही पुढे येत नाही. दूर राहतात. कैकाड्याच्या अंगात येते. बाहेरगावचे लोक जोगणी पळविण्यासाठी धडपडतात. जोगणी पळविणाऱ्याने गावची शिव ओलांडली तर पुढील वर्षी आषाढीला त्या नवीन गावात जत्रा भरते. जोगणीच्या निमित्ताने निर्माण झालेला संघर्ष हा ह्या कादंबरीचा एक महत्त्वाचा धागा आहे, ह्यातून लेखकाने सांस्कृतिक जीवन दर्शन घडविले आहे.

इंग्रजांच्या राजवटीत कुलकर्णी, पाटील ह्यांना विशेष महत्त्व दिले जात होते. ह्या पारंपरिक गावगाड्यात त्यांच्या सल्ल्याने गाव कारभार चाले. मांग जमात त्या काळात सनदशीर शिपाई किंवा राखणदार म्हणून काम पहात. सनदशीर शिपाई असलेल्या मांगावर गावच्या राखणाची जबाबदारी होती. गावात चोरी झाल्यास त्यांना जाब विचारला जात असे. ह्याचेही चित्रण येथे आले आहे.

धार्मिकबाबतीत इंग्रज राज्यकर्ते ढवळाढवळ करीत नव्हते. शिगावची जोगणी पळविली गेली. ह्या संघर्षात सहा माणसे कामी आली. कैक जखमी झाली. परंतु

सरकारने ह्याची चौकशीदेखील केली नाही. धन दांडगे सरकारची लाचारी पत्करून फंदफितुरी करून स्वार्थ साधत होते. बापू खोताचे लष्करी अधिकाऱ्यांशी चांगले जमत होते. तोच सावळा, फकिरा ह्यांच्याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांकडे चहाडी करीत होता. त्यामुळेच सावळाला हद्दपार केले जाते. इमानी मांग जातीला सरकारने कायद्याने गुन्हेगार ठरविले. त्यांच्यासाठी हजेरी सक्तीची केली. हजेरीचे अधिकार पोलीस पाटलाला दिले. हजेरीच्या निमित्ताने मांग जमातीची पराक्रमी वृत्ती नष्ट करण्याचा सरकारचा उद्देश असल्यामुळे मांगांवर अन्याय, अत्याचार केले जात होते. विनाचौकशी हद्दपार केले जात होते. मांग जातीतील झुंजार वृत्ती नमावी, नाहीशी व्हावी, त्यांनी लाचार व्हावे हाच त्या कायद्याचा हेतू होता. (पृ. ६८) गुन्हेगारांना पकडण्यासाठी इंग्रज अधिकारी फोडा-झोडा नीतीचा अवलंब करत होते. काट्याने काटा काढण्याची इंग्रज नीती असल्यामुळे गुन्हेगारांच्या शिक्षा माफ करून त्यांना जवळ करून गुन्हेगारांना पकडण्याची खटपट ते करीत असत. इंग्रज सरकार स्वार्थासाठी कार्य करीत होते. जनतेची काळजी त्यांना नव्हती. गुन्हेगारांना पकडण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांना ओलीस ठेवले जात होते. उदा. मांग वस्तीत

दारकोंड करून वाटेगावच्या सर्व मांगांना नेल्र्यांच्या छावणीत ओलीस ठेवले. त्या निमित्ताने फकिरा इंग्रजांना शरण गेला. धार्मिक बाबतीत इंग्रज सत्ता हस्तक्षेप करीत नसली तरी गुन्हेगारांना शिक्षा करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब ही सत्ता करीत होती. मागं जातीतील झुंजार वृत्ती नमावी म्हणून त्यांना गुन्हेगार ठरविणे, विना चौकशी हद्दपारी, हजेरी दारकोंड करून ओलीस ठेवणे, त्यानिमित्ताने गुन्हेगारांना कैद करणे, लाचार बनविणे असे राजकीय जीवनाचे स्वरूप स्पष्ट दिसते. 'मांग जमातीच्या खडतर, धाडसी व प्रसंगी करुणाजनक जीवनाचे चित्रण वाचकांचे लक्ष व सहानुभूती ओढून घेतल्याशिवाय राहात नाही' असे, मा. श्री. कुलकर्णी म्हणतात. कारण गावगाड्यातील सनदशीर शिपाई-मांगांच्या करुण जीवनाकडे गावकऱ्यांचे लक्ष जात नाही. राणू मांग

जोगणी पळविण्याच्या नादात बलिदान करून गावावर उपकार करतो, म्हणून शंकरराव पाटील त्याच्या कुटुंबीयांना धान्याचे पोते देतो. कुलकर्णी सहानुभूती दाखवितात.परंतु इतर मांगाच्या पोटाचा प्रश्न सुटत नाही. सुगीच्या दिवसापर्यंत पावसाळ्यांत मागांना चोर बनावे लागते. आर्थिक परिस्थितीमुळे उपजीविकेसाठी चोर बनणे भाग पडते. कण्या शिजवून खाणे, चोरीची मक्याची कणसे खाणे, रोजगार मिळाला तर रोजाने जाणे ह्याशिवाय त्यांना पर्यायच नाही. उन्हाळ्यात चऱ्हाट वळणारी मांग जमात पावसाळ्यात शेंडा गोंडा चोरून खातात. उन्हाळा पावसाळ्यापेक्षा रोगराई आणि दुष्काळाच्या परिस्थितीत मांग जमातीची वाताहत होते. पंतांकडून मदत होईल, अशी अपेक्षा ठेवून फकिरा त्यांच्याकडे जातो, तेव्हा पंतांचीही परिस्थिती फारशी वेगळी नसते. ते मांगांना जगण्याचा सल्ला देतात. त्याचा अर्थ ओळखून ते दरोडा घालतात. दुष्काळाची झळ ग्रामीण भागाला अधिक जाणवते. त्याला कुलकर्णीही अपवाद नाहीत. फकिरा आपल्या लोकांना म्हणतो,"आपुन नी कुलकर्णी एकाच वाटवर वाटचाल करतोय, मातर फरक एवढाच की आम्ही आधी पोहोचणार नि पंत वाइचं मागंनं, त्याच जाग्यावर येणार। म्हंजी मरनार, आले का ध्येनांत?" (पृ.१२६)

दुष्काळामध्ये गावकुलकर्ण्यांची ही परिस्थिती तर मागासलेल्या जमातीला रोगराई आणि दुष्काळात कसे जगावे हाच प्रश्न पडतो आणि त्यांच्यासमोर चोरी दरोड्याशिवाय पर्याय उरत नाही. सरकारदेखील दुष्काळी परिस्थितीत मदत करीत नाही, असे भीषण चित्र अण्णा भाऊंनी रेखाटले आहे. फकिराची भाषा खास ह्या मातीतील आहे. सांगली, इस्लामपूर, कराड, वाटेगाव-शिगाव परिसरातील ग्रामजीवनातील अनेक शब्द कादंबरीची अर्थघनता वाढवितात. "मातीचे संस्कार लाभलेली शब्दकलेची नवाई हा ह्या भाषेचा एक महत्त्वपूर्ण विषय असे," अ. रा. तोरो म्हणतात. हे त्यांचे विधान यथार्थ वाटते कारण ह्या परिसरातील बोलीमधील असंख्य शब्द कादंबरीत आले आहेत. उदा. निला, इजवाऱ्यांच, कथ, न्हाय, दावतो, आयुख, पायजे, संगच्या, प्वारं, लेक, खुळी, तंडू, गामे, दियाचा, इसरलो, हायती, वंगाळ, भाळी, यडंवाकडं, व्हनार, इसरू, नगां, हे शब्द ग्रामीण प्रदेश विशिष्ट बोलीतील आहेत. आरबी-

फारशी, मराठी ह्यांची संयुक्त रचना रसानुकूल वापरल्याने फकिरातील शैली गिर्रेबाज बनलेली आहे. असे डॉ. मधुकर वाकोडे म्हणतात. काही अपवादात्मक शब्द अन वाक्य फकिरात आहेत. जसे 'बेलगाम गबऱ्या भन्नाट निघाला.' 'आमी कवाचं सलामत नव्हते.' डॉ. वाकोडे ह्यांचे वरील विधान मान्य करून देखील फकिराच्या भाषेची मुळे त्या परिसरात रुजलेली आहेत. त्या प्रदेशातल्या भाषेमुळे 'फकिरा' प्रादेशिक वाटते. कादंबरीचे कथानक प्रदेश विशिष्ट जोगणीभोवती फिरते. जोगणीच्या कल्पनेशी जवळीक सांगणारे त्या मातीतील पात्र आहे आणि भाषा प्रदेशाचे रंगच घेऊनच आल्यामुळे फकिरा प्रादेशिकच आहे, हे मान्य करावे लागते.

## ३. कोकण

'सारे प्रवासी घडीचे' जयवंत दळवी, 'इंधन' हमीद दलवाई आणि 'भाकरी व फूल' ह्यासारख्या निवडक कादंबऱ्यांच्या आधारे कोकणी जीवनाची काही ठळक वैशिष्ट्ये जाणवतात. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे ह्या समुद्र किनाऱ्यालगतच्या आणि घाटमाथ्याखालील प्रदेशाचा समावेश होतो. येथील प्राकृतिक वैशिष्ट्यांचा परिणाम ह्या लोकजीवनावर निश्चितच झालेला आहे. डोंगराळ प्रदेशातला हा मानव समाज कष्टाळू, काटक, काटकसरी, मवाळ, कोर्टकज्यात रमणारा. पोटपाण्यासाठी भांडणारा श्रद्धाळू आणि भ्याड भित्रा आहे. रवळनाथ, परशुराम, दुर्गेश्वर, व्याघ्रेश्वर मंगेश, एकवीरा देवीवर कोकणी माणसांची श्रद्धा आहे. अतिवृष्टी होऊनही अल्पशा शेतीवर उपजीविका होत नाही तसेच उन्हाळ्यात पाण्याचा अभाव असतो. त्यामुळे ह्या लोकांचे मुंबईसारख्या शहरात जाण्याचे प्रमाण अधिक आहे. पुरुष वर्ग शहरात जाण्याचे प्रमाण अधिक असल्याने व जंगली श्वापदांपासून संक्षण व्हावें म्हणून येथील स्त्री-पुरुष संघटितपणे गावात किंवा वाडीत एकत्र राहतात. अतिवृष्टीमुळे येथे उतरत्या छपरांची कौलारू व खापरी घरे आढळतात. कोकण प्रदेशात भावीण ही सामाजिक संस्था आहे. ती अन्य प्रदेशात दिसत नाही. आदिवासी समाजही येथे मोठ्या प्रमाणावर असून त्यांची जीवनशैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. दलित महार समाज कोकणातला मानकरी असतो. तो परिवर्तनाला सामोरा जाण्याचे टाळतो असे दिसते. अन्यायाविरुद्ध आवाज उठविला जाण्यासाठी बौद्ध धर्म स्वीकारण्यास कोकणी दलितांनी टाळाटाळ केलेली दिसते. कोकणी, मालवणी अशा त्यांच्या स्वतंत्र बोली ठळकपणे नजरेस भरतात. भजनाच्या वेळी हे लोक टाळ, मृदूंग, चकवे ही वाद्य वाजवितात, असेही वेगळेपण दृष्टीस पडते. मुंबईशी असलेल्या संपर्कामुळे शिक्षण प्रसार आणि जागृतीचे प्रमाण सर्वाधिक दिसते. कोर्टकचेरीच्या बाबतीत ते सर्वात पुढे असतात. तसेच नोकरी-धंद्याच्या निमित्ताने त्यांनी गाव सोडल्यामुळे गाव ओस पडते. एक मात्र स्पष्ट दिसते की, साहित्यातून प्रदेश चित्रणाला सुरुवात ही खऱ्या अर्थाने येथील लेखकांनी केलेली दिसते. तरीही नजीकच्या काळात मधू मंगेश कर्णिकांनंतर नवीन लेखक पुढे आलेला दिसत नाही.

सराई :

र. वा. दिघे ह्यांच्या 'पाणकळा' ने निसर्गजीवन आणि मानवीजीवन ह्यांच्यातील भावपूर्ण एकतानतेची एक परंपरा निर्माण केली. ह्या परंपरेतीलच त्यांची 'सराई' कादंबरी आहे. निसर्ग, पात्र घटनाप्रसंग आणि रानसई हे वास्तवातील आहेत, असे स्वत: लेखकाने एका मुलाखतीत म्हटले आहे. तसेच कहाणीची कहाणी (सराई) सांगताना सराईतील जीवनचित्रण, व्यक्ती, निसर्ग स्वानुभवलेले वास्तव आहे, असे त्यांनी म्हटले आहे. लेखकाच्या ह्या स्पष्टीकरणाच्या पार्श्वभूमीवर कादंबरीच्या कथानकाचा विचार करता चार पदर स्पष्ट जाणवतात. बाप्पाजी देशपांडे इनामदारांचे लोकजीवन आणि कातोडी ठाकूर-कुणब्याचे त्याच्यावर अवलंबून असणे, मनोहर लाडीची असफल प्रीती आणि मनोहर-मनोरमेचे सफल जीवन, भिवरी-अंकुशाचे उत्कट प्रेम जीवन कुणबी-ठाकूर कातोड्यांचे समना मारवाड्याकडून होणारे शोषण, सरकारी अंमलदाराकडून होणारे शोषण ह्या विशाल पटातून सह्याद्रीच्या कुशीतील रानसई गावातील लोक जीवनाचे वास्तव चित्र लेखकाने रेखाटले आहे, ते पुढीप्रमाणे :

आप्पाजी हे रानसईचे दयाळू, दानशूर विठ्ठलभक्त आहेत. कुणब्या-कातोड्यांवर ते प्रेम करतात. प्रसंगी रागावतात. पण पोटावर मारत नाहीत. शब्दासाठी आणि मानसन्मान पाहुणचारासाठी समना मारवाड्याचे कर्ज काढतात. तुकाराम फॉरस्टर जंगलात एकट्यादुकट्या तरण्याताठ्या मुलींशी अंगलट करतो. बलात्कार करतो. बेअब्रू होऊनये म्हणून घाबरट लोक गप्प बसतात. परंतु स्वातंत्र्य प्रिय कातोडी तुकारामवर बिघडलेले असतात. दीपाजीच्या लाडीशी दारूच्या नशेत अंगलट करतो, म्हणून अंकुशा कातोड्याची बायको भिवरी त्याचे बोट रक्तबंबाळ करते. मनोहर तुकारामला लोळवतो. म्हणून तो त्याच्याशी कायमचे वैर पत्करतो. मनोहर-लाडी गप्पा करीत रानसईकडे येतात, हे पाहून केसूतात्या देशपांडे संशयाने पाहतो. बाप्पाजींच्या तो वाईटावर असतो. व्यवहारी तात्या पैशाच्या जोरावर मानसन्मान मिळविण्यासाठी धडपडतो. परंतु गावकरी त्यांना जुमानत नाहीत. सर्व न्यायनिवाडा बाप्पाजीच्या घरी होतो. म्हणून तो कातोड्यांना बाप्पांच्या विरोधात चिथावतो. ते ऐकत नाहीत. समना मारवाड्याच्या मार्फत बाप्पाजीची राजपाटी हस्तगत करण्याचे स्वप्न पाहतो. समना कर्ज वसुलीसाठी आणि जंगलातील लाकडे तोडली म्हणून तुकाराम त्यांच्यावर खटला भरतात. लाडी मनोहर संबंधाबद्दल केसूतात्या गावभर अफवा पसरवतो. सयाजीचा मुकुट दुष्टांच्या गटात सामील होतो. प्रतिष्ठित बाप्पाजी मनोहरच्या कृत्यावर पांघरून

घालण्यासाठी गरीब दीपाजीला गाव सोडायला सांगतात. त्याला आर्थिक मदत देऊ करतात. परंतु दीपाजी मदत नाकारतो. गाव सोडतो.

केसूतात्याच्या विनोबासाठी आलेले पाहुणे मनोहरला मुलगी देतात आणि स्वत:च्या मुलाशी सुभद्रेचे लग्न त्याच मांडवतात होते. ह्या लग्नामुळे केसूतात्या अधिक बिघडतात. दीपाजी जवळच्या जासई गावातील मुलाशी लाडीचे लग्न लावून देतो. गावात येतो. सासूरवासाला कंटाळून लाडी रानसईला पळून येते. तिच्यामागे काठ्या घेऊन पंचवीस लोक येतात. गावपंचायतीच्या निर्णयाप्रमाणे तिला सासरी पाठविले जाते. परंतु तिचा छळ होतो म्हणून फरारी अंकुशा तिला सोडवून आणतो. ती दीपाजीच्या घरात राहू लागते. पंच दीपाजीवर बहिष्कार टाकतात. मनोरमेला लाडीची भेट घेण्याची इच्छा असते. मनोहर-लाडीचे प्रेमप्रकरण तिलाही समजलेले असते. राजपाटीत भातलागवडीच्या वेळी लाडी-मनोरमेची भेट होते. दोघींचे चांगले जमू लागते. दरम्यान बाप्पाजी मनोहरला पुण्यात पाठवितात. पिठोरी अमावस्येला लाडी गौर आणायला निघते तेव्हा गावातील मुली तिच्यावर बहिष्कार टाकतात. ती एकटी गात गात कर्वत कडा चढून वर जाते. पुण्याहून परत आलेल्या मनोहरची भेट होते. गौर आणायला गेलेली लाडी परत आली नाही म्हणून शोधाशोध सुरू होते. सुभानराव फौजदार, बाप्पाजी आणि ग्रामस्थ तिचा शोध घेण्यासाठी येतात. तेव्हा दोघे एकत्र असल्याचे बाप्पाजीला दिसते. ते लाडीला घेऊन परत जातात. मनोहरशी बोलत नाहीत. सुभानराव मनोहरला समजविण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा प्रयत्न व्यर्थ ठरतो. घडलेला प्रकार लाडी मनोरमेला सांगते, रात्री मनोहरची गाठ घेण्यासाठी चिखल तुडवत नदीक़ाठी येतात. शेवटी माघारी जातात. तेव्हा मनोहरच्या खोलीत टेबलावर त्याच्या हस्ताक्षरातील एक पत्र सापडते. तो वऱ्हाडात दूर जातो. शाळामास्तरची नोकरी करतो. बंदूक घेऊन फरार झालेला अंकुशा धनिकांच्या घरावर दरोडे घालतो. सुभानरावाला सापडत नाही. लाडी-तुकारामच्या मोहतुराचे नाटक केले जाते. केसूतात्या अंकुशाची भेट घेऊन तुकारामच्या विरोधात भडकवितो. तो रानसईत येतो तेव्हा कातोडी समजून पोलीस केसूतात्याला गोळी घालतात. अंकुशाला अटक़ होते. समनाचे अंकुशाने नाक कापले होते, त्याचा बदला घेण्यासाठी तो तुकारामकडून भिवरीला छळतो. तो शिताफीने तुरुंगातून सुटतो व तुकारामचा खून करतो. वेळेअभावी समनाचा तो खून करू शकत नाही. तो खून मनोहरने केला असा सुभानरावला संशय असतो. लाडी-भिवरीचे ते जबाब घेतात. त्यांच्यावर पाळत ठेवतात. दरम्यान मनोहर लाडीचे संबंध

आल्यामुळे ती गरोदरही असते. तरीही मनोहरला वाचविण्यासाठी तुकारामशी शरीरसंबंध आल्यामुळे गरोदर असल्याची साक्ष ती देते, परंतु लाडीची बदनामी टाळण्यासाठी तुकारामच्या खुनाचा कबुलीजबाब अंकुशा देतो. दरम्यान मनोरमा शेताकडे लक्ष देते. समनाचे कर्ज फेडते. इनामदारांचे निरर्थक खर्च, बडेजाव बंद करते. अंकुशाला फाशी होते. लाडी आत्महत्या करते. काळनदीला महापूर आला असता मनोहर अनेकांचे जीव वाचवितो. बाप्पाजी त्यांच्याशी बोलू लागतात. समना मारवाडी पुरात वाहून जातो. बाप्पाजीवर बहिष्कार टाकणारे गावकरी मोठ्या घरात आश्रय घेतात. सर्व दृष्टांचा मृत्यू होऊन शेवटी मनोहर-मनोरमा एकत्र येतात. असे रानसईचे विसकळीत कथानक आहे. म्हणून दिघ्यांच्या ह्या कादंबरीत पिंड मूलत: स्वप्न रंजनात्मक आहे आणि तरी ह्या कादंबरीचे कथानक ज्या सामाजिक पार्श्वभूमीवर घडते ती वास्तव आहे. जीवनव्यवहाराचे जे नियम आहे, त्या नियमांनुसार रानसईतले जीवन जगले जाते. हा गंगाधर गाडगीळ ह्यांचा अभिप्राय यथार्थ वाटतो.

प्रस्तुत कादंबरीतील सर्वच व्यक्तिरेखा ह्या वास्तवातील आहेत. कोकणातील माणसांचे राग, लोभ संघर्षातून व्यक्त होतात. सर्वांच्या चित्रणातून लेखकाला अभिप्रेत असलेले रानसई गावचे चित्र आकाराला येते. रानसई गावच येथे नायक आहे. त्या गावातील सराईशी सर्वांचे जीवन एकरूप झाले आहे. सरकारी अंमलदार, तुकाराम फॉरेस्टर, सुभानराव, फौजदार आणि हार्ट साहेबांचे देखील रानसईशी नाते जोडलेले आहे. बाकी सर्वच सुष्ट वृत्तींचे आहेत. बाप्पाजीची व्यक्तिरेखा तर लेखकाच्या आजोबांची आहे, असे लेखकाने म्हटले आहे. त्यांचे जीवन लोकजीवनाशी एकरूप झाले आहे. ते ठाकूर-कातोडी-कुणब्यांच्या लोकजीवनाचा आधार आहेत. सर्वजण त्यांच्यावर अवलंबून आहेत. शीघ्रोपी आणि क्षणात शांत होणारा त्यांचा भोळा स्वभाव आहे. कातोड्यांना चोप किंवा शिव्या देणारे बाप्पाजी त्यांना भादव्यात मदत करतात. तो शिव्या देईल पण पोटावर मारणार नाही, अशी कोया कातोड्याला खातरी असते. उदार, परोपकारी, दयाळू, सज्जन आणि वचनाचा सच्चा आणि शब्दाचा धड आहे. ते वेळप्रसंगी कर्ज काढून पाहूणचार करणारे, थोडे अव्यवहारी दानशूर आहेत. जुन्या इमानदारी संस्कृतीच्या आदर्शाप्रमाणे ते जगतात. मुलांच्या लग्नात कर्ज काढून पंक्ती उठवितात. ग्रामस्थांवर पित्याप्रमाणे प्रेम करतात. दीपाजीला गावाबाहेर पाठविताना त्यांना दु:ख होते. मनोहरच्या वर्तनामुळे हे घडले म्हणून त्याच्याशी बोलायचे सोडून देतात. वडिलोपार्जित कर्ज फेडतात. बहिष्कार टाकणाऱ्या गावकऱ्यांना आश्रय देतात. मनोहर मुलगा, सुभद्रा मुलगी आणि राजसबाई धर्मपत्नी तर मनोरमा ही सून असा त्यांचा

परिवार आहे. अंधूगणू रंगाने काळाकुळकुळीत भुतासारखा दिसणारा, गालावर देवीचे व्रण, एक डोळा डुचका असलेला राहीशी मोहतूर करण्याचे आणि जत्रेत केसूतात्याचे छकडे हरविण्याचे स्वप्न साकार करतो. औंदा सोडणार नाय म्हणत राहीशी पाट लावतो. इमानेइतबारे बाप्पाजीकडे काम करतो. बाप्पाजीच्या राजपाटीवर डोळा ठेवणारा, सावकारी करणारा, स्वार्थी, कातोड्यांकडील चोरीचे भात घेणारा कपटी, कंड्या, पीकविणारा गावातील चांडाळ चौकडीचा सदस्य आहे. बिनोबा त्याचा हडकुळा मुलगा आहे. दीपाजी हा अकार्यक्षम, व्यवहारशून्य, स्वाभिमानी, कष्टाळू, अब्रूदार सज्जन आहे. मुलीच्या वर्तनामुळे गाव सोडणारा, गावाने बहिष्कृत केलेला, बाप्पाजीला राजपाटी विकणारा रडतोंडीचा घाट आहे, तर त्याची बायको बय सोशीक, कष्टाळू आहे. त्यांची मुलगी लाडी म्हणजे निसर्ग कन्याच आहे. ती मुकुटवर निरागस प्रेम करते. तुकाराम फॅरेस्टरला वश होत नाही,मात्र मनोहरवर उत्कट प्रेम करते. परंतु समाजाच्या नियमामुळे दोघांचे लग्न होऊ शकत नाही. जासईतील सासरच्या जाचाला कंटाळून परत गावात येऊन राहणारी, गौर आणणारी कष्टाळू तरुणी आहे. डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, लाडीची व्यक्तिरेखा दीर्घकाळ स्मरणात राहील अशी तिची असीम प्रीती अवखल साहस, तिचे दु:ख तिला सोसावा लागणारा अपमान ह्यांचे दिघ्यांनी कुशलतेने चित्र रेखाटले आहे. तर अन्य व्यक्तिरेखेंसंबंधी समाधान व्यक्त करून कुसुमावती देशपांडे लिहितात, 'ह्या पोरीचे हे कल्पना चित्र अद्भुतरम्य आहे. तिच्या प्रीतीला सीमा नाही. तिचे साहस अवखळ आहे. तिच्या स्वातंत्र्याला बंध नाही. तिचा विश्वास व समज अगाध आहे. तिचे दु:ख व तिला सोसावा लागलेला अवमान अपार आहे. परंतु तरीही तिची व्यक्तिरेखा अवास्तव वाटू नये इतक्या कुशलपणे चित्रित केली आहे.' लाडीचे व्यक्तित्व हे ह्या कथेतील सौंदर्याचे व रोमांचकारितेचे केंद्र आहे. ही व्यक्तिरेखा मराठी कादंबरीच्या संपदेतील एक अमोल रत्न आहे. इनामदार-कुणब्यांप्रमाणे कातोडी-ठाकूर ह्या वन्यजातीतील माणसांचे जिवंत चित्र लेखकाने रेखाटले आहे.कोया, अंकुशा, भिवरी, तानक्या ह्यांच्या चित्रणातून कातोड्यांची स्वातंत्र्यप्रिय वृत्ती तर धवा, धवीचे चित्र रेखाटून ठाकूरांची प्रामाणिक, कष्टाळूवृत्ती दिग्दर्शित केली आहे.

'पाणकळा' कादंबरीतील भू-प्रदेश, माणसं लेखकाने पाहिलेले होते, तर सराईतील भू-प्रदेश, माणसं, रानसई गाव, नदी, पर्वतकडे, भाताची शेते, लेखकाने केवळ पाहिलेलीच नाही तर प्रत्यक्ष अनुभवलेली आहे. सराईतील कुणब्यांची धावपळ त्यांनी अनुभवलेली आहे. त्यामुळे पाणकळाच्या तुलनेत वास्तव जीवनदर्शनाच्या

दृष्टीने प्रस्तुत कादंबरी सरस वाटते. सह्याद्रीच्या कुशीत रानसई गाव आणि माणसांच्या विश्वाचे दर्शन लेखक घडवितो. ह्या प्रादेशिकतेचा आणि निसर्गाचा मानवी जीवनावर झालेला परिणाम त्यातून दिसतो. निळे आकाश, सह्याद्रीच्या रांगा, पर्वतकडा, सारंगखिंड, काळाकडा, दऱ्याखोऱ्यात पसरलेली भातशेती, घनदाट जंगल, त्यातील सागवान, हेके, कोसम, ऐन, आंबे, हिरडा, बेहडा, शिकेकाई, अंजन, धावडा ही झाडे करवंदाच्या जाळ्या, तेरडा, सोनटक्की, विचुकान, मोरंग, झेंडू, कुई, काख, सायली, ह्या वेली आणि फुलझाडे, मोर, सकोत्री, कट-रावे, हरेल, आर, रानगवे, सांभर, डुक्कर इ. पक्षीप्राणी ह्यांची सृष्टी लेखक जिवंत करतो. भात हे प्रमुख पीक तर नाचणी वरी ही इतर पिके आहेत. ह्या प्रदेशाच्या प्रभावामुळे कोकणातील स्त्री-पुरुष अधिक काटक आणि कष्टाळू बनलेले दिसतात. वन्य जमाती मासे पकडून, शिकार करून, प्रसंगी चोरी करून उदरनिर्वाह करू शकतात. सावकाराकडून ते दीढीने भात घेतात. ठाकूर कवळ्याचा पाला खाऊन जगतात, जंगलातील लाकूडफाट्यावर अवलंबून असतात. निसर्ग आणि मानवी जीवन ह्यांच्यामधील भावपूर्ण एकांतता ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणाऱ्या निसर्गदृश्यांनी लेखक रेखाटतो. प्रस्तुत कांदबरीतील निसर्गदृश्य चित्रमय, रेखीव, दृक प्रत्यय देणारी आहेत. अ.ना. देशपांडे म्हणतात, "दिघ्यांची निसर्गवर्णने अनेक दृष्टींनी बहाराची आहेत. त्यात विविधता आहे. म्हणजेच त्यांनी निसर्गातल्या सौम्य तशाच रौद्र दृश्यांचेही दर्शन घडविले आहे. त्या दृष्टीने सराईमधील पावसाळा नामक प्रकरणातील भाताच्या लागवडीचे वर्णन आणि शेवटच्या अपरिहार्य ह्या प्रकरणातील सतत छत्तीस तास पडत असलेल्या मुसळधार पावसाचे वर्णन, ही वर्णन उदाहरणादाखल वाचून पाहण्यासारखी आहेत. मानवी जीवनाशी सुसंवादी अशीच निसर्गवर्णने प्रत्ययकारी आहेत." अ. ना. देशपांडे ह्यांना विशेष आवडलेल्या वरील दोन निसर्गवर्णनाप्रमाणेच गंगाधर गाडगीळ ही कादंबरीच्या सुरुवातीच्या पर्जन्यवृष्टीचे (पृ. २ व ३) उदाहरण देऊन निसर्गाच्या विविध रूपांचे एक चित्रच आपल्या डोळ्यांसमोरून सरकते. विराट कालगतीचे अस्तित्व आपल्याला सतत जाणव राहते, असे म्हणतात. पात्रांच्या मानसिकतेनुरूप येथे लेखकाने निसर्गचित्र रेखाटलेले दिसते. जसे मनोहरच्या बासरीतून निघणाऱ्या आलापांनी वेडी झालेल्या लाडीची मानसिकता (पृ. ६१) निसर्गवर्णनातून रेखाटली आहे. तसेच वादळाचे वर्णन दीपाजीच्या मानसिकतेनुरूप

आहे. जासईला लाडीचे लग्न लावून दीपाजी गावात परत येतो. बाप्पाजीची शेती करू लागतो. परंतु लाडी पळून आल्यामुळे गावपंचायत बसते. तिला सासरला पाठविण्याचा निर्णय होतो. लेखक वर्णन करतो, "...वाळीवाची मोठी वावटळ सुटली. आकाशात धूळ उठली व डोंगर दिसेनासे झाले. झाडे मोडून पडली. आंब्या-जांभळीच्या झाडाखाली फुलांचा सडा झाला....रानसईतील पोरेबाळे ह्या कडकडाटाने भेरून गेली...."(पृ.१८०) आवकळ्या पाऊस पडल्याने वैभव धबधबा काळ नदीत कोसळू लागला. नदीला पूर आला. तो पाहण्यासाठी रानसईचे लोक घराबाहेर पडले. कोक्रणातील लोकांच्या सुख-दु:खावर परिणाम करणारा, प्रभाव गाजविणारा असा हा प्रदेश विशिष्ट निसर्ग एक पात्र म्हणूनच आला आहे. ह्या सर्वांतून लेखकाने रानसई गाव जिवंत केले आहे. वास्तवता व स्वप्नमयता ह्यांचे जे मिश्रण दिघ्यांनी ह्या कादंबरीत केले आहे ते अपूर्व आहे. असे गंगाधर गाडगीळ म्हणतात. हे विधान सार्थ वाटते. कारण त्यांनी निर्माण केलेले जग वास्तव आहे. रानसईतील लोक सामाजिक व्यवहार-नियमाप्रमाणे वागतात. धनिकांकडून गरिबांचे शोषण होते. कातोडी चोरीची सवय सोडत नाही. तुकाराम फॉरस्टरकडून अब्रूला धोका असताना देखील परिस्थितीमुळे तरुण मुलींना जंगलातून लाकडाची मोळी आणावी लागते. डॉ. यादव ह्या संदर्भात म्हणतात, "स्वातंत्र्यपूर्व काळातील मध्यम दर्जाच्या शेतकऱ्यांचं वैभव भोगून ते बसले होते. डोळसपणानं ठाकूर आणि कातोडी ह्यांच्या जीवनपद्धतीचा, रीतीरिवाजांचा, स्वभावविशेषांचा त्यांनी अनुभव घेतला होता. त्या सगळ्यांचा सहानुभूतीने भरपूर तपशिलाने, बारकाव्यानिशी व रसिक मनाने आविष्कार करणारा मराठीतील हा पहिलाच कादंबरीकार. म्हणजेच सराई स्वानुभवातून जन्मली हे मान्य करायला हरकत नाही."

डॉ. यादवांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना दिघे म्हणतात, "बऱ्याच गोष्टी सांगाव्यात असं वाटलं-ह्या कादंबरीचा हिरो आहे रानसई हे गाव. ह्या गावाचं समग्र जीवन, तेथील माणसांचे सामाजिक स्तरांचे वेगवेगळे जे ग्रामीण पातळीवर संबंध असतात ते रेखाटावेत असं वाटलं. त्या वेळच्या एक मराठी खेड्याची व्यक्तिरेखाच मला रेखाटावयाची होती. खेड्यातील मध्यमवर्गीय सावकारी-संस्कृती काय असते हे मला दाखवायचं होतं. लेखकाच्या वरील विवेचनाप्रमाणे रानसई गावची आणि परिसराची जिवंत व्यक्तिरेखा साकार झाली काय? ठाकूर-कातोडी-कुणबी आणि इनामदारांचे

सावकारांचे वास्तव जीवनचित्रण करण्यात लेखकाला कितपत यश आले?" ह्याचा परामर्श घेता येईल.

इनामदार-कुणबी ह्यांच्याप्रमाणे ठाकूर-कातोड्याच्या समाजजीवनाचे चित्र प्रस्तुत कादंबरीमध्ये दिघ्यांनी रेखाटले आहे. समनासारख्या सावकाराकडून आणि तुकाराम फॉरेस्टरसारख्या अंमलदाराकडून त्यांचे शोषण होते. पिळवणूक आणि अब्रूला धक्का लागत असूनही सोशीक जनता संघर्षांचा पवित्रा घेत नाही. परंतु स्वातंत्र्यप्रिय वृत्तीचे कातोडी मात्र अन्याय सहन करीत नाहीत. बाप्पाजी इनामदार खऱ्या अर्थाने लोकजीवन जगतात. वेळप्रसंगी सर्वांना मदत करतात. इनामदार घराण्याचा पोकळ बडेजाव, अव्यवहारीपणा आणि मानसन्मानाच्या, पालकत्त्वाच्या कल्पनेमुळे मोठ्याप्रमाणावर ते खर्च करतात. देणे अधिक वसूल कमी ह्यामुळे ते कर्जबाजारी झालेले दिसतात. दानशूर, दयाळू, बाप्पाजींना राजपाटी गहाण ठेवावी लागते. कर्जवसुलीसाठी त्यांच्यावर समना मारवाडी खटला भरतो. सुदैवाने मनोरमा व्यवहारी असल्यामुळे जमिनीवर कर्ज काढून जमीन सोडविते. इनामदारांचा बडेजाव थांबविते, निरर्थक खर्च कमी करते. भाकड जनावरे कुळांना अर्धलीने देते, बडा घर पोकळ वासा अशी मोठ्या घराची झालेली परिस्थिती सावरते. उलट केसूतात्या देशपांडे सावकरीचा धंदा करतात. व्यवहारीपणे वागतात. पैशाच्या जोरावर बाप्पाजीशी स्पर्धा करून शेती विकत घेतात. सगळ्यात मोठे शिष्ट पंच होण्याचा प्रयत्न करतात. परंतु लोक मात्र चुकून देखील तात्यांच्या मागे जात नाहीत. मोठ्या घरीच सर्व खटल्यांचा न्याय निवाडा होतो. कातोडी खाल्ल्या मिठाला जागतात. तात्याच्या चिथावणीला बळी पडत नाहीत. मुलांच्या लग्नासाठी कर्ज काढून -जमीन गहाण ठेवून पंक्ती उठविण्याचा विचार करतात. वरील विवेचनावरून स्पष्ट होते की, खोट्या प्रतिष्ठेसाठी मानसन्मानासाठी अवाढव्य खर्च करणाऱ्या इनामदारांचे घराणे डबघाईला आले. भाऊबंदकीचा शाप त्यांना भोवला. तरीही त्यांची पालनकर्त्याची भूमिका त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडलेली लेखकाने दाखविली आहे.

इनामदारांप्रमाणे कुणब्यांच्या जीवनावर लेखकाने प्रकाशझोत टाकला आहे. स्वत:ची किंवा इनामदारांची जमीन आणि जंगलातील लाकूडफाट्यावर त्यांचे पोट

अवलंबून असते. अब्रूला जपत ते कष्ट करतात. जसे जंगलातून लाकूडफाटा आणण्याशिवाय त्यांच्यासमोर पर्याय नसतो. सरकारी अंमलदाराचा उपद्रव वाढलेला असतो. लाडीसारखी तरुण मुलगी वश करण्यासाठी तुकाराम फॉरेस्टर धडपडतो. तिच्या हातातील कोयता जप्त करू पाहतो. अंगलट येतो. भिवरी आणि मनोहर तिला सोडवितात. मनोहरबरोबर ती गावापर्यंत आल्यानंतर त्याला दुसऱ्या मार्गाने जायला सांगते. कुणी पाहील, अफवा पसरवतील, बेअब्रू होईल ह्याची तिला भीती वाटते. केसूतात्या पुढे दोघांसंबंधी अफवा पसरवितात. त्याचप्रमाणे अंमलदाराने बलात्कार करून देखील अब्रूसाठी मुली गप्प बसतात. कोणी तक्रार केली तरी जंगलातील लाकडे तोडली म्हणून पंचनामा करायला गेलेल्या अंमलदाराशी मुलींनीच झटापट केली, असा पुरावा समोर येतो. गरिबाचा वाली कोणी नाही, त्यांना न्याय मिळत नाही. म्हणून 'झाकली मूठ सव्वा लाखाची' असे समाजवास्तवाचे चित्रण लेखकाने केले आहे. कारण सराईतील भात भादव्यापर्यंत जपून ठेवण्यासाठी लाकूडफाट्यावर त्यांना उदरनिर्वाह करावा लागतो, असे प्रदेश विशिष्ट जीवन आहे. तुकाराम फॉरेस्टर जसे मुलींवर बलात्कार करतो आणि अब्रूसाठी भेकड लोक काही करू शकत नाही ह्याची खातरी झाल्यावर बाप्पाजीसारख्या सज्जनावर जंगलातील सागवान तोडल्याचा खोटा खटला भरतो किंवा वाघाची शिकार केली आणि वणवा लावला म्हणून मनोहर आणि गावकऱ्यांना तो खटला भरण्याची धमकी देतो. ह्यातून सरकारी अंमलदारांची अरेरावी दिसते. तुकारामप्रमाणे समना मारवाडीदेखील त्यांचे शोषण करतो. खोट्या मापाने भात घेतो. भादव्यात दीढीने त्यांना भात घालतो. व्याज-बट्ट्यात फसवितो. खोटे खटले भरतो. अज्ञानाचा फायदा घेतो, म्हणूनच अंकुशा कातोडी त्याचे नाक कापतो. त्याच्या दृष्टीने पैसा सर्वात महत्त्वाचा असतो. नदीला महापूर आला असताना देखील तो पैसे-सोने सोडून जीव वाचविण्यासाठी आलेल्यांबरोबर येत नाही. शेवटी महापुरात वाहून जातो. अस्मानीपुढे सुलतानीचे काही चालत नाही, असे लेखक ह्यातून सूचवितो.

गावपंचायतीचा निर्णय सर्वांवर बंधनकारक असतो. प्रत्येकजण त्याचे पालन करतो. अन्यथा त्याला वाळीत टाकले जाते. लाडी जासईहून पळून आली असता पंचायत लाडीला सासरी पाठविण्याचा निर्णय देते. सायपाटलाला पंचवीस रुपये दंड

आकारते. बापाने दिल्याघरात मुलीने विनातक्रार नांदायचे असा समजा संकेत लाडी मोडते, ती परत गावात येते तेव्हा दीपाजीवर गावपंचायत बहिष्कार टाकते. शेवटी गरोदर लाडीला बाप्पाजी आश्रय देतात. मोठ्या घरात तिचे बाळंतपण केले जाते. तेव्हा बाप्पाजींवरही बहिष्कार टाकला जातो. गावात आपल्या मुलामुळेच आपली बेअब्रू झाली म्हणून मनोहरशी ते बोलणे बंद करतात. पिठोरी अमावस्येला गौर आणायला निघालेल्या मुली लाडीवर बहिष्कार टाकतात. आंतरजातीय विवाहाची कल्पना समाजमान्य नसल्याने लाडी-मनोहरचे लग्न होऊ शकत नाही. गरीब दीपाजीला गाव सोडावे लागते. पांढरी सोडून जाणे त्याला कठीण जाते. नीती, जनलज्जा, अब्रूकरिता बाप्पाजी त्याला गाव सोडायला लावतात. जुलूम करतात. धनिकांच्या अब्रूपुढे गरिबाच्या अब्रूला किंमत उरत नाही. कुणब्यांवर चार प्रकारचे संकट येतात. मानवनिर्मित, समाजनिर्मित, निसर्गनिर्मित, शासननिर्मित ह्या संकटांमुळे त्यांचे शोषण होते. ते सर्व संकटप्रसंगी मूक राहिलेले दिसतात. अन्यायाविरुद्ध ते आवाज उठवू शकत नाहीत, कारण त्यांच्या नाड्या शोषणकर्त्यांनी घट्ट पकडून ठेवलेल्या असतात.

वनचे राजे असलेल्या कातोड्यांचे जीवनचित्रण लेखकाने केले आहे. नृत्याने बेभान होणारे, एकमेकांना अवघड कोडी घालणारे, अब्रू जपणारे, जीवाला जीव देणारे, निष्पाप जगात कोणाशी बांधील न राहण्याची स्वातंत्र्यप्रिय अशी त्यांची स्वच्छंदी वृत्ती असते. हातातले काम टाकून शिकारीमागे पळणारे, चोरी हा धर्म मानणारे, खोटे बोलण्याची सवय लावून घेणारे, मासे पकडण्यासाठी कोरे लुगडे बिनदिक्कत ते वापरतात. परंतु शेतात कष्ट करीत नाहीत. बांध फोडून मासे पकडतील, उंदराच्या बिळातील भात व त्यांची पिल्ले आणि जंगलचा मेवा खाऊन उदरनिर्वाह करतात. कातोड्यांची मुले दुधावर आलेल्या ओल्या भाताची लोंबरे चावून खातात. कुणबी त्यांना पकडण्याचा प्रयत्न करतात तेव्हा ते चपळाईने पसार होतात. बाप्पाजी अंधूला म्हणतात, "जाऊ दे, त्यांना नुसती दहशत बसली की पुरे. सगळीकडे सराई पिकली आहे. उंदीर, पाखरे, सावकार, कातोडी ह्या सगळ्यांची सराई पिकली आहे. मग ह्याच पोरांनी काय पाप केले आहे! ह्या सगळ्यांनी नेल्यावर जे उरेल ते आपलं." (पृ.७) ह्यावरून सर्वांचे जीवन सराईवर अवलंबून असते, हे स्पष्ट होते. त्यातील कातोडी

अधिक बेफिकीर आहेत. उद्याची काळजी उद्याला, कातोड्याला नाही. (पृ.३६) असे ते अव्यवहारी, शिकारप्रिय, स्वतंत्र वृत्तीचे आहेत. सुभानराव फौजदार अंकुशाला पोलिसांच्या स्वाधीन होण्यास सांगतो, शिक्षा कमी करण्याचे वचन देतो, तेव्हा अंकुशा म्हणतो, "लायसीन का काढले नाही? तुम्ही कुठे काढले आहे? म्हणे बंदुकीला लायसीन। शिकारीला लायसीन। पान तंबाखूला-ताडीमाडीला-दारूला लायसीन। जगायला लायसीन। मरायला लायसीन। शहरात मेलं तरी लायसीन लागतं, आमाला नाय लागत लायसीन. आमाला नाय तुमची गोष्ट कबूल" (पृ. १६१) चोरी करणे, कातोड्यांच्या कुळीचा जातिधर्म आहे. ते पोटाकरता चोऱ्या करतात, असे लाडी मनोहरला सांगते. भिवरी अंकुशाची जेलमधील भेट (पृ. २७९) कातोड्यांच्या स्वातंत्र्यप्रिय वृत्तीची द्योतक आहे. परंतु खाल्ल्या मिठाला जागण्याची त्यांची परंपरा आहे. जसे डोंगरगावच्या कातोड्यांना बाप्पाजीने मार दिला तेव्हा केसूतात्या त्यांना फिर्याद देण्याची चिथावणी देतो. फिर्यादीचा खर्च करण्यास तयार होतो. परंतु ते त्याचे ऐकत नाहीत. त्याचं आन खाल्लंय आम्ही, (पृ.४२) असे ते म्हणतात. कोया-अंकुशा बांध फोडून मासे पकडतात. परंतु दिल्या शब्दाप्रमाणे दुसऱ्या दिवशी परत बांध घालून देतात. सारंगखिंडीत बाप्पाजीची थैली सांभाळणारे कातोडी समना केवद्याला लुटतात. समनाचे नाक अंकुशा कापतो. तुकारामने बाप्पाजीवर खटला भरला असता सयाजीच्या मदतीने पुरावा नष्ट करतो. मनोरमेला मदत करतो. लाडीची बदनामी होऊ नये म्हणून तुकारामच्या खुनाचा कबुलीजबाब देऊन फासावर जातो. पाचवीला भाताच्या लोंब्या पूजण्याची परंपरा असणाऱ्या कातोड्यांचा चोरी धर्म असूनही मदत करणाऱ्याशी इमानाने वागतात. इतरत्र चोऱ्या करतात. कातोड्याच्या उलट ठाकूरांचे वर्तन असते. ते मवाळ, गरीब, कष्टाळू, प्रामाणिक, भित्रे, निरुपद्रवी आणि इमानी असतात. शब्दाला पक्के असतात. दिवाळीच्या दिवशी कुणब्यांची जनावरे ओवाळून ते पोस्त मागतात. डोंगरमाथ्यावरील शेतात राबतात. नाचणी-वरी भाजीपाला पिकवतात. इनामदारांच्या वाट्याची नाचणी प्रामाणिकपणे पोहच करतात. भादव्यात त्यांची उपासमार होते. लाकूडफाट्यावर कसातरी उदरनिर्वाह करतात. खरे बोलतात. प्राणांती खोटे बोलत नाही. आडमुठेपणामुळे शेती करतात.म्हणून फारसे उत्पन्न मिळत नाही. कवळा खाऊन

ते जगतात. धवा ठाकुराची व्यक्तिरेखा रेखाटून कवळा अन राजा जेवला म्हणणाऱ्या ठाकुरांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. डॉ. चंद्रकांत बंदिवडेकर सराईचा गौरव करताना म्हणतात, "...सराई मात्र बरीचशी अद्भुतापासून वेगळी राहिली आहे. त्यातील कातोड्यांचे, ठाकरांचे, कुणब्यांचे जीवन वास्तवदर्शी आहेच, पण बाप्पाजी व तात्या खोत ह्यांच्यातील वैमनस्य, तुकाराम फॅारेस्टरची दुष्ट कामुकता, मारवाड्याची सावकारी, ह्या सर्वच गोष्टी वास्तवाच्या पातळीवर ठेवण्यात दिघ्यांना उत्तम यश मिळालेले आहे......" हा अभिप्राय मान्य करण्यास हरकत नाही. कारण रानसईच्या सामान्य शेतकऱ्यांच्या आणि ठाकूर, कातोडी ह्या आदिवासी अन्य जमातींच्या जीवनव्यवहाराचा समन्वय लेखकाने साधला आहे. त्यामुळे प्रस्तुत कादंबरी सामान्यांचे जीवन आणि उपेक्षितांचे जीवन ह्या दोन्ही खोपोलीच्या भौगोलिक पार्श्वभूमीवरील वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक कादंबरी आहे, हे मान्य करावे लागेल.

स्वप्नरंजनात्मक कादंबरीमध्ये आर्थिक जीवन चित्रणाला विशेष महत्त्व नसते. पंरतु लेखकाला मध्यमवर्गीय सावकारी-संस्कृती रेखाटायची असल्यामुळे काही घटना प्रसंगातून कुणबी-कातोडी-ठाकूर ते इनामदार आणि इनामदार ते सावकार अशी शोषणकर्त्यांची शृंखला लेखकाने रेखाटली आहे. मारवाडी, कालण(दारुवाले), चिकीवाले, पानवाले आणि बांगड्यावाले देखील त्यांचे शोषण करतात. आर्थिक लुटीबरोबर अब्रूची देखील लूट केली जाते. बाप्पाजीसारख्या नेकीच्या माणसाला घराच्या दुरुस्तीसाठी खर्च करता येत नाही. मनोहर घराला मेडीचा आधार देतो. किंवा केवढ्याचे कर्ज फेडण्यासाठी समनाकडे मोठ्या आईची नथ गहाण ठेवतो. रावबहादूर सुभद्रेला पहायला आले असता पाहुणचारासाठी लागणाऱ्या वस्तू समना देत नाही म्हणून अंधूच्या डोक्यावर मागल्यादाराने विक्रीसाठी भात पाठविला जातो. त्यांची पाच हजार रुपये हुंड्याची मागणी झेपत नाही. कर्ज वसुलीसाठी समना खटला भरतो. पिढ्यान्‌पिढ्या इनामदारांवर कर्ज असते. सावकार व्याजात सर्व भात खोट्या मापाने घेतात. अशाप्रकारे इनामदारांच्या डबघाईला आलेल्या आर्थिक परिस्थितीचे चित्रण येथे केले आहे. त्याचप्रमाणे वर्षभर कष्ट करणाऱ्या कुणब्याच्या हातात काहीच शिल्लक राहात नाही. दीपाजी वर्षभर सहकुटुंब राबतो. भात पिकवतो. खळ्यावर समनाला आणि

इनामदाराला भात देऊन रिकाम्या हाताने परत जातो. जमीनदार कुणब्यांना भाताच्या मापात फसवितात. ते सराई पिकवितात आणि जमीनदार सावकारांची कोठारे भरवितात. भादव्यात उपाशी राहण्याची वेळ त्यांच्यावर येते तेव्हा व्यापारी किंवा जमीनदारांकडून दिलेले भात घेतात. इनामदाराला व्यापारी फसवितात. अंधूला समना फसवितो. हे वर्षानुवर्षे चाललेले असते. कुणब्याने कितीही पिकविले तरी मारवाडी, काळण चिकीवाले त्यांचे शोषण करतात. अज्ञान आणि अव्यवहारीपणामुळे त्यांचे आर्थिकदृष्ट्या शोषण होते. जसे अल्पदराच्या वस्तूसाठी कुणब्याच्या बायका मागल्या दाराने पायली पायली भात घालतात. सराई कुणब्यांच्या मेहनतीवर अवलंबून असते. मेहनत-मशागत चांगली केली, पाऊस झाल्यावर चिखल चांगला केला तरच भात पिकतो. दीपाजी नेहमी, श्रम करण्यात कमी पडतो. त्यामुळे त्याचा कमी भात पिकतो. बाप्पाजी त्याला त्यामुळेच रडतोंडीचा घाट म्हणतात. सर्व व्यवहारावर सराईवर अवलंबून असतात. वायदे, लग्न, कपडे-लत्ते घेणे सर्वांना जामीन सराई असते. लेखक वर्णन करतो.

"माजलेल्या गवतावर जनावरे तयार होऊ लागली. गरीब शेतकऱ्यांच्या घरातील दाणा पार संपला. एक महिन्याकरिता कर्जाऊ भाताची दिढी घालण्याचे कबूल करून भात नेण्याकरिता कुळांचे जमाव सावकारांच्या ओटीवर बसू लागले. भात शेतीच्या प्रदेशातील भादवा काळ म्हणजे हिरवा दुष्काळ. ह्याच प्रदेशात ज्यावेळी अपरंपार पाऊस पडून सगळीकडे हिरवेगार झालेले असते, त्यावेळी भुकेने शेतकऱ्यांचे चेहरे उदास होतात. ज्यावेळी कणसातील भात दूध घेत असते त्यावेळी घरातील दाणा खलास होतो. ज्यावेळी विपुल गवत खाऊन जनावरे तयार होतात. त्यावेळी शेतकरी फाट्यांसारखे सुकतात....ठाकूर कवळ्याच्या भाजीवर दिवस काढू लागले.कातोडी मिल्ही व मासळी ह्यांच्यावर भूक शांत करू लागले.."(पृ.२२३) ह्या वर्णनावरून प्रदेशावलंबी जीवनाची कल्पना येते. नाचणी-वरी पिकविणाऱ्या प्रदेशात वास्तव्य करूनही भातापासून वंचित राहावे लागले, जसे धवा ठाकूर मनोहरला सांगतो, "...आम्ही ठाकूर मान कापली तरी खोटं काम करणार नाही. खोटं बोलणार नाही. सराई कातोडी, मराठे, इनामदार ह्यांची पिकली. किडामुंगी, पाखरे ह्यांची सराई पिकली.

आमची नाय पिकली." (पृ.७२) सराईचा फायदा ठाकुरांना होत नाही, ही जनजातीच्या जीवनातील प्रादेशिकता लेखकाने नोंदविली आहे.

येथे शुभाशुभाच्या कल्पना, रीतीरिवाज, परंपरा, समजुती, अंधश्रद्धा, यात्रा-उत्सवांचे वर्णन केले आहे. जसे कोल्याचे तोंड पाहणे शुभ समजले जाते. नव्याच्या पुनवेला दारावर लोंबरे बांधली जातात. भूत-देवरशावर विश्वास ठेवला जातो. तुऱ्याचा कोंबडा भगताला दिला जातो. आडून ऐकणे पाप समजले जाते. त्यामुळे पुढचा जन्म पालीचा घ्यावा लागतो. मृत्यूनंतर पाणी पाजण्यासाठी वंशाचा दिवा हवा. बैल तयार करण्यासाठी गाजा खाऊ घालणे, कार्तिकी पुनवेला त्रिपुरसुंदरीच्या जत्रेला बैलगाडीने जाणे, कोल्हे हुकीला माप केले की, भाताची रास वाढते, असा समज आहे. त्याच्या आधी शेतातील देवाची परडी न देवाची जत्रा करतात. मळणीच्या वेळी सर्व काम खुणांनी चालते, कारण त्यावेळी शांतता ठेवण्याचा प्रघात आहे. पूर्वी चार पायाचा प्राणी बळी देण्याची प्रथा होती, अलीकडे दोन पायावर भागते असे दीपाजी मनोहरला सांगतो. दोन पाय म्हणजे कोंबडा, चार पाय म्हणजे बकर. दोन पायाची मळणीच्या वेळी कंदोरी केली जाते. शेतात धामणा असेपर्यंत भात अधिक पिकतो, शेतकरी गब्बर होतो, अशी प्रदेश विशिष्ट समजूत आणि सांस्कृतिक परंपरा आहे. (पृ.९६) परंतु दीपाजीसारखा फाटका व निष्कांचन शेतकरी कधीच गब्बर होत नाही. घरात चितई शिरणे शुभ समजतात. चितई अजगरासारखी असते. तिला पुण्यप्राणी समजतात ती कोंबड्या खाते, परंतु घरात चितई शिरूनही दीपाजीच्या घरात अशुभच घडते. घराबाहेर पडताना कोणी शिंकले तर अशुभ घडते, अशी समजूत आहे. जसे दीपालीच्या गाडीचा आस आणि चाक शिंकण्यामुळेच मोडतो, असा समज होतो. मनोहरला आईन बहिरीचा अंगारा लावणे, मनोहरवरून नारळ उतरून टाकणे, ह्यातून त्यांच्या अंधश्रद्धा दिसतात. ग्रहदशेवर बाप्पाजींचा विश्वास आहे. गुरू वाईट असल्यामुळे मनोहर नापास झाला, परंतु तो बदलल्याबरोबर सुभद्रेचे लग्न जमले, असे त्यांना वाटते. पिंपळाच्या झाडावर खवीस बसलेला असतो. त्याला खारीक, खोबरे, बदाम, नारळ, ह्यांचा उतारा लागतो, असा समज आहे. भाताच्या लागणीचे अवघड काम करण्यापूर्वी वडीलधाऱ्यांचे दर्शन आणि आशीर्वाद घेण्याची परंपरा आहे. स्त्रिया पिठोरी अमावस्येला महादेवाचे व्रत

करतात.

पुरुष महादेवाची पूजा करतात. गावातील तरण्या मुली आणि नववधू जंगलात गौर आणायला जातात. फेर धरून नाचतात. गातात. अशा वेळी विधवा, बहिष्कृत लाडीला त्या सामील करून घेत नाहीत. तेव्हा एकटीचे गौरीचे गाणे म्हणते, (पृ. २२८) गौरीकरिता ती कचोऱ्यांची व तेरड्याची फुले गोळा करते. शिमग्याला बाप्पाजीच्या होळीचा पहिला मान असतो. ते होळी पेटवितात. भाविकपणे होळीपुढे बोंब मारतात. मग गावकऱ्यांच्या होळ्या पेटतात. गावात वाघ्यामुरळीचे सोंग काढतात. गावातील कुलंगडी बाहेर काढतात. वाघ्यामुरळीचा नाच करत प्रत्येकाच्या दारापुढे जातात. वाघ्याच्या अंगात येते. त्याला प्रश्न विचारले जातात. तेव्हा तो गमतीदार उत्तरे देतो आणि चिमटे काढतो. (पृ. १६३) ह्याप्रमाणे इनामदार कुणब्यांच्या सांस्कृतिक विशेषांचे लेखकाने दर्शन घडविले आहे. ठाकूर दिवाळीची पोस्त मागत गावभर फिरतात. वाघ्या रं वाघ्या, वाघ्या, वाघ्या राखो तुमची गाय घुर्र अशी आरोळी ठोकतात. जनावरे ओवाळतात, पोसत-फराळाचे आणि भात घेऊन परत जातात. तर चोरलेल्या भाताची लोंबटं मुलाच्या पाचवीला पूजण्याला कातोड्यांचा धर्म आहे. रामबाणाच्या कणसाचा कापूस जखमेवर लावतात, पिठोरी अमावस्येच्या मुहूर्तावर चोरी साधली नाही तर पूर्ण वर्ष फुकट जाते, अशी कातोड्यांची समजूत असलेली दिसते. दारू पिऊन नाच करणाऱ्या कातोड्यांची मेलेल्या माणसाला मूठमाती देण्याची परंपरा वैशिष्ट्यपूर्ण नावीन्यूपर्ण आहे. खड्ड्यात प्रेताशेजारी धनुष्य-बाण, पाठीवर भाता आळवला जातो. शिकारीची हत्यारे खड्ड्यात ठेवतात. विव्हळ स्वरात गाणी म्हणतात, फेर धरून नाचू लागतात. मेलेल्याला उद्देशून म्हणतात, "बामणाच्या जन्मा जाशील तर शेंडी झटकून मरशील.... कातोड्याच्या जन्मा येरं, वनचा राजा होरं," (पृ. १४६) असे म्हणत चढाओढीन नाचतात आणि मूठमाती देतात. मग प्रत्येकाने कोयाच्या मांडीवर एक एक टाच रेंगसून मूठ-मूठ माती टाकली. प्रत्येक कातोडी कायाला बजावीत होता. "कोया, कातोड्याच्या जन्माला ये हो. दुसरीकडं कुठ जाऊ नकोस।" (पृ. १४७) कोयाच्या अंत्यविधीच्या निमित्ताने लेखकाने कातोड्यांचा जातीबद्दलचा अभिमानाच्या संस्कृती विशेषाचे दर्शन घडविले आहे. तसेच त्यांची कोडे घालण्याची परंपरा लेखक सांगून

जातो. (पृ. ५६) रानात कातोडी आनंदाने गीत गातात. एकमेकाला साथ देतात. लाडी-अंकुशाचे ललकारी गीत (पृ. ३८) तसेच गुराखीदेखील (पृ. ४०) गीत गातात.

रानसई आणि परिसरातील लोकांचे जीवन चित्रण करणारी दिघ्यांची भाषा अधिक स्वाभाविक वाटते. निवेदन आणि संवाद प्रमाण भाषेत असूनही त्यामध्ये चपखल बसलेले, बोली भाषेतील शब्द अर्थघन व नावीन्यपूर्ण आहेत. उदा. शिरलीन, गवे, म्हशे, धूळपेरे, खलाटी, लोंबर, गवंड, नाबर, नद्रस, होयबासा, उपटी, कारा, गरी, पळंजी, फाणस, डुंगी, ऐनाट, तोहमत, बाशी, रोहटे, साये, इत्यादी न. चि. केळकरांनी म्हटले आहे, हे शब्द ग्रंथकाराने मुद्दाम आपले प्रादेशिकत्व मिरविण्याकरिता काही हुडकून निवडून घेऊन घातलेले नाहीत. खास वर्णनाच्या वाक्य रचनेच्या ओघात स्वाभाविक रीतीने आलेले उघड दिसतात. ह्यावरून प्रादेशिकता स्पष्ट होते. हात तुना मुर्दा पडिस सारखे कातोड्यांच्या भाषेतील शब्दही काही ठिकाणी दिसतात. हांथरूण पाहून पाय पसरावे, सराई सुगी व बसली उगी, दगा किसका सगा नहीं, कुळंब्याबिगर दाता नाही अन् मारल्याबिगर देता नाही, रानसईचं दांड तर जासईचं बांड, ह्या सर्व म्हणी वाक्प्रचारातून लोकसाहित्याचा समाज मनावरील प्रभाव जाणवतो.

उपरोक्त विवेचनावरून कुसुमावती देशपांडे ह्यांच्या पुढील अभिप्रायाची समर्पकता लक्षात येईल. त्या लिहितात, "सराई ह्या कथेमध्ये दिघे ह्यांनी आपल्याआजपर्यंतच्या निर्मितीतील उच्चांक गाठला असे दिसते... दिघे ह्यांच्या लेखनाची मूळ प्रकृती मात्र कल्पना रम्यता व वस्तुनिष्ठा, सौंदर्यविलास व मानवी जीवनाची गाढ सहानुभूती आणि समज ह्यांचा समन्वय आलेला आढळतो. दिघ्यांच्या लेखणीने मराठी गद्याला चढवलेले आणखी एक लेणे म्हणजे निसर्गाविषयीच्या सुजाण भावनेने प्रेरित झालेल्या वर्णनांचे, वन्यजातीच्या जीवनाकडेही त्यांनीच प्रथम लक्ष वेधले. अनेक कारणांमुळे ह्या लोकांच्या जीवनाच्या चित्रणाची प्रथा मराठी कादंबरीच्या गेल्या दहा वर्षात वाढत आहे."

स्वप्नरंजनात्मक प्रकृतीच्या सराईमधून कोकणातील सामान्य माणसाचे जीवनसंकेत परंपरा आणि कातोडी-ठाकूर ह्या उपेक्षित आदिवासी समाजाचे सुख-दुःख आणि लोकाचारांचे दर्शन घडविले आहे. कृषीशी संबंधित जीवन आणि कातोड्यांचे

स्वतंत्र जीवन ह्यामुळे प्रस्तुत कादंबरी पाणकळा पेक्षा श्रेष्ठ दर्जाची प्रादेशिक कादंबरी आहे. हे मान्य करावे लागते.

***

# ४. मराठवाडा

'पाचोळा' (रा. रं. बोराडे), 'गांधारी' ( ना. धो. महानोर), 'दूर गेलेले घर' (लक्ष्मीकांत तांबोळी), 'गणगोत' (गणेश आवटे), 'विषवृक्षांच्या मुळ्या' (वासुदेव मुलाटे) ह्या मराठवाड्यातील प्रादेशिक कादंबऱ्या आहेत.

यतवमाळ, परभणी, नांदेड, लातूर, बीड, उस्मानाबाद, औरंगाबाद हा काळ्या कसदार जमिनीचा सपाट प्रदेश वैशिष्ट्यपूर्ण आहे. संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ह्या प्रदेशातील लोक अधिक श्रद्धाळू, अंधश्रद्धा आणि आळशी शांतताप्रिय, प्रेमळ आहेत. ते सात्त्विक वृत्तीचे असल्याने भांडखोर नाहीत. निजामी राजवटीच्या प्रभावाखाली त्यांची मानसिकता घडल्याचे दिसते. मागासलेपणा आणि शिक्षणाचा अभाव ह्यामुळे त्यांचे अधिक शोषण झाले आहे. ते लोक निजामी राजवटीमुळे दबलेले दिसतात. सुबत्तेमुळे ते सुखवस्तू, चैनी असल्याचेही दिसते. जलसे, दौलत जादा ह्यामध्ये ते रमतात. ह्याचे कारण निजामी राजवटीतील विलासी वृत्ती हेही स्पष्ट आहे. प्रत्येकाला उपजीविकेइतकी शेती असल्याने शेत मजुरांची संख्या कमी असलेली दिसते. त्याप्रमाणे धनिक सरंजामदारांचा मुजोरपणाही दिसतो. असे असले तरी हे लोक स्थितीप्रिय आहेत. हे सहजासहजी घर, गाव सोडत नाही. उपजीविकेसाठी शहराकडे धावत नाहीत. मिळेल त्याच्यात समाधान मानतात. गावामध्ये ते एकत्र राहतात. शेतावर राहात नाहीत. ह्याचे कारण निजामी राजवटीची दहशत हे सांगता येईल. त्यांची घरे ही दगड मातीची धाब्याची असलेली दिसतात, तर धनिक सरंजामदारांचे वाडे असल्याचे दिसते. ह्या प्रदेशातील भाषेवर उर्दूचा प्रभाव अधिक दिसतो. तरीही मराठवाड्याला वैशिष्ट्यपूर्ण अशी बोली नाही, तर त्यांची भाषा प्रमाणभाषेच्या अधिक जवळ जाणारी आहे, असे दिसते तसेच शैक्षणिक जागृती झाल्याने स्वातंत्र्यपूर्व काळात हा प्रदेश साहित्यातून अत्यल्प प्रमाणात चित्रित झाला असून संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर अनेक चिंतनशील लेखक लिहिते झाले असे दिसते. बलुतेदारांचे उपेक्षित

जगणे, अज्ञानाचा फायदा घेणारे, गावठी, राजकारणी, श्रद्धाळू, माणसांचे केविलवाणे जीणे, सहकारातील भ्रष्टाचार, इत्यादी विषय समर्थपणे बोराडे, महानोर, तांबोळी आदी नव्या दमाच्या लेखकांनी चितारले आहेत.

**ना. धो. महानोर : 'गाधांरी'**

'गांधारी' ही १९७३ मध्ये प्रसिद्ध झालेली प्रादेशिक कादंबरी आहे. तिला बांधेसूद कथानक नसले तरी अंत:सूत्र दुपदरी आहे. पहिला पदर स्वातंत्र्यपूर्व काळातील रझाकारी राजवटीतील अन्याय, अत्याचार, उन्मादाचा आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर निजामी अंमलाखाली असलेला मराठवाडा पोलीस ॲक्शन होऊन स्वतंत्र झला. रझाकारांच्या वर्तनाला विटलेल्या गांधारीतील जनतेला स्वतंत्र झाल्याची जाणीव झाली. गतजीवनातील दु:ख विसरून गावकरी कामाला लागले. तर स्वातंत्र्यानंतर राजकीय नेत्यांच्या गैरवर्तनाने गाव पोखरले गेले. त्यामध्ये गटबाजी, लाचारी, वशिलेबाजी आणि कोर्ट-कचेरीचे प्रस्थ वाढले. राजकीय परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवरील समाजजीवन चित्रण करणारा हा दुसरा पदर आहे. गुण्यागोविंदाने वागणाऱ्या लोकांमध्ये संघर्ष होऊ लागले. जमीन ग्रामपंचायतच्या निवडणुका, सहकारी सोसायट्या, स्वस्त धान्यांचे दुकान, बोगस कर्ज वाटप, गावठाणाच्या जमिनीवर वहीवाट सांगणे ह्यामुळे गटबाजी वाढली. भागवत हा सरळ वृत्तीचा तरुण त्यांना विरोध करतो. त्याचा मित्र लालजी-गुलाबबाई बरोबर विवाह करतो. त्यामुळे गावामध्ये उलट-सुलट चर्चा होते. गावकरी गावातील भानगडींवर चर्चा करतात. कष्ट करण्याचे टाळतात. कर्ज-तगाया काढून चैन करतात. धनिकांची थकबाकी वाढली तरी वसुली सक्तीने गरिबांकडून केली जाते. घरदार-पिकांची जप्ती होते. निनावी अर्ज करून भानगडी वाढविण्याचे प्रकार होतात. गावामध्ये झालेल्या सुधारणांकडे देखील लोक तऱ्हेवाईक नजरेने पाहतात. कुटुंब नियोजन कार्यक्रमाविषयी त्यांच्यात अज्ञान अधिक आहे.

गांधारीमधील व्यक्तिरेखांच्या वृत्ती-प्रवृत्तीतून महानोरांनी समूहजीवन चित्रण केले आहे. गौण पात्रांचे समूह पार्श्वभूमी म्हणून आलेले असले तरी जगदेव, भागवत, लालजी, राजमल, गुलाबबाई ह्या प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. तसेच राघो पाटील, गंगा

आणि इतर गौण व्यक्तिरेखांबरोबर समस्त ग्रामस्थ गांधारी हे देखील पात्रच आहेत. बँक इन्सपेक्टर, फौजदार, तहसिलदार, फॅरेस्टर, तलाठी, सेक्रेटरी, ग्रामसेवक हे प्रशासन व्यवस्थेतील भ्रष्ट अधिकारीही लेखकाने रेखाटले आहेत. अरुण प्रभुणे ह्यांना ही कादंबरी सर्वसामान्य वाटते. ही पात्रे त्यांना टाईप किंवा कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे वाटतात. ते म्हणतात, प्रधान व्यक्ती ह्या सुष्ट आणि दूष्ट अशी ढोबळ वर्गवारीत मोडणारी आहेत. जगदेव दुष्टांचा प्रतिनिधी तर भागवत सुष्टांचा सत्पक्षाचा प्रतिनिधी आहे. असे ते म्हणतात, ह्याचप्रमाणे शकुंतला जोग गांधारीतील व्यक्तित्व डिंकानं एकत्र चिकटवल्यासारखे वाटतात. वरील दोघांचीही विधाने एकांगी वाटतात. उलट संदर्भातील वसंत आबाजी डहाके ह्यांचे विवेचन सार्थ वाटते. ते म्हणतात, ह्या कादंबरीतील व्यक्तिरेखा ठोकळेबाज नाहीत कारण त्या व्यक्तींचे स्वतंत्र आंतरिक जीवनसुद्धा लेखकाने उलगडून दाखवले आहे. तसेच कादंबरीच्या यशाचे रहस्य, व्यक्ती आणि समाज ह्यांच्यातील ताणांचे जिवंत चित्रण असे ही डहाके म्हणतात. जगदेव उपरा जाफराबादकडील खलप्रवृत्तीचा राजकारणी आहे. मिजाशित राहणारा लोकांना झुलवत ठेवणारा, सत्ता टिकविण्यासाठी वाईट मार्ग स्वीकारणारा आहे. भागवत हा प्रगतिवादी आणि आदर्श असूनही त्याचा तिरस्कार करणाऱ्यांची संख्या गावात अधिक आहे. डॉ. भालचंद्र फडके ह्यांनी गांधारीस सुष्ट-दूष्टांचा संघर्ष म्हटले असले तरी भागवतच्या मनाचे पदर महानोरांनी कुशलतेने उलगडले आहे. हे मान्य केले आहे. राघो पाटलाचा एकुलता एक शिकलेला शेतात राबणारा, गावगुंडीत भाग न घेणारा, प्रयोगशील, कष्टाळू, परोपकारी, खानदानी, अमृताची वाणी असलेला सुपुत्र आहे. एक आदर्श पती, मित्र आणि शेतकरी आहे. लालजीवर तो प्रेम करतो. गुलाबबाईच्या नृत्याचे कौतुक करणारा रसिक आहे. एकांतात रमणारा तरुण आहे.

खानदेश मराठवाड्याच्या सीमेवरील खेड्याची पार्श्वभूमी गांधारीला लाभली आहे. अजिंठा-औरंगाबाद आणि जळगावच्या जवळील प्रदेश लेखकाने जिवंत केला आहे. मराठवाड्यातील पत्र्या-धाब्याची घरे किंवा छपरांचा उल्लेख (पृ.६) प्रदेश विशिष्ट आहे. भुईमूग, ज्वारी, कपाशी, केळी, मोसंबी, ऊस ह्या प्रदेशातील पिकांचेही वर्णन लेखक करतो. निजामी राजवट संपुष्टात आल्यानंतर एका खेड्यात झालेल्या

परिवर्तनाची कथा ती प्रत्ययकारी रीतीने सांगते. त्या राजवटीत अनेक उत्पातांना तोंड देऊनही जिवंत राहिलेले, पुन्हा तरारलेले हे खेडे आहे. ते असे राजकीय संदर्भात उभे करीत असतानाच त्याच्या सामाजिक जीवनाकडेही लेखकाने लक्ष दिले आहे. वेगळी माणसे आणि त्यांचे परस्पर संबंध ह्यातून हे सामाजिक जीवन रेखाटले जाते. हा अभिप्राय अधिक बोलका आहे. गांधारीतील समाजजीवनाचे स्वरूप समजून घेण्यास वरील विवेचनाची मदत होते.

हैद्राबादची निजामी राजवट स्वातंत्र्यानंतर पोलीस ॲक्शन होऊन नष्ट करण्यात आली. खानदेशाच्या हद्दीत गेलेले लोक गावामध्ये येऊन स्थिर झाले. अस्थिर जीवन संपले, असा आशावाद वाढीस लागला. स्वतंत्र झाल्याचा आनंद सर्वांना झाला. आता दगड मारता भीती न्हाई. जाळ्यातून पार मोकळे झालो आता, स्वतंत्र झाल्याचा आंनद सर्वांना झाला. आता स्वतंत्र झालो आता पिठाला धनधान्याला करोड गिरीनाक, आडवणूक, पैसा कापण काही न्हाई. निजाम सरकारचा झेंडा उतरला आता दगड मारता भीती न्हाई. आता मुसलमानांचा धाक दडपशा न्हाई की कोन्ही भीती न्हाई. आता आपण सवता राजे. (पृ.७) मारोती महाराज की जय। करून लोक शेतीवाडीच्या कामाला लागले. जात्यावर ओव्या म्हटल्या जाऊ लागल्या नववर्षाचे गुढ्यातोरण उभारून स्वागत केले. निसर्गाची कृपा झाली. धनधान्य पिकले. जो तो ज्याच्या त्याच्या शेतीवाडीत, संसारात बुडून गेलेला. कुणाशी हेवादावा नाही. कधी दुष्काळ नाही. काही भानगडी असल्या तरी खासगीत एकत्र बसून मिटवून घ्यायच्या, झगडे नको, कोर्ट कचेऱ्या नको, चारचौघांच संगळ्यांनी कबूल कराव. ... गावाची रया वर्षावर्षाला वाढत चालली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काही काळ लोक एकमेकांशी प्रेमाने वागत होते. गावातले वाद, भानगडी गावात मिटत होत्या. कोर्टकचेऱ्यांची भानगड नव्हती, परंतु ह्या गावामध्ये स्वार्थी राजकारण्यांची संख्या वाढली आणि गाव पोखरू लागले. सुष्ट-दुष्टांमध्ये संघर्ष होऊ लागला. ऐतखाऊपणा आणि चैन करण्याची वृत्ती बळावली. लोकांची होयबा वृत्ती वाढीस लागली. रिकामटेकड्यांची संख्या वाढली. कष्ट करण्याची प्रवृत्ती नष्ट झाली. दुसऱ्यांच्या प्रगतीला लोक डोळे मोडू लागले. स्वार्थीवृत्ती आणि भ्रष्टाचार समाजामध्ये मूळ धरू लागला. जसे, शिकलेल्या भागवतने स्वकष्टाने अधिक

पीक घेण्यास सुरुवात केल्याबरोबर लोक त्याची हेटाळणी करू लागले. कर्जाच्या नोटीसा आल्यावर त्याची मदत घेण्याचा प्रयत्न लोकांनी केला, परंतु अनुकरण करून उत्पन्न वाढविण्याच्या भानगडीत गावकरी पडले नाहीत.

"कसेल त्याची जमीन" ह्या कूळ कायद्याचे जसे मजूर शेतकऱ्यांना फायदे झाले तसेच काही तोटेही झाले. कष्ट न करता, पैसे खर्च न करता फुकट जमिनी मिळाल्यामुळे त्या जमिनीबद्दल कुळांना आत्मीयता वाटत नाही. त्यामुळे कष्ट न करता कोणतीही गोष्ट फुकट मिळविण्याची प्रवृत्ती वाढली. ह्या जमिनीची बँकांच्या कर्जामुळे जप्ती होईल अशी भीतीही कुळांना वाटत नाही. उलट जमिनीची जप्ती होण्यापूर्वी त्यावर आणखी एखादे कर्ज काढता येईल काय ह्याचा विचार कूळ करू लागले. कर्जाचा योग्य विनियोग न करता दारूबाजी, रंडीबाजी, झगडे-भानगडी व आळशीपणात रक्कम संपली. समाजात लबाडीची वृत्ती वाढीस लागली. बँकेचे पैसे माफ होतील, ह्या आशेवर लोक जगू लागले. कर्जाची परतफेड करण्याची भीती नष्ट झाली. ह्याप्रमाणेच महानोरांनी पांडू काका भागवतच्या संभाषणातून समाज वास्तवाचे चित्र रेखाटले आहे. भागवत म्हणतो, निव्वळ बावळट लोकांशी गाठी आहेत झालं. हा बँकेचा पैसा कोणाच्या बापाला चुकणारा नाही. घरदार, शेती विकून शेवटी भरावाच लागणार. तुमची सगळी दिशाभूल हात आहे....। (पृ. ३१) भागवतच्या विचारातून स्वातंत्र्योत्तर काळातील खेड्यांचा विकास होऊ लागला. तेथे वर्तमानपत्रे येऊ लागली. प्राथमिक आरोग्य केंद्र शासनाने सुरू करून कुटुंब नियोजनाचे महत्त्व समजून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु खेड्यातील जनतेच्या अज्ञानामुळे सरकारला अपयशच आले. प्राथमिक आरोग्य केंद्रात परिचारिका काम करू लागल्या. त्यांच्या विषयीमात्र गावभर चर्चा होऊ लागली. गांधारीतील सारजा आणि शेवंताही लाल तिरकोनवाल्या बाईबद्दल चर्चा करतात. गावातील लोक रात्री-अपरात्री संततिनियमनाच्या गोळ्या मागतात. तिच्याभोवती स्टँडवर ऑफिसमध्ये गर्दी करतात. तिच्यावर संशय घेतला जातो. सारजा म्हणते, "काय उलटा धंदा झाला देवा. पोरंबाळं बंद करा सांगणारीचंच गावान पोट वाढविलं. धन्य झाली. पन सारजे, ती बाई वाईट चलनाची नाही. माणूस लपत नाही कधीच. आपलं गाव बारबाक्कोळं. विनाकारनी त्यांच्या नावाची अफवा उठवली असंल."(पृ. ९१)

अशाप्रकारे गावामध्ये अफवा पसरविणारांची संख्या खेड्यामध्ये वाढली. त्याचप्रमाणे खेड्यातील जनतेचे अज्ञान ही कमी झालेले दिसत नाही. खरी गोष्ट आहे. संसाराचा येल मांडवावर चढवायचा का त्यो कुऱ्हाड मारायची? हे न्यारंच शास्तर धुंडून काढलं सरकारनं. (पृ. ९१) देवावर सर्वांची श्रद्धा आहे. म्हणूनच कर्माने सर्व खातील, पितील, वाढतील असा त्यांचा आशावाद आहे. समाज विज्ञानयुगातही बदलायला तयार नाही, हे वास्तव आहे. संततिनियमानाची शस्त्रक्रिया झालेल्यांना मुलं कशी झाली. ह्यावर मात्र गावामध्ये चर्चा होते. ह्यातून वैद्यकीय अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणाही लेखकाने सूचित केला आहे. शस्त्रक्रिया बिनचूक न झाल्यामुळे पती पत्नीमध्ये संघर्ष निर्माण होतो. गावभर चर्चा होऊन अब्रूला धक्का लागतो.

जलसा-संगीतबारी-तमाशा ह्या लोक कलांना समाजामध्ये हवी तेवढी प्रतिष्ठा मिळालेली नाही. लालजी जलशात तबला वाजविण्यास तयार होत नाही. "लोक काय म्हणतील? ऐवढा मोठा जमीनदार जलशात तबला वाजवितो...."(पृ.४२) लोकांची त्याला भीती वाटते किंवा अप्रतिष्ठतेचे भय वाटते असे म्हणावे लागेल. ह्याचप्रमाणे संगीतबारी किंवा तमाशात नाचणाऱ्या स्त्रियांविषयीही अनेक गैरसमज असतात. ह्या स्त्रिया संसार करू शकत नाही. जास्त दिवस एका पुरुषाजवळ राहूच शकत नाही. पळून जातात. गावातल्या रिकामटेकड्या लोकांमध्ये अशा चर्चा अधिक होतात. गुलाबबाई (सावित्री) आणि लालजीने ओंकारेश्वराच्या साक्षीने लग्न केल्या बरोबर लालजीने नीतिमूल्ये पायदळी तुडविली असे गावकऱ्यांना वाटते. तिच्या नृत्याचे आणि लावण्याचे कौतुक करणारे लालजीवर बहिष्कार टाकतात. रिकामटेकड्यांमध्ये चर्चा होऊ लागली. तिला बदचालीची ठरविली. ती लालजी बरोबर जास्त दिवस नांदणार नाही, पळून जाईल असे लोक बोलू लागले. जातीतील स्त्री बरोबर लग्न करण्याच्या परंपरेला लालजीने हादरा दिला. तेव्हा तिच्या नृत्याचे आणि लालजीच्या तबला वादनाने कौतुक केले जात असतानाच गावकऱ्यांच्या मनात अढी असते. तिच्या जातीबद्दलच चर्चा होते. पण नाचणारी बाई घरात घेणं काही ठीक नाही. गावाला वाईट चालचलणूक लागेल. गावाला काही इज्जत नीतिनेमच राहिला नाही. "वा! भल्ते आले नीतिनेमवाले करून करून भागले आन देवपूजाया लागले. गावात पोटं पाडली गेली त्यावेळी सगळ्यात

गपचूप तुमच्यासारखे लोक होते. त्यावेळी नीतिनेम धाब्यावर. फक्त आता साळसूदपणा. दुनियेत असतील तेवढ्या वाईट गोष्टींची गावात बजबजपुरी माजली त्यासाठी कधीकाळी तुम्हाला वाटलं नाही आन आता ब्रम्हज्ञान शिकवता.... तुका म्हणे मुके रहा, जे जे होईल ते पहा". (पृ. ५१)

गावकऱ्यांच्या वरील संवादातून नाचणाऱ्या स्त्रीबद्दलचे अनुउद्‌गार जसे बाहेर पडतात, त्याचप्रमाणे नीतिनियम मोडणाऱ्यांची संख्या खेड्यातून वाढली असून त्याकडे कानाडोळा करण्याचे, बघ्याची भूमिका वाढीला लागलेली दिसते.

एखाद्यावर किटाळ आणण्याचा प्रयत्नही केला जातो. जसे, लालजीच्या सामर्थ्यापुढे जगदेवचे काही चालत नाही. अशा वेळी जगदेव आणि चौकडी लालजीवर डाव टाकण्याचा प्रयत्न करतात. हौसा आणि महाराज ह्यांच्या संबंधातून ती गरोदर असते. तेव्हा ह्या भानगडीत लालजीला अडकविण्यासाठी हौसाला पैशाचे अमिष दाखविले जाते. जयवन्ता आणि भागवतचे संबंध असल्याची अफवा पसरविली जाते किंवा त्याला बदनाम करण्यासाठी फॉरेस्ट खात्याकडे निनावी अर्ज पाठविला जातो. थोडक्यात स्वातंत्र्योत्तर काळामध्ये खेड्यातील समाजाचे विघटन सुरू झाले. गटबाजी वाढली, जातिवाद, स्वार्थ, वशिलेबाजी, लाचलुचपत, वैमनस्य, अडाणीपणा, गुंडगिरी, शेतीवाडीचे कज्जे, ग्रामपंचायतीच्या निवडणुका, भ्रष्टाचार, सहकारी सोसायटीतील आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील भानगडी ह्यांनी समाजजीवन खिळखिळे झाले.

हैद्राबादच्या निजामाची सत्ता मराठवाड्यात होती. त्यांनी ह्या प्रदेशात समाजावर सत्ता गाजवीत असताना अत्याचार केले. लाचार जीवन जगायला लावले. स्त्रियांवर बलात्कार केले. तर स्वातंत्र्यानंतर सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे धोरण कॉंग्रेस सरकारने ठेवले. ग्रामपंचायती, पंचायत समित्या, पक्षनिष्ठा इत्यादी राजकीय पैलूंचा प्रभाव ग्रामीण-प्रादेशिक सामाजिक जीवनावर पडला. पुढाऱ्यांची ढोंगी-भ्रष्टाचारीवृत्ती वाढीला लागली. गटबाजी बोकाळली. त्याखाली हा समाज भरडून निघाला, अशा दोन्ही राजकीय शक्तींचा अनुभव घेतलेल्या जनतेच्या आशा-निराशांचे चित्रण लेखकाने गांधारीत रेखाटले आहे.

निजामाच्या क्रूर, जुलमी सत्तेचे स्वरूप लेखकाने पहिल्याच प्रकरणात सांगितले आहे. हैद्राबाद मुक्तिसंग्रामात अनेकांचे प्राण गेले. स्वातंत्र्य मिळाले ते १९४८

मध्ये पोलीस ॲक्शन होऊन परंतु त्यापूर्वीच्या अस्थिरतेचे वर्णन लेखक करतो, "खेड्यात सगळीकडे लोकांचे चेहरे काळे ठिक्कर, चिंताग्रस्त, पोटात भीतीचा गोळा, घटकेत काय होणार ह्याचा भरवसा नाही." (पृ. १) अफवांचे पीक आले. खेडी लुटण्याचा, जाळपोळीचा धुमधडाका सुरू झाला. स्त्रियांची अब्रू लुटली गेली. फरदापूरच्या जुम्मा मशिदीसमोर नऊ लोकांचा छळ करून ठार केले. अजिंठ्याच्या अहमद घाऊसने पैशाची लूट केली. मुक्तसेनेच्या लोकांनी निजामावर बॉम्ब टाकला. ह्या गोष्टीने चिडून निजाम कत्तल करणार अशी भीती वाटू लागली. अल्पसंख्य मुसलमानांचे गावामध्ये वर्चस्व वाढले.

शेतीच्या मशागतीचे दिवस असून देखील लोक घरात दडून बसले. ऐवढी दहशत होती. रात्रीच्या वेळी लोक गस्त घालत. परंतु रझाकाराच्या आक्रमणामुळे लोक परागंदा झाले. गांधारी गाव लुटले गेले. खून पडले. गाव चावडीतील दप्तर जाळले. पोलीस ॲक्शन होऊन निजाम पकडले गेले. देश स्वतंत्र झाला. परंतु गांधारीच्या नशिबी दुर्योधनच फार असल्यामुळे स्वातंत्र्याचा आनंद फार काळ टिकला नाही. जगदेव राजमलसारख्या दुष्ट पुढाऱ्यांचे वर्चस्व वाढले. जगदेव गांधारीचा सरपंच झाला. विकासाच्या गप्पा मारून तो लोकांना झुलवत ठेवतो. वरिष्ठांशी संबंध असल्याचे भासवितो. त्यांच्यापेक्षा आपण मोठे आहोत असे सांगतो. सत्कारासाठी वर्गणी जमा करून पैसे हडप करतो. (पृ. २१-२२) आपण किंगमेकर आहोत, असे गरजू लोकांना भासवितो. लोक त्याच्या थापांवर विश्वास ठेवतात. ते जगदेवला हवे असते. राजकारण हा त्याचा पैसा कमविण्याचा धंदा आहे. स्वार्थी, ढोंगी, राजकारण्यांची संख्या वाढली. लोकांना झुलवत ठेवण्याचे तंत्र त्याने अवगत करून घेतले. आर्थिक विवंचनेत असलेली माणसं अशा लोकांभोवती झटपट जमा झाली. असे समाजवास्तवाचे चित्र लेखकाने रेखाटले आहे.

निवडणुकांच्या निमित्ताने गटातटाचे राजकारण केले जाऊ लागले. दलितांच्या विकासासाठी त्यांना शासनाने प्रशासनात सामावून घेण्याचा निर्णय घेतला. निवडणुका व नोकऱ्यांमध्ये राखीव जागा, मतदानाचा हक्क मिळाला. पुढारी, गावकऱ्यांकडून वर्गणी गोळा करतात. परंतु स्वत:च्या खिशाला कधीही झळ पोहचू देत

नाहीत. (पृ. १०९) हे सत्य लेखकाने सांगितले आहे. समाजामध्ये त्याला स्वातंत्र्यानंतर हक्क कर्तव्याची जाणीव होऊ लागली. आपल्या मताची किंमत जनतेला समजली. तोत्या मांगाच्या स्पष्टोक्तेपणातून लेखकाने हे सूचित केले आहे.

पुढाऱ्यांप्रमाणे प्रशासक वर्ग देखील भ्रष्टाचार करू लागला. गुन्हेगारांना मुक्त करणे, खोटे पंचनामे करणे, (पृ. २ तसेच पृ. ६५) अशा भ्रष्ट गटबाजीला उत्त आला. राजकारणामुळे लबाडी वाढली. जमिनीबद्दलची आत्मीयता नष्ट झाली. सरकारी पैशाचा दूरउपयोग करण्याची वृत्ती वाढली. चैनीत कर्ज संपले. कर्ज परतफेड करण्याची प्रवृत्तीच नाहीसी झाली. प्रामाणिकपणा संपला. कर्ज माफ होणार ह्या आशेवर लोक जगू लागले. जमी मात्र गरिबांची होऊ लागली. थोडक्यात स्वातंत्र्योत्तर काळामध्ये विविध मार्गाने मिळणारे कर्ज घेण्याची आणि ते परत न करण्याची भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देण्याची प्रवृत्ती वाढली. अशाप्रकारे आर्थिकदृष्ट्या खेडी पोखरली गेली. चैनी वृत्ती वाढली.

निजामी राजवट नष्ट झालेल्या खेड्यामध्ये रूढी-परंपरा समजुती आहेत. अज्ञानामुळे मंत्र-तंत्र जादुटोण्यावर त्यांचा विश्वास आहे. गांधारीमध्येही लेखकाने लोकसमजांचे प्रसंगानुरूप चित्रण केले आहे. (पृ. ६७) नाच तमाशाचे वेड, संगीतबारी, चौली पावलीचे खेळ, जात्यावरील ओव्या इत्यादी गोष्टीतून सांस्कृतिक जीवनदर्शन घडते.

गांधारी खानदेश- मराठवाड्याच्या सीमेवरचे खेडे आहे. त्यामुळे अहिराणी व मराठवाड्याच्या बोलीतील शब्द येथे येतात. कादंबरीचे निवेदन प्रमाण भाषेत असून संवाद बोलीत आहेत. पात्रानुगामी बदलती भाषा लेखकाने वापरली आहे. इंग्रजी शब्दांचे विकृत उच्चार लोक कसे करतात ते लेखकाने टिपले आहे. उदा. मिटींगा, इलेक्ट्री, फारम, हायबरी इत्यादी. जगदेव जाफराबादकडील असल्यामुळे उर्दू, हिंदी, इंग्रजी व मराठी शब्दांनी युक्त हिंदी भाषा बोलतो. (पृ. १७ आणि १०७)

निवेदनाशी एकरूप झालेले संवाद गाधांरीत आहेत. उदा. निजामाच्या राजवटीचा अस्त झाल्यानंतर पारावर बसून चर्चा करणारी स्वतंत्र झाल्याची जाणीव झालेल्या लोकांचे संवाद (पृ. ६-७) निवेदनाशी एकजीव झालेले असून गावकऱ्यांचे मनोगतच त्यातून व्यक्त होते. निजामांच्या भाषेच्या प्रभावामुळे लोक शिव्याही तशाच देताना दिसतात.

जसे गांडू की औल्याद, भडवे, मांकी... इ. प्रदेश विशिष्ट आहेत. म्हणी-वाक्प्रचारातूनही समाजवास्तवाचे दर्शन घडते. उदा. खऱ्या गोष्टींचा सग्या मायले राग येतो इ. बोलीतील नावीन्यपूर्ण शब्दांचाही वापर लेखकाने केला आहे. झडतीला, गनीमत, सवतंत्र, कराडेगिरीमाकं, मोगडा, मीठमिरचीले, जवारीले, सनावाराले, इ.

महानोरांची शैली साधी-सरळ कुठेही काव्यात्म होऊन तिनं निवेदनाचा डौल ढासळू दिला नाही. हा शकुंतला जोग ह्यांचा अभिप्राय सार्थ वाटतो. कारण मुळात कवी असूनही त्यांनी हा डौल सांभाळलेला दिसतो. वरीलप्रमाणे कादंबरीच्या मलपृष्ठावरील अभिप्राय आहे. ह्या ठिकाणी महानोरांना त्यांच्या साध्या, कोठेही अतिरिक्तपणे काव्यात्म न होणाऱ्या गद्याचेही चांगले सहकार्य लाभले आहे. ह्या सगळ्यांमुळे गांधारी ही मराठीतील एक वेधक प्रादेशिक कादंबरी ठरेल, ह्याबद्दल कोणताही संदेह वाटत नाही. तर डॉ. र. बा. मंचरकर लिहितात, ग्रामीण संवेदनशीलता गांधारीत उत्कटतेने अभिव्यक्त झालेली आहे. समकालीन ग्रामीणवास्तव इतक्या व्यापकतेने व नेमकेपणाने पकडण्याचा गांधारीचा प्रयत्न जवळ-जवळ एकमेव आहे. हे विधान कादंबरीतील समाजवास्तवाचे दर्शन घडविण्यास पुरेसे आहे. परिवर्तन काळामध्ये पोखरल्या गेलेल्या खेड्याचे प्रदेशविशिष्ट दर्शन लेखकाने प्रभावीपणे घडविले आहे, असे म्हणावे लागेल.

***

# ५. विदर्भ

'धग' (उद्धव शेळके) 'हाल्याहाल्या दूध दे' (बाबा मुसळे) 'मेड इन इंडिया' (पुरुषोत्तम बोरकर) 'झेलझपाट' (मधुकर वाकोडे) ह्या वैदर्भीय प्रादेशिक कादंबऱ्या आहेत. वर्धा, अमरावती, नागपूर, अकोला, गडचिरोली, चंद्रपूर, मेळघाट हे प्रदेश डोंगराळ आणि औद्योगिकीकरणाचा अभाव असलेला आदिवासींचा आहे. निजामी राजवटीचा प्रभाव येथील लोकजीवनावर झालेला दिसतो. हे लोक अधिक श्रद्धाळू, आळशी तितकेच दिलदार, प्रेमळ आहेत. मागासलेपण आणि शिक्षणाचा अभाव ह्यामुळे त्यांचे अधिक शोषण झाले आहे. सरंजामदारांचा मुजोरपणा जसा येथे दिसतो. त्याउलट आदिवासींचे दारिद्र्यही दिसते. विदर्भातील लोकांची सादिलबुआ, महादेव, बहिरण आणि अन्य स्थानिक देवता तसेच नागदेवतांवर आदिवासींची श्रद्धा असलेली दिसते. हे लोकही स्थितीप्रिय आहेत. ते सहजासहजी घर-गाव सोडत नाहीत. उपजीविकेसाठी शहराकडे धावत नाहीत मिळेल त्याच्यात समाधानी दिसतात. प्रत्येकाला पोटापुरती जमीन असल्यामुळे ते व्यसनाधीन-जुगारी असलेले दिसतात. साधारणपणे गाव-वाडीवस्तीवर हे एकत्र राहतात. आदिवासी समाज येथे अधिक असून त्यांची स्वतंत्र जीवनशैली असली तरी शासनाच्या धोरणामुळे ती उद्ध्वस्त होऊ लागल्याचे स्पष्ट जाणवते.विदर्भातला माणूस सफाईदारपणे हिंदी बोलतो, ह्याचे कारण निजामांची राजधानी, हिंदी ही त्यांची राजभाषा होती, त्यामुळे वऱ्हाडी भाषेत हिंदी शब्द अधिक येण्याचे निजामाची राजवट आणि मध्यप्रदेशाशी जवळीक ही दोन कारणे सांगता येतील. भजनाच्या वेळी ढोल, पिलमेपावे वाजविले जातात, हे येथील खास वैशिष्ट्य आहे. तसेच वऱ्हाडी बोली आणि आदिवासींची स्वतंत्र बोली हे ह्या प्रदेशाचे वैशिष्ट्यच आहे. शैक्षणिक जागृतीच्या अभावामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात लेखक झालेले नसले तरी आज नवी चिंतनशील पिढी प्रदेश चित्रण करू लागल्याचे स्पष्ट दिसते. बलुतेदारांचे निरर्थक जीणं, भ्रष्टाचार-शोषण, व्यसनाधीनता, आदिवासींच्या पारंपरिक

जीवनशैलींचा ऱ्हास हे ह्या काळातील कादंबरीचे विषय प्रदेशाचे रंग घेऊन अवतरले आहेत.

"मेड इन इंडिया" : ही १९८७ साली प्रसिद्ध झालेली पुरुषोत्तम बोरकर ह्यांची पहिलीच कादंबरी आहे. समकालीन समाजपरिस्थितीचे आणि ग्रामीण - प्रादेशिकतेचे धावते समालोचन असे काहीसे तिचे किस्सेबाज स्वरूप आहे. कथानकात वरवर विसकळीतपणा जाणवत असला तरी त्यामागे अंतर्गत सुसंगती आहे. एका पदवीधर तरुणाचे ते सूक्ष्म निरीक्षण आहे, की जो भारतीय समाजव्यवस्थेचे अपत्य आहे. ह्याच समाजव्यवस्थेत तो घडलेला आहे. हा आजच्या तरुण पिढीचा प्रतिनिधी पंजाबराव गरसोळीकर, सरपंच, ग्रामपंचायत, गरसोळी खुर्द घरातील गावातील, परिसरातील, लोकशाही शासन व्यवस्थेतील कटु अनुभव आणि दिसलेली माणसे, प्राणी ह्यांच्याविषयी तिरसटपणे निवेदन करतो. कलाशाखेचा पदवीधर असलेल्या पंजाबला वशिलेबाजी भ्रष्टाचाराच्या काळात नोकरी मिळत नाही. शिक्षणामुळे त्याचा आत्मविश्वासही वाढलेला नाही. स्वतःच्या सुमार गुणवत्तेची त्याला चांगली कल्पना आहे. त्याच्या घराण्यात पिढीजात सरपंचपद असते. परंतु त्याला बोगसबाजीच्या राजकारणात अजिबात रस नसताना बापाच्या इच्छे खातर राजकारणात येणे भाग पडते. ह्या गलिच्छ प्रवाहात आल्यानंतर तो समाजसुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. गावच्या रस्त्यावरील सांडपाण्याच्या डबक्यांचे तो शोषखड्डे करू पाहतो. त्यात त्याला अपयश येते. दारूबंदी राबविण्याचा अयशस्वी प्रयत्न करतो. जुगार, मटका, ब्लू फिल्म-व्हिडिओ बंद व्हावा म्हणून पायतान झिजवतो. परंतु मंत्री-आमदार-खासदारांची दोन नंबरच्या अवैध धंद्यावाल्यावर कृपादृष्टी असल्याने त्याला ते अशक्य होते. वृक्षारोपण, कुटुंबनियोजन ह्याबाबतही त्याला कटू अनुभव येतात. बापाने विष खाऊन आत्महत्या केल्यावर तो सरपंच पदाचा राजीनामा देतो.

पिढीजात शेती व्यवसाय करायला लागल्याने, त्याची आर्थिक परिस्थिती उत्तम असूनही त्याची सोयरीक जमत नाही कारण आजच्या तरुणीना नोकरीवाला नवरा हवा. तर हुंड्यासाठी बाप काळ्या आणि तिरळ्या मुलीशी त्याला लग्न करायला सांगतो. गावातील लोक त्याला घनचक्कर म्हणू लागतात. कारण शेतीधंद्यात तो जम बसवू शकत

नाही. तो समकालीन परिस्थितीचे निरीक्षण करतो. तेव्हा त्याच्या लक्षात येते की, दाम करी काम अशी स्थिती निर्माण झाली आहे. सर्वत्र भेसळ-भ्रष्टाचार वाढला आहे. लोक व्यसनाधीन, जुगारी, आळशी, छंदीफंदी, कर्जबाजारी बनले आहेत. लोकशाही समाज व्यवस्थेतील विषमता आणि लोकांच्या वैफल्यग्रस्त स्थितीवर तो भाष्य करतो. स्वतःच्या मृत्यूबरोबर लोकशाही समाजव्यवस्थेचा अंत त्याला दिसू लागतो. असे प्रस्तुत कादंबरीचे कथानक आहे. जयंतकुमार बंड ह्यांनी कादंबरीसंबंधी असमाधान व्यक्त केले आहे. 'मेड इन इंडिया' ही कादंबरी नाही असे त्यांनी म्हटले आहे. तर अन्य समीक्षकांनी कादंबरी म्हणून तिचे स्वागतच केले आहे.

आजच्या नव्या संकरित, धेडगुजरी ग्रामीण संस्कृतीचे चित्रण आहे आहे. भारत आणि इंडिया ह्यांचे अस्सल जातिवंत मिश्रण म्हणजे कादंबरी! शिक्षणाचा प्रसार, रेडिओ, टि.व्ही. ह्यासारख्या प्रसारमाध्यमांमुळे शहरी संस्कृतीचे झालेले आक्रमण ह्यामुळे खेड्यातले जीवन समृद्ध होण्याऐवजी ते अधिक पोकळ होत चालले आहे. ही सांस्कृतिक दिवाळखोरी बोरकरांनी वऱ्हाडी बोलीमध्ये विनोदी शैलीत प्रभावीपणे मांडली आहे. असा प्रस्तुत कादंबरी संबंधात समर्पक अभिप्राय दीपक घारे ह्यांनी १९८७ मधील कादंबरीचा आढावा घेताना लिहिला आहे. त्याचप्रमाणे सखोल जीवन जाणीव फारशी आढळत नाही असे असमाधान व्यक्त केले आहे. तर 'मेड इन इंडिया' ह्या इंग्रजी नावाच्या मराठी नव्हे जातिवंत वऱ्हाडी कादंबरीची ही आहे सुरुवात असे वसंत वहोकार म्हणतात, त्यांना प्रस्तुत कादंबरी वेगळ्या टप्प्यावरची वाटते. ह्याप्रमाणे आव आणून संस्कृतीच्या गप्पा मारणाऱ्यांची झोप उडावी असे हे रोखठोक पुस्तक आहे. त्याला आत्मकथनाचा फॉर्म वापरला असला तरी ती प्रातिनिधिक स्वरूपाची कादंबरी आहे, असा अभिप्राय आशा मुंडले ह्यांनी नोंदविला आहे. वरील विवेचनावरून जयंतकुमार बंड ह्यांचा आक्षेप कसा निराधार आहे, हे लक्षात येते. त्याचप्रमाणे विसकळीत कथानक असलेली समकालीन समाजवास्तवाचे धावते समालोचन करणारी ही नव्या वळणावरची कादंबरी आहे हे मान्य करण्यास हरकत नाही.

समकालीन सांस्कृतिक दिवाळखोरीचे चित्रण लेखकाने विविध वृत्ती-प्रवृत्तींच्या माणसांच्या मानसिकतेतून दाखविले आहे. निवेदकाने तटस्थपणे जे घडले,

जे दिसले, जसे अनुभव येत गेले ते तसे सांगितले. त्यात सुसंगती दिसत नसली तरी अनेक व्यक्तिरेखांना आकार मिळतो. पंजाबराव साहेबराव गरसोळीकर पाटील हा पदवीधर तरुण आहे. शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नाही म्हणून तो शेती करण्याचा निर्णय घेतो. वडील त्याला बोगसबाजीच्या राजकारणात भाग घ्यायला लावतात. त्याच्या आदर्शांची समाजात किंमत होत नाही. आधुनिकीकरणाच्या लाटेत ओढला गेलेला तरुण आहे. राजकारणात भाग घेऊन तो वैफल्यग्रस्त होतो. वडिलांनी विष प्राषण करून आत्महत्या केल्यानंतर स्वत:चा मृत्यू त्याला समोर दिसू लागतो. आईचा शोक आणि पत्नीचे क्षणिक दु:ख दिसू लागते. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे लोक त्याला हसू लागतात.

साहेबराव पाटील हे खानदानी महत्त्वाकांक्षी, आशावादी, मानपान-प्रतिष्ठा जपणारे, व्यसनी, कठोर, स्वार्थासाठी समाजसेवेचे ढोंग करणारे आहे. मुळात चांगुलपण त्यांच्या रक्तातील गुण आहे. ते दानशूर-उदार, व्यवहारी, मोठ्या काळजाचे, सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होणारे आणि पाहुणचार करणारे आहेत. पंजाब म्हणतो, "…. वयला त अळमाप देईन अन् सरकला त घरदार शनून काढीन, जेव्हळा दिलदार तेव्हळाच खम्मी" (पृ. १५) ते नोकरी गुलामगिरी मानतात. नोकरी करणे ब्राह्मणांचे काम आहे असे म्हणतात, बापू-नेहरू शेजारी समाधीचे स्वप्न जागेवर ठेवून सोनेनाणे, जमीनजुमला जुगारात गेल्याने अन्ड्रीन पिऊन ते आत्महत्या करतात.

मांगीलाल शेठ हुशार, चत्रा, ऑलराऊन्डर, हिशोबी, निर्व्यसनी, जनतेला व्यसनी, जुगारी आळसी बनविणारा आडमाप खाऊन तब्येत वाढलेला स्वार्थी माणूस आहे. जनतेची अचूक नाडी ओळखून राजकारण्याची मदत घेऊन त्याने अमाप माया मिळविली आहे. पैशाच्या जोरावर गावपातळीवरील राजकारणात भाग घेण्याचा प्रयत्न तो करतो, परंतु त्याला ते शक्य होत नाही. कारण पिढीजात पाटील घराण्यात असलेले सरपंच पद काढणे त्याच्या आवाक्याबाहेरचे असते. प्रस्थापितांविरोधी तो अयशस्वी होत असला तरी अवैध धंद्यामध्ये प्रस्थ निर्माण केले आहे.

नथू हा एक पोरका-बालवयापासून गावात लहानसहान काम करणारा बायल्या आहे. तमाशात झिलकऱ्याचे काम करून गावात परत आलेला. पान आणि

सिगारेटसाठी लावणी म्हणून पैसे कमावतो. शेवटी पाटलाच्या घरात घरगडी म्हणून काम करतो. तर आप्पा मास्तर वंशाचा दिवा लावण्यासाठी अकरा मुलींना जन्म देणारा शिक्षक आहे. तर पंजाबची आई, साधीभोळी, प्रेमळ आणि श्रद्धाळू स्त्री आहे. तर येवद्याची पाहुणीबाई गोष्टी वेल्हाळ आहे. सूर्यभान थोरात गंपलास बुढा आहे. डुम्बी कुत्री, लभान्या आणि ईसनख्या कुत्रे हे माणसातील प्रामाणिक नेभळट आळशी वृत्तीचे द्योतक रेखाटले आहेत. समस्त ग्रामस्थ, राजकारणी, सुशिक्षित बेकार तरुण, भोंदूबुआ, जुगारी, दारुडे, शिवसेना, दलित पँथरचे कार्यकर्ते ह्यांच्या उल्लेखातून समूह जीवनाचे दर्शन घडविले आहे.

विदर्भातील अकोला जिल्ह्यातील भुली नदीच्या काठावरील गरसोई ह्या खेड्याची आणि परिसराची भौगोलिक पार्श्वभूमी कादंबरीच्या कथानकाला लाभली आहे. विदर्भाच्या काळ्या मातीत कापसाच्या विविध जातीबरोबर उस, मिरच्या, कांदे, ज्वारी, मुगा, उडीद, मठ, जव, लाख, तूर, भगर, जवस इत्यादी प्रदेश विशिष्ट पिकांचा उल्लेख येतो. पूर्वेला अकोला, पश्चिमेला पारसाचा वीज कारखाना, नागपूर-भूसावळ रेल्वेलाईनवरील गरसोई गाव आहे. पूर्णा नदी, दर्यापूर तालुक्यातील गाडगेमहारांजांचे शेडगाव, सातपुड्याच्या निळ्या रांगा, अंजनगाव-सुर्जी आणि विदर्भातील विविध धार्मिक-सांस्कृतिक स्थळांचा उल्लेख येतो. ह्या प्रदेशात त्यांची घडण झालेली असते. प्रादेशिकतेचा सामाजिकतेवर परिणाम होतो. त्याप्रमाणे त्यांची मानसिकता घडते. सपाट विस्तीर्ण दुष्काळी प्रदेशातील लोकांमध्ये आळशी-निष्काळजी वृत्ती असते. रिकामपणामुळे त्यांची व्यसनाधीनता वाढते, मटका-जुगारसारख्या वाईट गोष्टींचा स्वीकार मागासलेल्या भागातील लोक लवकर करतात. प्रस्तुत कादंबरीमधील व्यक्तिरेखांवर विदर्भातील मागासलेपणाचा, अज्ञानाचा प्रभाव असलेला दिसतो.

ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलाणारे कृषी जीवनाशी निगडित निसर्गचित्र लेखकाने रेखाटले आहे. ह्या ऋतुचक्रामधील चढउतारांचा मानसिकतेवर परिणाम होतो. विदर्भातील उन्हाळ्याचे चित्र लेखक रेखाटतो,

“.......ह्या वऱ्हाळातला विश्वविख्यातकीर्त उन्हाळा चालू झाला की गरसोई भवताल फफुळ्याचे असे लोटच्या लोट गयनी झोपतात... जणू गरसाई हे ज्युनियार पोखरनच

!... असा धुळला हेच ह्या गावाचं सर्वसत्य प्रारब्ध" (पृ. ३६) विदर्भातील ह्या उन्हाळ्यामुळे आणि धुळीमुळेच शेतात न जाण्याची प्रवृत्ती आहे. तर पावसाळ्याचे चित्र पहा.

"...आणि काळ्या मातीत, मृद्धानं धुंद होऊन...घननिळा बरसता....पाऊस धारा झेलित झेलित....कष्ट करताना स्वेदबिंदूंचा .... वर्षाव कसा अलवार मातीवर....मग पिके घेण सोनियाची.... वरनबात इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलेला आणि खाली... भोवताली च्युतियासारखं अजिंठा शैलीतलं हिरवेगार रान पसरेलं..., त्यात फासपारध्यांच्या आन एंड्रिनच्या तडाख्यातून बचावलेले लिरिकल राघू, चवचाल मैना.........." (पृ. ३८) गाडी भाड्याची आणि बैल तगाईचे अशी सवय लागलेल्या लोकांना कष्ट नको वाटतात. पाऊस होऊनही तो उपयोगाचा वाटत नाही. पंजाबच्या मानसिकतेनुरूप रेखाटलेले पावसाळ्यातील निसर्गचित्र पहा.... रोहिणी, मिरुग, आरदळा बरसल्या सगळीकडे गाटाच गाटा झाली. खाली जमिनीवर, कुपाईनं हिरव्यागार गवताचे थोंबच्या थोंब निघाले. पेरण्या झाल्या अन् बियानं टरार वदर आलं कायामातीतून... सृष्टीत आनंद भरला परंतु एक वर्ष गेले तरी पंजाबचे लग्न जमले नाही. ह्यावरील भाष्य आहे त्याचप्रमाणे वर्णन पुढीलप्रमाणे,

".... अन पुढ्यात हिरव्या हायब्रीडवर उचंबळत असलेला लख्ख चांदण्यांचा शुभ्र चुरा। माह्या पायाखालून थेट क्षितिजापर्यंत त्रीदिशांना कार्तिक पिकांचा महासागर सळसळत असायचा. दाही दिशेतून उफाळून माह्यापर्यंत पोचणारा रानगंध माह्या प्रानामानाला सुकून द्यायचा. पिकाईच्या हिरव्या देवदत्त गालिच्यावरून थंडगार वाऱ्याची झुळूक यायची अन् पानांतून येणारा यौवनोन्मादी सळसळता आवाज अधिकच धुंद व्हायचा." (पृ. ८२) वैशाखातील जीवघेणाऱ्या उन्हाळ्याचे असेच एक निसर्गचित्र-

"....दिवसभर उन म्हणे मी आहो तर कोणीच नाही. लाहा लाहा तप्त बंबाय झावा लहमरत ईभर वऱ्हाळभर उनीच्या कत्लेआम माऱ्यानं मानसं, जनावरं, पाखरं अन झाळझुळपंही निरा चिमून जात, रया गेल्यासारखी दिसत. जो तो सावलीचा गॉगल लावून थंड पानी पितो म्हने. घामानं कपडे निराचिक-चिक होऊन जात. तल्खली इतकी

आसमांत राहें की, वस्त्रे ही बाब अनैसर्गिक असल्याची प्रकर्षानं खात्री पटे. असा हा उन्हाचा छपाटा भलता जबर. मायले लेकरू भारी....''(पृ. ४५)

मुळातील लोकांची आळशी वृत्ती, भ्रष्ट राजकारण, प्रसार माध्यमांच्या प्रभावाने मूळप्रवृत्तीपासून दूर गेलेले लोक आणि प्रतिकूल निसर्ग ह्यांचे प्रसंगोचित चित्रण लेखकाने केले आहे. ते कादंबरीच्या आशयाशी एकजीव होऊन आले आहे. परिवर्तन काळामध्ये आधुनिकीकरणाचा आणि यंत्रसंस्कृतीचा प्रभाव खेड्यांवर पडला, त्यांचा चेहरामोहरा बदलू लागला. त्याबरोबर शील, माणुसकी, प्रेम ह्या भावनाही नष्ट झाल्या. शब्दाला जागण्याची इमानीवृत्ती कालबाह्य ठरली. कष्ट करून काळी पिकविण्याऐवजी जुगार, मटका, आकडा ह्यांचे प्रस्थ वाढले. सिनेमाने लोकांना वेडे केले. एकूणच समाज दुबळा आणि आळशी झाला. दाम करी काम अशी स्थिती निर्माण झाली. ह्यामुळे संघटित,एकवचनी, खेड्यांमध्ये विविध गट पडले. सत्तास्पर्धा वाढली. ह्या सर्व गोष्टींचे सूचक धावते समालोचन तिरसटपणाने प्रस्तुत कादंबरीमध्ये लेखकाने केले आहे. पुढाऱ्यांच्या स्वार्थी-मतलबी राजकारणाने ग्रामीण भागात परिवर्तन होऊन परंपरागत जीवन नष्ट झाले. सुधारणांबरोबरच नव्या समस्या, नवे प्रश्न निर्माण होऊ लागले. गावात एस. टी. आली. बार, पानपट्ट्या आल्या. लोक काम करण्यापेक्षा अशा हॉटेलमध्ये बसून दिवसभर गप्पा मारू लागले. सर्व जातिधर्माचे लोक निरर्थक खर्च करू लागले. उलट व्यापारी श्रीमंत होत गेले. दारू पिऊन मटका-जुगार खेळणारे रसातळाला गेले, उलट त्याला प्रोत्साहन देणाऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली. दिवस मावळताना जेवून झोपणारे खेडूत भजन, ठावे, पांडव प्रताप हरिविजयाकडे दुर्लक्ष करू लागले. ओपन क्लोज ऐकल्याशिवाय लोकांना झोप येईनासी झाली. राज्यकर्त्यांच्या आशीर्वादाने अवैध धंदे जोरात चालू लागले. दारूबंदीचे धोरण असूनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होऊ लागले. दारूबंदी पथकातील लोकांना दारू पिण्याशिवाय लोकजागृतीचे दारूचे दुष्परिणाम
सांगणारे कार्यक्रम सादर करणे शक्य होत नाही. शेतीत कष्ट करण्यापेक्षा जुगाराच्या तक्त्यांचा अभ्यास होऊ लागला. चैन वाढली. जुगारासाठी अनेकांनी जमीन आणि घर विकले. धंदेवाईक वृत्तीमुळे मैत्रीचे-प्रेमाचे संबंध नष्ट होऊन सबसे बडा रुपैय्या हे तत्त्व लोकप्रिय झाले. पुरुषोत्तम बोरकर ह्यांनी प्रस्तुत कादंबरीत विदर्भातील गरसाई

गावातील मांगीलाल शेठच्या पुण्याईने समाजजीवनात परिवर्तन होत गेले आणि पारंपरिक ग्रामीण जीवनाचा ऱ्हास कसा झाला, ह्याचे चित्रण केले आहे. अवैध धंद्यावर नियंत्रण ठेवण्यापेक्षा पोलीस यंत्रणेने हप्ते वसूल करून त्यांना राजमान्यता दिली. पुढाऱ्यांनी अशा धंद्यांना प्रोत्साहन दिले. नव्हे त्यांनी ते सुरू केले. चित्रपटाने नवी पिढी झपाटल्याने गीत आणि संवाद ते तोंडपाठ म्हणू लागले. खोट्या प्रतिष्ठेच्या कल्पनांमुळे शेतकरी रसातळाला गेले. जसे, मांगीलाल शेठने कृष्णधवल दूरदर्शन संच लावल्याबरोबर पाटलांनी रंगीत दूरदर्शनचा संच आणला ह्यात त्यांचा अव्यवहारिपणा दिसतो. वशिला आणि भ्रष्टाचाराने समाजजीवन पोखरले गेल्याने ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांना नोकऱ्या मिळू शकल्या नाही. त्यामुळे त्यांच्या लग्नाची समस्या निर्माण झाली. हे वरवरचे परिवर्तन समाजामध्ये होत असले तरी धनिक शेतकऱ्यांना नोकरी करणे लाचारीचे, कमीपणाचे वाटते. आंतरजातीय विवाहाची कल्पना त्यांना मान्य नाही. खानदान- प्रतिष्ठेचा विचार समकालीन परिस्थितीत विवाहसंबंधात केला जातो. उदा. पंजाब-चंद्रलेखा प्रेमसंबंधामुळे हमारी नाक काट दी असे तिच्या वडिलांना वाटते. पंजाबाच्या वडिलांनाही आंतरजातीय विवाह कल्पना मान्य नाही. थोडक्यात लग्नविधी आजही परंपरागत पद्धतीने केले जातात. नवविचारांचा प्रभाव ह्याबाबतीत समाजावर पडलेला दिसत नाही. खानदान-मानपान-कूळगोत्र पाहूनच लग्न जमविले जाते. खानदानी घराण्यातील मुलामुलींना एकत्र भेटणे, बोलणे सामाजिक गुन्हा ठरतो. त्यामुळे श्यान्यवकुलाये बट्टा लागतो. त्यामुळे मामाच्या मुलीशी लग्न लावण्याची प्रथा असलेली दिसते. उलट शेतकऱ्यांच्या शिकलेल्या मुलींना शेतकरी पती नको वाटतो. नोकरी धंदा करणारा हवा असतो. शेतात काम करण्यापेक्षा घरात बसून डाळभात खाण्याचे मुली स्वप्न पाहतात. जसे पदवीधर पंजाब शेती करू लागल्यावर त्याचे लग्न जमत नाही. काळी, तिरळी, कुरुप मुलगी पंजाबचे वडील पसंत करतात. कारण चाळीस तोळे सोने आणि राजदूत मोटरसायकल तसेच पन्नास एकर जमीन मोठा वाडा मिळण्याची खातरी असते. ह्यावरून पैसा सर्व श्रेष्ठ ठरला असला तरी काही जुन्या रूढी टिकून असलेल्या दिसतात.

शेतकऱ्याला निसर्गनिर्मित आणि शासननिर्मित संकटांना सामोरे जावे लागते.

महागाई-भेसळ आणि भ्रष्टाचारामुळे आर्थिक प्रश्न निर्माण होतात. प्रत्येक बजेटमध्ये रासायनिक खते, किटकनाशके आणि बी-बियाणांचे भाव वाढतात. त्यामध्ये व्यापारी भेसळ करतात. उलट शेतमालाच्या किंमती मात्र वाढत नाहीत. त्यामुळे पैसे मिळविण्यासाठी धनिक शेतकरी नोकरदारांना हाताशी धरून त्यांना पैसे देऊन शेतमालाला चांगली किंमत मिळवितात. सामान्य शेतकऱ्याला हे साध्य करता येत नाही. जसे पंजाबचा आठ एकर कापूस नर बियाणे असल्यामुळे निरर्थक ठरतो. तेव्हा त्याचे वडील बाकी जमिनीतील कापसासंबंधी गेडरशी आटसाट जमविण्याचा निर्णय घेतात. अधिकाऱ्यांना भ्रष्टाचार करायला प्रवृत्त करण्यास काही प्रमाणात धनिक शेतकरी जबाबदार असतात. त्यामुळे सामान्य शेतकऱ्यांचे शोषण होते. त्यांचा उत्कृष्ट माल निकृष्ट ठरविला जातो.

कष्ट करण्यापेक्षा दुसऱ्याच्या उठाठेवी करण्यात लोक रमू लागले. एकमेकांचे दोष पाहून खीज पाडू लागले. (पृ. ७९) तसेच लग्नविधी आणि इतर कार्यक्रमप्रसंगी लोक दारू पिऊन धिंगाणा घालू लागले. समाजात आपली अप्रतिष्ठा होते, ह्याकडे दुर्लक्ष होऊ लागले. उधार उसनवारी करून चैन करण्याची प्रवृत्ती समाजात वाढली. दुसऱ्याला मदत करण्याची भावना नाहीशी झाली. सहकारी आणि सरकारी कार्यालयात भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले. जसे, ग्रामविकास योजना अर्धवट ठेवून पैसे मिळविणे, पोलिसांनी हप्ते घेणे, सरकारी सोसायट्या, बँका, कापूस फेडरेशन ह्यामध्ये भ्रष्टाचार होऊ लागला. सामान्य माणसाला ह्या समाज व्यवस्थेत किंमत नाही. लेखक वर्णन करतो, "म्या म्हटलं भाऊ पंज्याब। आपन उपलानीच घड्याळ बांधतो हातात. खरं त इंडियात राहाचं म्हन्जे कॅलेन्डरचं ठेवाले पाहयजे आपण संग. आता आपन तब्बल च्यार तास बसलो आंकोल्यात यस्टी स्टँडवर, पन येकही गायगावाले थांबीन अशी आर्डिनरी गाळी नाही सुटे. सुटत त्या सगळ्या सुपर येक्स्प्रेस शेगाव्या नावानं. म्हन्जे अशी चिल्लर गोष्टीले, चिल्लर मानसाले किंमत नाहीच. किंमत आहे सुपरपास्टले.... त्यातही काही गाळ्या अशा लागत की काहीवर पाट्या नाहीत. अन काहीवर चुन्यानं लिहेल काचावर. अन तेही दोन दोन तीननावं येकीवरच...." (पृ. ११८)

वरील उताऱ्यावरून प्रशासन व्यवस्था कशी खिळखिळी झाली आहे, ह्याची

कल्पना येते. त्याचप्रमाणे वेळेच महत्त्व आजही लोकांना समजले नाही. शिवाय सरकारी योजना अनुदान मिळत असूनही स्वीकारायला लोक फारसे उत्सुक नसतात. जसे हजार दोन हजार लोकसंख्या असलेल्या गरसोई गावात दहा अकराच सूर्यचुली झाल्या. धनिक धनवान झाले, गरिबाला प्राथमिक गरजा पूर्ण करणे अशक्य झाले. येंड्रीन संस्कृतीमुळे पशुपक्षांचे पारंपरिक - नैसर्गिक जीवन नष्ट झाले. अनीती-अनाचार-व्यभिचाराचे प्रमाण वाढले. बुवाबाजी ही बीनभांडवली धंदा जोरात चालू लागला. मातृभाषेपेक्षा इंग्रजीचे महत्त्व वाढले. अधिकारी आणि शेतकरी ह्यांना एकमेकांबद्दल जिव्हाळा, प्रेम, आत्मीयता वाटत नाही. मोठाली स्वप्न नाहीत, मन मुरदाड झालेले दिसतात. डॉक्टरांची वृत्ती समाजसेवकाऐवजी धंदेवाईक बनली. कामचुकारपणा, आळशी वृत्ती विदर्भातील मानसामध्येच मुरलेली दिसते. शेती व्यतिरिक्त अन्य नवीन कोणताही धंदा करण्याची उत्पन्न वाढविण्याची त्यांची वृत्तीच दिसत नाही. हे लेखक सूचित करतो.

पूर्वीच्या गावगाड्यातील श्रीमंत पाटील आणि अन्य धनिकांकडे स्वातंत्र्योत्तर काळात गावातील प्रशासन व्यवस्था आहे. पिढ्यान्‌पिढ्या पैशाच्या जोरावर ते सत्तेवर आहेत. सत्तेच्या विकेंद्रीकरणाची कल्पना पुढे आली असता सरपंच, सोसायटीचा चेअरमन आणि अन्य सत्तास्थानांवर गावगाड्यातील पाटील व त्यांची नवी पिढी काम करताना दिसते. घराणेशाही स्वातंत्र्योत्तर काळात नाहीशी होऊ शकली नाही, असे चित्र लेखकाने प्रस्तुत कादंबरीत रेखाटले आहे. सत्तेमुळे प्रतिष्ठा मिळविली जाते. ते सत्तेच्या जोरावर बेफिकिरीने वागतात. स्वार्थ साधतात. राज्य, देश पातळीवरील राजकारणात प्रवेश मिळावा म्हणून लोकसेवा करण्याऐवजी, पैशाने वरच्या राजकरणात लवकर प्रवेश मिळावा म्हणून अधिकाधिक भ्रष्टाचार करून तसेच स्वतःच्या प्रांताचा स्वतंत्र प्रश्न उपस्थित करून प्रसिद्धी मिळवितात. राज्य-केंद्र पातळीवरील पुढाऱ्यांना अडचणीत आणतात. मंत्रिपद, महामंडळाचे अध्यक्षपद मिळवितात. शोकसभा, श्रद्धांजली, उद्‌घाटन आणि भूमिपूजनाचे कार्यक्रम घेऊन वर्तमानपत्रातून खोटी प्रसिद्धी मिळवितात. राजकारण जनसेवा नाही तर उदरनिर्वाहाचा-प्रसिद्धी आणि मानसन्मानाचा धंदा झाला आहे. जनहितापेक्षा स्वार्थाला-सत्तेला येथे महत्त्व आहे. प्रत्येक पक्षामध्ये ह्या ध्येयामुळेच गट-तट पडलेले दिसतात. गावामध्ये अशाप्रकारे गटबाजी असलेली

दिसते.

प्रस्तुत कादंबरीत लेखकाने विदर्भातील एका खेड्याचे राजकीय पार्श्वभमी चित्रित करतानाच राज्य-देश प्रातळीवर पार्श्वभूमीकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. गरसोली खुर्दचे सरपंच पंजाबराव साहेबराव गरसोलीकर पाटील हा एक एम. ए. (मराठी) भाग एक पर्यंतचे शिक्षण घेतलेला तरुण अनिच्छेने राजकारणात कसा येतो, त्याच्या वडिलांचे स्वप्न काय असते, ह्याचे चित्रण लेखक करतो. पंजाबरावला लेखकाने निवेदन करायला लावले आहे. "गावची सत्ता आमच्या घराण्यात पिढीजात आहे आणि ह्यापुढेही अनेक पिढ्यांकडे राहील. ह्यात नवीन काहीच नाही. ही पद्धतच आहे असे तो सांगतो. आपण गावचा सरपंच कसे झालो हे तो निवेदन करतो. निवडणुकांच्या बोगसबाजीत त्याला रस नसतो. तेव्हा समाजातील प्रतिष्ठेसाठी वडील त्यांना निवडणुकीला उभा राहण्याचा सल्ला देतात. निवडणूक बिनविरोध होऊन पंजाब सरपंच होतो.... पितृकृपेनं सरपंच होईन त मीच. अन तोही कसा त अनपोज. काऊन त गेया कईक सालापासून आमचे तीर्थरूप सरपंच होतेच अन त्याही आंधी तीर्थरूपांचे तीर्थरूप.... म्हन्जे माहे आबा. त्याआंधी आंबांचे तीर्थरूप त सांगाचा मतलब इतलाच की गावाच्या गढीवर आमचीच वळिलोपार्जित पताका फळफळ फळफळ फळफळत राहेयल... त्याईची पाटीलकी इंग्रजाईबरोबर गली अन लाल गुलाबाच्या हातात हात घालून हे सरपंच्यकी आली. इंग्रज गेल्याचा ना फायदा न तोटा... गेले त गेले.... आले त आले. कसंबी फेक्सान तरी चित्त आमचीच।...."(पृ. ४)

भारतीय खेड्यातील घराणेशाहीच्या सत्तेचे हे प्रातिनिधिक चित्र आहे. भाषणबाजीमध्ये मात्र लोकशाहीची थोरवी सांगितली जाते. लोकशाहीमुळे तळागाळातल्या सर्वसामान्य माणसांचा विकास होईल, त्याचबरोबर भारतात आमूलाग्र कायापालट होईल. विषमता नष्ट होईल. लोकशाहीने सरंजामशाही आणि मग्रूर घराणेशाही नष्ट होईल, असा आशावाद भाषणातून नेते व्यक्त करतात. परंतु प्रत्यक्षात तळागाळातील जनतेच्या हिताकडे, विषमतेकडे कोणाचे लक्ष जात नाही.

सत्ताधारी राजकारण्यांची महत्त्वाकांक्षा प्रातिनिधिक स्वरूपात साहेबराव पाटलाच्या मनोदयातून व्यक्त होते. मुलगा मनासारखा वागला तर स्वत:ची समाधी गांधी-नेहरूंना खेटून राजघाटावर बांधण्याचे आणि गरसोईपासून ते दिल्ली पर्यंत

शंभराच्या नोटांची थप्पी लावून त्यावरून दिल्लीपर्यंत चालत जाण्याचे ते स्वप्न पाहतात. गावाचा सरपंच झाल्यावर जिल्हा परिषद, राज्यमंत्री, कॅबिनेटमंत्री, मुख्यमंत्री ह्या शिड्या चढत चढत गेले पाहिजे. त्यासाठी स्वतंत्र विदर्भाची मागणी, स्वतंत्र विकास मंडळ, बॅकलॉग, सापत्नभावाची वागणूक, साखर सम्राट आणि शेतकरी संघटनेला विरोध केला की, मुख्यमंत्री पद मिळेल आणि शेवटी चालला रे चालला सातपुळा हिमालयाच्या मदतीले (पृ. ६) विदर्भातील तरुण पंजाबला पंतप्रधान पद मिळाले की वडिलांची समाधी यमुनातिरी-राजघाटावर नेहरू-बापूंना खेटून बांधली जाईल, असा आशावाद साहेबराव पाटलांना वाटतो.

पुढाऱ्यावरील शस्त्रक्रियेसाठी लाखो रुपये खर्च केले जातात. त्यांच्या मृत्यूनंतर भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतात. राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला जातो. अंत्ययात्रा दूरदर्शनवरून दाखविली जाते. पुढाऱ्यांच्या नावाने कोट्यवधी रुपयांची नवीन योजना जाहीर केली जाते. ह्याचा अर्थ असा की, देश पातळीवरील नेत्यांवर शासन मोठ्याप्रमाणावर खर्च करते. परंतु ह्या देशातील सामान्य माणसाला प्राथमिक गरजा पूर्ण करता येत नाही. ह्या विषमतेवरील हे भाष्यच आहे. पुढाऱ्यांची व्यसनाधीनता आणि मानपानाच्या कल्पनेवरही लेखकाने प्रस्तुत कादंबरीत प्रकाश टाकला आहे. गावात लस टोचण्यासाठी आलेल्या डॉक्टरने परिचयाअभावी साहेबराव पाटलाला नमस्कार न केल्यामुळे दारूच्या धुंदीत त्यांनी डॉक्टरचा हात मोडला. तेव्हा पाटलाचा कोणी हात धरला नाही. म्हणजेच सत्ताधारी आडमुठ्या राजकारणाला विरोध करण्याचा कुणीही प्रयत्न करीत नाही. गावपातळीवरील पुढारी, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांचे अध्यक्ष तसेच अधिकारी ह्यांच्या दिलजमाईमुळे सरकारी योजनांचा बभ्रा अधिक काम कमी असे चित्र दिसते. प्रत्यक्षात ह्या योजना जनतेपर्यंत येऊ दिल्या जात नाही. कागदोपत्री रंगविल्या जातात आणि सरकारी तिजोरी रिकामी केली जाते. ग्रामविकासासाठी असलेल्या सरकारी योजना उद्घाटन-भूमिपूजनासाठी गावात राबविल्या जातात. कोणतीच योजना पूर्ण होत नाही. परंतु आपल्या कार्याची पावती म्हणून पुढारी सर्व बातम्या वर्तमानपत्रातून छापून आणतात. प्रसिद्धी मिळवितात. राज्य-देश पातळीवरील पुढारी आणि अधिकारी ह्यांना ओली पार्टी दिली की सर्व

भानगडी दाबल्या जातात. ह्याबाबतीत पुढारी आणि उच्च अधिकारी ह्यांच्यात एकात्मता असते. पार्टी-पैसा मिळवून देणाऱ्या गावपातळीवरील पुढाऱ्यांना उच्च अधिकारी त्वरित भेटी देतात. राजकारण, समाजसेवा हे केवळ मानपानासाठी केलेले नाटक असते. राजकारण हा उदरनिर्वाहाचा धंदा झाला आहे, असे समाज वास्तवाचे चित्र लेखक रेखाटतो.

गावपातळीवरील नेत्यांप्रमाणे आज सामान्य माणूस देखील राजकारणामध्ये भाग घेऊ लागला आहे. दोन पुढाऱ्यांमधील सत्ता स्पर्धा ह्या लोकांना काही काळ आर्थिक फायदा करून देते. चैन करता येते. सत्ताधारी आणि विरोधक ह्यांना निवडणुकांच्या रिंगणात उतरविल्यानंतर ते अफाट खर्च करतात. मतदारांना खायला-प्यायला देतात. नेहमीप्रमाणे विरोधकाला निवडणूक रिंगणात उतरविण्यासाठी प्रोत्साहन देणारे, तो पराभूत होताच त्याला टाळू लागतात. मागासवर्गीय आणि मुस्लिमांचे पुढारी विरोधकांना कसे प्रोत्साहन देतात, हे मांगीलाल शेठच्या निवडणुकीच्या निमित्ताने वर्णन केले आहे. (पृ. २९)

परदेशातील नेते सामान्य माणसासारखे जीवन जगतात. परंतु भारतात मात्र नेहमीच सत्ताधारी विमानाने तर पराभूत झालेले चार चाकीतून फिरतात. गरीब राजकारणी ह्या देशात शोधून सापडत नाही. शिवसेना, दलित पँथर, आणि मुस्लीम असे जातीयवादी संघटना-पक्ष कार्यरत असलेले दिसतात. अशा संघटनांच्या मतदानावर लक्ष ठेवून सत्ताधारी पक्ष त्यांना हाताशी धरतात. राजकारण्यांचा ढोंगीपणा, उक्ती एक कृती भलतीच, असे चित्र लेखक रेखाटतो. दारूबंदी योजना सरकार जाहीर करते, परंतु पुढाऱ्यांचे किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांना दारू विक्रीचे आणि साखर सम्राटांना दारू निर्मितीचे कारखाने सरकारी परवाने दिले जातात. समाजाचा कायापालट होऊ शकत नाही. ही लोकशाहीची शोकांतिका आहे.

प्रसारमाध्यमे, रोजगार हमी योजना, बी-बियाणे, कापूस फेडरेशन, वृक्षारोपण, कुटुंब नियोजन, एस. टी. महामंडळ अणि सर्वच मंडळ, योजना संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार चालतो. कुटुंब नियोजनाचे धोरण असून मतांवर डोळा ठेवून लोकसंख्या वाढीकडे दुर्लक्ष केले जाते. पैशाच्या जोरावर विविध कमिट्यांवर वर्णी

लावली जाते.

परिवर्तन काळामध्ये सरंजामशाही, घराणेशाही नष्ट होईल, विषमता समूळ नष्ट होईल, असा आशावाद सामान्य जनतेला वाटत होता. परंतु ह्या उलट परिस्थिती निर्माण झाली. आर्थिक विषमता वाढली, व्यसनाधीनता, कर्जबाजारीपणा वाढीस लागला. (पृ. ३७) सरकारी योजनांतील भ्रष्टाचारामुळे सामान्य माणसाचे शोषण होते. भांडवलशाहीकडे तोल गेलेली भारतीय समाजव्यवस्था निर्माण झाली. नोट करे गोठ अन् चिल्लर करे इच्चार अशी परिस्थिती निर्माण झाली.

सरकारच्या शिक्षण प्रसाराच्या धोरणामुळे खेड्यापाड्यातून शाळा, महाविद्यालये उघडली गेली पण तरुणांचा आत्मविश्वास वाढण्याऐवजी रोजगाराअभावी उदासीनता वाढली. शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचार वाढला. सारांश, विदर्भ मुळात मागासलेला भाग. सहकारी तत्त्वांवरील संस्था नाहीत त्यामुळे पदवीधारकांना नोकऱ्या मिळत नाहीत. त्यातून बेकारी, व्यसनाधीनता वाढते हे प्रादेशिकतेचे समाज वास्तवावरील परिणाम दिसतात. श्रद्धा-समजुती, रीतीरिवाज, परंपरा आणि सण उत्सवांना तसेच देव-देवतांचा भंडारा विदर्भाचे सांस्कृतिक वैशिष्ट्ये आहे. (पृ. १४) दसरा-भोंडल्याच्या वेळी स्त्रिया फुगड्या खेळत गीत गातात, लोकांची थट्टा करण्याची परंपरा विदर्भाचे सांस्कृतिक वैशिष्ट्ये आहे. (पृ. ११५) त्याप्रमाणे नातेवाईकांचे विडंबन केले जाते. (पृ. ११५) भुलाबाई आणि भुलोजीचे गाणे म्हटले जाते. (पृ. १२० आणि १३२) पहाटे काकड आरती करण्याची वैदर्भी परंपरा दिसते. (पृ. ८२) तसेच पाऊस पडावा म्हणून गाणे म्हटले जाते. (पृ. १४७) वऱ्हाडी बोली भाषेतून निवेदन व संवाद अवतरले आहे. घटना-प्रसंग मराठी, हिंदी, इंग्रजी ह्या शब्दांच्या मिश्रणातून जिवंत करण्याचा प्रयत्न केला आहे. हेबांळे, इंचिमायबहिन, भयतानीले, ससरीच्या, मायचा कानकोंडा, इच्यामयले, इ. वैदर्भीय शिव्या, शब्द आशयानुरूप आल्याने अश्लील - ग्राम्य वाटत नाही. म्हणी-वाक्प्रचार, उपमा-प्रतिमांचा वापर लेखकाने केला आहे. तरीही जयंतकुमार बंड ह्यांनी कादंबरीच्या निवेदनासंबंधी असमाधान व्यक्त केले आहे की, पुरुषोत्तम बोरकरांनी निवेदनासाठी जी वऱ्हाडी भाषा वापरली आहे, तिचा बाज अस्सल वऱ्हाडी नाही. अर्धवट नागरी आणि अर्धवट ग्रामीण असं त्या भाषेचं अर्धवट

स्वरूप आहे.... धग आणि माणूस सारख्या कादंबऱ्यांतील वऱ्हाडी भाषेला जो गोडवा आहे आणि जो वऱ्हाडी मातीचा सुगंध आहे, तो मेड इन इंडियातील वऱ्हाडी भाषेला नाही.... त्यामुळे निवेदनाचा तोल ढासाळलेला आहे. हे अर्धसत्य आहे. कारण प्रस्तुत कादंबरीत लेखकाला समकालीन परिस्थितीचे विदारक चित्र रेखाटयाचे आहे. त्याचबरोबर लोकशाही समाव्यवस्थेतील ऱ्हासपर्व लेखकाने विनोदी शैलीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. घराणेशाही लोकशाहीत नष्ट होण्याऐवजी त्यांचे प्रस्त वाढले भ्रष्टाचार, भेसळ, वशिलेबाजीने, समाज देश पोखरला गेला. हे किस्सेवजा पात्रमुखी निवेदन पद्धतीने लेखकाने चित्रित केले आहे. वसंत वाहोकार ह्यांना ती वेगळ्या टप्प्यावरील कादंबरी वाटते. तर एका माणसापेक्षा समूहाचे दर्शन होते, असे आशा मुंडले म्हणतात. शंकर सारडा ह्यांनी कोसलाचा पुढचा टप्पा म्हणून ह्या कादंबरीचा नायक पंजाबराव आपल्या वाङ्मयीन संस्कृतीचा एक वैशिष्ट्यपूर्ण घटक म्हणून गाजत राहील, असा आशावाद व्यक्त केला आहे. सारांश वैदर्भीय जीवनचित्रण करता करता एका नव्या वेगळ्या पद्धतीने लेखकाने प्रादेशिकतेचा समाजवास्तवावरील परिणाम दाखवून दिला आहे. प्रादेशिकतेच्या मर्यादा ओलांडून तिने'पुढचे पाऊल टाकले आहे. समूह जीवनचित्रण करणारी काहीशी ती प्रातिनिधिक कादंबरी आहे.

***

## ६. निष्कर्ष

प. महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, विदर्भ प्रदेशातील लोकजीवन विशेषांचा कादंबऱ्यांच्या संदर्भात विचार करीत असताना असे लक्षात येते की, ह्या कादंबऱ्यांमधून प्रकट झालेली प्रादेशिकता ही त्या लेखकांनी जाणीवपूर्वक प्रकट केली आहे. असे नाही कादंबरीकार हा ललित लेखक असतो आणि तो आपली साहित्यकृती निर्माण करीत असताना त्याला आकलन झालेल्या जीवनानुभवाचे स्वरूप त्याच्या अंगी असलेल्या कल्पना सामर्थ्यासह प्रकट करीत असतो. हे करीत असताना काही ठिकाणी वास्तवानुभवापेक्षा कल्पनासामर्थ्य, रंजकता, अतिरंजकता, अद्‌भुतता, चमतकृतिजन्यता, कल्पनारम्यता, स्वप्नरंजकता ह्यांचाही लेखकाच्या लेखन प्रकृतीनुसार आविष्कार झालेला असू शकतो. तरीही येथे वास्तविक जीवनदर्शनाची प्रेरणाच दिसते. चारही स्वाभाविक प्रदेशाची प्राकृतिक रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रदेशाचा आणि निसर्गाचा त्या त्या प्रदेशातील लोकजीवनावर परिणाम झालेला स्पष्ट जाणवतो. लोकांच्या वेगवेगळ्या स्वभाव-प्रकृतीची मानसिकता घडलेली दिसते. प्रदेशातील राजवटीचा प्रभावही लोकजीवनावर असलेला दिसतो. मराठी कादंबरीमध्ये प्रदेश चित्रणामुळे आशयदृष्ट्या समृद्ध झाली हे मान्य करूनही बैलगाड्यांच्या शर्यती, रेड्यांच्या टकरी, जागरण गोंधळ, वाघ्यामुरळी ह्यांचे दर्शन घडविलेले दिसत नाही. तसेच ग्रामीण प्रादेशिक जीवनाचे दर्शन घडविणारे लेखन स्त्री लेखिकांनी केलेले दिसत नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर प. महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील नवी चिंतनशील पिढी लेखन करू लागली असली तरी मधू मंगेश कर्णिकांनंतर कोकणातून नवीन लेखक पुढे आलेले दिसत नाही. तरी उपेक्षितांचे, आदिवासींचे जीवन चित्रणाने प्रादेशिक कादंबरी आणि एकूणच मराठी कादंबरी समृद्ध झाली. जाती-जमातींशी आणि विशिष्ट वर्गाच्या जनजीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा समावेश प्रादेशिक कादंबरीत करता येईल, त्यानुसार पुढीलप्रमाणे संशोधनाच्या नव्या दिशांनी अभ्यास

होऊ शकेल.

१.भाविणीचे जीवनदर्शन घडविणाऱ्या प्रादेशिक कादंबऱ्या : भावीण (१९५०) बा. भ. बोरकर, देवकी (१९६२) मधु मंगेश कर्णिक, महानंदा (१९७०) जयवंत दळवी, मालती गंधा (१९७५) आनंद रेगे.

२. तमाशा कलावंतांचे जीवनदर्शन करणाऱ्या प्रादेशिक कादंबऱ्या : वैजयंता (१९५९) अण्णाभाऊ साठे, घुंगरू (१९७१) शंकर खंडू पाटील, नटरंग (१९८०) आनंद यादव, डाळिंबाचे दाणे(१८७७) उद्धव शेळके, घरानं तमासगीरांचं (१९८९) शशिकांत तासगावकर

३. देवदासींचे जीवन नाट्य रेखाटणाऱ्या प्रादेशिक कादंबऱ्या : १९७३ वर आभाळ खाली धरती- महादेव मोरे, झुलवा - उत्तम बंडू तुपे (१९८२), चौंडक-राजन गवस (१९८५)

४. आदिवासी जनजीवनावरील तीन कादंबऱ्या : १९८५ डांगाणी- अनिल सहस्त्रबुद्धे, १९८८ झेलझपाट -मधुकर वाकोडे, १९८९ हाकुमी - सुरेश द्वादशींवार

प्रादेशिक कादंबरीचे वाङ्मयीन मूल्याधारे मूल्यमापन करताना एक गोष्ट स्पष्ट होते की, प्रादेशिक कादंबरी वास्तववादी मराठी कादंबरी आहे. आशयाचे नावीन्य जसे येते, त्याचप्रमाणे प्रादेशिक कादंबरीचे पथ्य सांभाळल्याने ती जशी प्रादेशिक ठरते, त्याचप्रमाणे मूल्यव्यवस्था म्हणजे कथानक, व्यक्तिरेखाटनही सांभाळते म्हणून ती कादंबरीही आहे. कारण तिच्यात मनोरंजनाचे सामर्थ्य आहे. प्रादेशिक कादंबरीदेखील मनाला भिडते, अस्वस्थ करते. मानवी भावभावनांचे दर्शन घडविते. वास्तववाद आत्माविष्कार आणि जीवनशोधाची प्रेरणा असलेली प्रादेशिक कादंबरी रंजक आहे. तिच्यातही रहस्यमयता, गूढता, सूचकता असलेली दिसते. प्रादेशिक कादंबरी प्रदेश विशिष्ट समूहजीवन चित्रणाला अधिक महत्त्व देते. विशिष्ट प्रदेशातील सुख-दुःख, समस्या निसर्ग वर्णने, बोलीच्या अनुभवाचा अपरिहार्य भाग, माध्यम म्हणून केलेला वापर, नावीन्य ह्यामुळे मनोरंजक होते. तळाच्या उपेक्षित अस्पृश्यांच्या समस्याही चित्रित होतात. त्यातूनही मनोरंजन घडते. सत्याशिवामुळे प्रादेशिक कादंबरीला सौंदर्य, कलात्मकता लाभलेली दिसते. स्वातंत्र्योत्तर कादंबऱ्यामधून पूर्व सुरींच्या कादंबरीपेक्षा अधिक समाजाभिमुखता, वास्तवाभिमुखता दिसून येते. तसेच ह्या कादंबरीमध्ये कोणी

एक नायक असला तरीही खरे नायकत्व त्यातील चिंतनशील सामाजिक मनाला असते. ह्या कादंबरीत खलनायकाच्या रूपात एखादी व्यक्ती नसते तर काही एक परिस्थिती प्रवृत्ती किंवा नियती असते आणि त्यासाठी कादंबरीत लेखकाने संघर्ष उभा केलेला असतो. प्रादेशिक जीवनाची ओळख पटविणारी स्वातंत्र्योत्तर काळातील ही कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण आहे. काळ आणि जीवनाचा विशालपट ह्या कादंबऱ्यातून येतो. बदलत्या काळात सुधारणा होत असतानाच नव्या समस्याही निर्माण होतच आहे, हरितक्रांतीच्या प्रेरणेतून धरणग्रस्तांचा प्रश्न, दुग्ध व्यवसायाच्या निमित्ताने बैलाच्या अस्तित्वास निर्माण झालेला धोका, सपाटीकरणामुळे होत असलेली वृक्षतोड आणि त्यातून पशू पक्षांच्या स्वाभाविक जीवनाला लागलेला सुरूंग, बलुतेदारांचे उखडलेपण, रासायनिक खत, किटकनाशकांच्या वापरामुळे जमीन-पाण्यात झालेला बदल असे नवे प्रश्न लेखकांना आव्हान देतील, तो पर्यंत वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक कांदबरी लिहिली जाईल.

***

प. महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, विदर्भ प्रदेशातील लोकजीवन विशेषांचा कादंबऱ्यांच्या संदर्भात विचार करीत असताना असे लक्षात येते की, ह्या कादंबऱ्यांमधून प्रकट झालेली प्रादेशिकता ही त्या लेखकांनी जाणीवपूर्वक प्रकट केली आहे, असे नाही कादंबरीकार हा ललित लेखक असतो आणि तो आपली साहित्यकृती निर्माण करीत असताना त्याला आकलन झालेल्या जीवनानुभवाचे स्वरूप त्याच्या अंगी असलेल्या कल्पना सामर्थ्यासह प्रकट करीत असतो. हे करीत असताना काही ठिकाणी वास्तवानुभवापेक्षा कल्पनासामर्थ्य, रंजकता, अतिरंजकता, अद्‌भुतता, चमतकृतिजन्यता, कल्पनारम्यता, स्वप्नरंजकता ह्यांचाही लेखकाच्या लेखन प्रकृतीनुसार आविष्कार झालेला असू शकतो. तरीही येथे वास्तविक जीवनदर्शनाची प्रेरणाच दिसते. चारही स्वाभाविक प्रदेशाची प्राकृतिक रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रदेशाचा आणि निसर्गाचा त्या त्या प्रदेशातील लोकजीवनावर परिणाम झालेला स्पष्ट जाणवतो. लोकांच्या वेगवेगळ्या स्वभाव-प्रकृतीची मानसिकता घडलेली दिसते. प्रदेशातील राजवटीचा प्रभावही लोकजीवनावर असलेला दिसतो. मराठी कादंबरीमध्ये प्रदेश चित्रणामुळे आशयदृष्ट्या समृद्ध झाली, हे प्रस्तुत ग्रंथातून स्पष्ट होते.



विदर्भ , मराठवाडा, खानदेशी, कोकणी, पश्चिम महाराष्ट्र